
# मेहता मराठी ग्रंथजगत

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले
दर्जेदार मासिक

जुलै २०१४
किंमत १५ रुपये








# मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै २०१४ · वर्ष चौदावे · अंक सातवा

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

अंकाची किंमत
१५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संवाद | ४ |
| संपादकीय | ६ |
| विशेष | १० |
| साहित्यवार्ता | १५ |
| पुरस्कार | ५६ |
| पुस्तक परिचय | ६८ |
| पाथ्स ऑफ ग्लोरी | |
| बंदा रुपाया | |
| इंग्रजी पुस्तक परिचय | ९८ |
| श्रद्धांजली | १०२ |
| बालनगरी | ११० |

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड,
टेलिफोनभवनसमोर,
पुणे-४११ ०३०
फोन :०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५
E-mail : info@mehtapublishinghouse.com

डिजिटल अंकाची वर्गणी

तीन वर्षांची ३००रु. | पाच वर्षांची ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# संवाद.....

वाचकहो,

पालखी...

भक्तीची, निष्ठेची, ध्येयाची, प्रेमाची, समानतेची...

पालखी मानवतेची !!!

नाचतो पताका हाती, टाळ नि मृदंग ।
चालती पावले, मुखी विठोबाचे नाम ।

ज्येष्ठातल्या पावसाने न्हाऊन निघालेली धरती आषाढात नटते, फुलते, ती वारकऱ्यांच्या स्वागताला.

ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस ।

संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला तत्त्वज्ञानाची बैठक दिली आणि तुकारामांनीही याच तत्त्वज्ञानाची पताका वारीच्या सोहळ्यात साऱ्या आसमंतात फडकवली. 'पंढरीची वारी' हे वारकऱ्यांचे व्रत आहे, तसेच ती उपासना आहे, साधना आहे. सकल समाजाला संतांनी दाखविलेला परमार्थाचा सर्वांत सोपा असा महामार्ग म्हणजे वारी, सामूहिक भक्तीचे प्रतीक





म्हणजे वारी, सांस्कृतिक लोकजीवनाचा प्रवाह म्हणजे वारी. जिथे स्त्री-पुरुष हा भेद नाही, जात-पात नाही, वर्ण-भेद नाही, जिने आध्यात्मिक लोकशाहीची स्थापना केली, शास्त्र-प्रामाण्याला वा जातिव्यवस्थेला धक्का न लावता स्त्रियांना तसेच शूद्रांना आत्मविकासाचा मार्ग खुला करून दिला. अशा प्रकारे भक्तिप्रेमाची अनुभूती घेऊन सदाचारी जीवनाची वाटचाल घडविणारा नैतिकतेचा एक मूर्तिमंत अविष्कार म्हणजे वारी!!!

कोसळणाऱ्या सरींची पर्वा नाही, पायाखालच्या दगडधोंड्यांची चिंता नाही, स्पृश्य-अस्पृश्याचा भेद नाही वा खाण्यापिण्याची शुद्ध नाही, असे भक्तिरसात न्हाऊन निघालेले मन स्वत:ला विसरून एक-एक पाऊल टाकत कधी 'आषाढीला' पंढरीत दाखल होते, समजतच नाही.

भक्तांची मांदियाळी, चंद्रभागेतीरी ।
ओढविठोबाची देवा, वाहे डोळाभरी ।

अशी 'सकलसमाज घडवणारी' वारी आपल्यासारख्या सामान्य लोकांसाठी जीवनाची एक 'मार्गदर्शिका'च!

तर तुम्हीही तुमचे शब्द वारीभोवती, तुमच्या 'मार्गदर्शका' भोवती गुंफून विणलेली शब्दमाला आमच्या पर्यंत पोहोचवू शकता.

आपले लेखन ई-मेल ने खालील पत्त्यावर पाठवा –

mmgj@mehtapublishinghouse.com

निवडक लेखनाचा अंकात समावेश करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. तसेच उत्तम लेखासाठी पारितोषिक म्हणून कोणत्याही एका खरेदीवर ४०% सवलत देण्यात येईल.

तुमच्या पत्रोत्तराच्या अपेक्षेत,
मेहता मराठी ग्रंथजगत








# प्रकाशन क्षेत्रातले स्थित्यंतराचे पर्व

भारतातील ग्रंथ प्रकाशनाच्या क्षेत्रात सध्याचा काळ हा एका प्रकारे स्थित्यंतराचा काळ आहे. मुद्रित पुस्तकांच्या पारंपरिक स्वरूपाशी निगडित एकूण ग्रंथव्यवहार आजवर चालला आहे. त्या दृष्टीने कामाची कौशल्ये आणि कार्यपद्धती अंगवळणी पडलेली आहे. कोणत्या प्रकारचे पुस्तक चांगले विकले जाईल; त्याबद्दल प्रत्येक प्रकाशकाचे काही अनुभवसिद्ध ठोकताळे असत; त्या दृष्टीने संभाव्य वाचक-ग्राहक समोर ठेवून लेखकांची निवड, मुद्रकाची निवड, संपादन, चित्रकार, कागदप्रकार, पुस्तकाचा आकार, बांधणी, वितरण व्यवस्था अंगवळणी पडली होती. डिजिटल, इलेक्ट्रॉनिक बुक या नव्या तंत्रज्ञानाचा आता प्रकाशनक्षेत्रात प्रवेश झाल्याने दीर्घकाळ चालत आलेले प्रकाशन व्यवसायाचे स्वरूप कालबाह्य होणे अपरिहार्य होणार आहे याची जाणीव आता सर्वांनाच प्रकर्षाने जाणवू लागली आहे. तशातच गेल्या दोन दशकात ग्रंथविक्रीत वेगाने वाढ होत आहे आणि गावोगाव ग्रंथप्रदर्शनांच्या आणि साहित्यसंमेलानाच्या माध्यमातून पुस्तकांकडे मोठ्या प्रमाणावर वाचक-ग्राहकवर्ग वळत आहे. भारतातील प्रकाशन व्यवसायात एकूण उलाढाल किती होते, पुस्तके किती निघतात, किती खपतात, कोणती पुस्तके जास्त खपतात, कोणत्या भाषेत पुस्तके जास्त निघतात, पुस्तकांचा ग्राहकवर्ग किती आहे, कोणत्या प्रकाशनसंस्था आर्थिक दृष्ट्या आघाडीवर आहेत वगैरे बाबतीत विश्वासार्ह आकडेवाऱ्या उपलब्ध नाहीत. त्यामुळे वेगळेवेगळे अंदाज व्यक्त केले जातात.

इ.स. २०१० पासून आकडेवाऱ्यांचे संकलन सुरू झाले आहे.

भारतात प्रकाशकांचे बारापेक्षा जास्त महासंघ आहेत. इंडियन पब्लिशर्स फेडरेशनच्या मते भारतात विविध भाषांत मिळून १५ हजार प्रकाशक आहेत.

ते वर्षाला साठ हजार ते एक लाख नवी पुस्तके (एकूण २२ भाषांत) काढतात. वर्षाला २ अब्ज डॉलर्सचा एकूण ग्रंथव्यवहार होतो. दरवर्षी ३० टक्के वाढग्रंथव्यवहारात होत आहे. भारतातील प्रकाशनक्षेत्रात सर्वांत अग्रभागी कोण असावे? एखादी विशिष्ट प्रकाशन संस्था नव्हे तर भारत सरकार हे या प्रश्नाचे उत्तर आहे. शैक्षणिक क्षेत्रातील पुस्तकांच्या विक्रीतून सर्वाधिक फायदा होतो.

आता ग्रंथप्रकाशन आणि डिजिटल पुस्तके या क्षेत्राकडे जागतिक उलाढालीचे क्षेत्र असे मानले जात आहे आणि आपली भारतीय पुस्तके परदेशी बाजार पेठांमध्ये नेण्यासाठी बडे उद्योगपती भांडवली गुंतवणूक करण्यासाठी पुढे सरसावले आहेत. आपल्याकडील जुन्या पुस्तकांनाही त्यामुळे नवजीवन मिळण्याची शक्यता आहे. एक उदाहरण द्यावेसे वाटते. १९६७ मध्ये अनंत पै यांनी ‘अमर चित्रकथा’ ही कॉमिक्स सुरू केली. टाइम्स ऑफ इंडियाच्या इंद्रजाल कॉमिक्सचे त्यावेळी ते संपादक होते आणि इंद्रजालमध्ये परदेशातील गाजलेली कॉमिक्सची आयती छापली जात. भारतीय विषयांवरील, इतिहास पुराणांवरील येथील चित्रकारांकडून मुद्दाम तयार केलेली कॉमिक्स त्यासाठी वापरण्याची कल्पनाच त्यावेळी शक्य वाटत नव्हती. त्यामुळे अनंत पै यांनी इंद्रजाल कॉमिक्सच्या संपादकपदाचा राजीनामा देऊन भारतीय संस्कृती आणि इतिहासाशी संबंधित कथावस्तूंवर आधारलेली कॉमिक्स विकसित करून नव्या चित्रकार-लेखकांची फळी उभी केली. अमर चित्र कथातर्फे दरमहा एकेक पुस्तक काढण्यास आरंभ केला. इंग्रजी आणि हिंदी भाषांमध्ये ही कॉमिक्स निघत. पुढे मराठी, कानडी वगैरे भाषांमध्येही ही कॉमिक्स येऊ लागली. चित्रे तीच, पण मजकूर वेगवेगळ्या भाषांत अशी कल्पनाही राबवली. ज्या प्रादेशिक भाषांत या कॉमिक्सना फारसा प्रतिसाद मिळाला नाही, त्या भाषेतील कॉमिक्स बंद केली. हिंदी व इंग्लिश भाषांमध्ये मात्र त्यांचे प्रकाशन होत राहिले. अनंत पै यांनी एक हाती हा प्रकल्प चाळीस वर्षे राबवला. एकूण ३००० कॉमिक्स निघाली. आजवर २२ भाषांमध्ये त्यांच्या १०० कोटी प्रती खपल्या. शाळातील मुलांमध्ये ही कॉमिक्स लोकप्रिय झाली. परदेशात राहणाऱ्या भारतीयांकडूनही त्यांना मागणी येत राहिली.

हा एकखांबी तंबू अनंत पै यांना वार्धक्यामुळे पेलणे जड जाऊ लागले. तशात डिजिटल क्रांतीचे आव्हान पुढे आले. पार्टनर-इन-टेक्नॉलॉजी म्हणून

बंगलोर स्थित नाइनस्टार्स इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी या संस्थेला देऊन विंडोज एट, अँड्रॉइड, आयओएस, या तीन प्लॅटफॉर्मवर अमर चित्रकथा उपलब्ध होतील अशी यंत्रणा विकसित केली. फ्युचर ग्रुपचे प्रमुख किशोर बियाणी यांनी या अमरचित्रकथा कॉमिक्सचे हक्क विकत घेतले. त्यामुळे बिगबझार, सेंट्रल वगैरे मॉलमध्ये अमर चित्रकथा उपलब्ध झाल्या. साहजिकच त्यांचा खप वाढू लागला. अमर चित्रकथांप्रमाणेच कराडी किडस्, विम्पी किड्स वगैरे पुस्तकमालिकांचे हक्कही किशोर बियाणी यांनी मिळवले आहेत. आता बालवाचकांना घरबसल्या इंटरनेटवरही सर्व प्रकारची कॉमिक्स बघायला मिळू शकतील. अधूनमधून मोफत, काहीही शुल्क न देता दहा कॉमिक्स कोणालाही डाउनलोड करून घेता येतील. पुढे मात्र कॉमिक्स विकत घेऊन वाचावी लागतील. बालवाङ्मयाच्या क्षेत्रात आज अग्रेसर असणाऱ्या मराठी प्रकाशन संस्थांना यापुढे अमरचित्रकथा सारख्या डिजिटल कॉमिक्सशी स्पर्धा करावी लागेल. प्रचंड सृजनशील कल्पनाशक्ती असणाऱ्या लेखक-चित्रकारांनाही त्यामुळे मोठ्या संधी उपलब्ध होतील.

मराठी प्रकाशकांना आपल्या पारंपरिक कोशात राहून आता चालणार नाही. कॉमिक्स, पिक्चर बुक्स, अॅक्टिव्हिटी बुक्स, बोलणारी पुस्तके, थ्रीडी पुस्तके वगैरे कल्पकतापूर्ण पुस्तकांच्या भल्यामोठ्या मार्केटमध्ये आपलेही एक दालन उघडावे लागेल. आपल्याकडील पुस्तके इंग्लंड-अमेरिकेत तयार होणाऱ्या पुस्तकांपेक्षा कमी किंमतीत देता येतील. आजही सिंगापूर, हाँगकाँग, चीन या देशांकडून रंगीबेरंगी बालसाहित्य छापून घेऊन इंग्लंड-अमेरिकेतले प्रकाशक ते जगभर विकतातच. भारतानेही या क्षेत्रात आपले अस्तित्व दाखवायला हवे.





वाचनामुळे स्वत:चा शोध घेण्यास मदत होते.

६वी आवृत्ती

# पितृऋण

मूळ लेखिका
सुधा मूर्ती

अनुवाद
मंदाकिनी कट्टी

**किंमत : ८०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




माणसाचं आयुष्य ही एक अजब गुंतागुंत!
नात्यांची, भावनांची अर्तक्य घटनांची!
काही नाती कोणतेही भावबंध निर्माण न करणारी,
तर काही नकळत नात्यांचे बंध उरात जपणारी!
काळाचा दीर्घ पडदा सरून गेल्यानंतरही
एका अनोख्या नात्याची ओळख होते.
मग...
नियतीचा बळी ठरलेल्या पित्याची जबाबदारी
स्वत:चं अर्घ्य देऊन पूर्ण करणाऱ्या कर्तव्यशील पुत्राचं अस्वस्थपण...
आणि त्या पूर्ततेसाठी खंबीर उभी राहिलेली कन्या,
यांचं अतूट नातं जपणारी पितृऋण'!
सुधा मूर्ती यांच्या वैचारिक, भावनाप्रधान लेखणीचा नवा अविष्कार!




# यंदाचा ज्ञानपीठ पुरस्कार

## पुरुषस्य भाग्यम्

ज्ञानपीठ पुरस्काराला भारतात नोबेलसारखे प्रतिष्ठेचे स्थान आहे. साहित्यक्षेत्रात भारतीय पातळीवरची मान्यता मिळवून देणारा हा पुरस्कार आरंभी एक लाखाचा होता; आता तो ११ लाख रुपयांचा आहे. हा पुरस्कार सुरू झाला तेव्हा एका लाखात प्रशस्त वास्तू उभी करणे सुलभ होते. आज ११ लाख रुपयात एक छोटी खोलीही मिळणे अवघड आहे. पुरस्काराची रक्कम ही वाढत्या महागाईच्या वेगाशी मेळ राखू शकलेली नाही. 'निरिच्छ' विंदा करंदीकरांना हा पुरस्कार मिळाला तेव्हा घर बांधण्याचा विचार त्यांच्या मनात आला. त्यावेळी हा पुरस्कार तीन की पाच लाखांचा होता. त्यात फार तर एखादी बाथरूम बांधता येईल असे त्यांना कळले तेव्हा पुरस्काराची रक्कम काही संस्थांना देऊन ते मोकळे झाले. साहित्य सहवासात त्यांच्या इमारतीला लिफ्ट नव्हती. ती कदाचित झाली असती तर त्यांचे शेवटचे दिवस थोडे बरे गेले असते. असे त्यांनी स्वत:च मला सांगितले होते.

ज्ञानपीठ पुरस्काराच्या रकमेत जैन कुटुंबीय वेळोवेळी थोडीफार वाढकरतात; हेही काही कमी नाही. रकमेपेक्षा मान्यता महत्त्वाची हीच भावना हा पुरस्कार ज्यांना मिळतो ते साहित्यकार मनाशी बाळगून तृप्त असतात.

हा पुरस्कार कोणाला मिळतो, कोणाला नाही, त्याचे निकष काय, तो देताना काय कार्यपद्धती अवलंबिली जाते याबद्दल सतत चर्चा होत असते. पण मला वाटते, वाङ्मयीन गुणवत्तेपेक्षा हा ज्याच्या त्याच्या भाग्ययोगावरच शेवटी मिळतो हेच खरे!

यंदाचेच उदाहरण घ्या. हिंदी कवी केदारनाथ सिंह यांची या पुरस्कारासाठी निवड झाली. केदारनाथ यांचे वय वर्षे ऐंशी. नेहरू

विद्यापीठातून प्राध्यापक म्हणून निवृत्त होऊन वीस वर्षे लोटलेली. ५ काव्यसंग्रह, पाच गद्य पुस्तके, कथा, टीका. वगैरे नावावर. शिवाय काही पुरस्कार, व्यास, कुमार आसान वगैरे.



त्यांच्या ध्यानीमनीही नसताना किंवा त्यांची नवीन काही पुस्तके बाजारात आली नसताना, बहुतांश लोकांना, वाचकांना त्यांची फारशी क्रेझ नसताना एके दिवशी त्यांना अचानक फोन गेला.

''केदारनाथजी नमस्कार. बऱ्याच दिवसात आपली खबरबात नाही... तब्येत कशी आहे? मी खास तुम्हाला एका बातमी देण्यासाठी फोन करतोय. भारतीय ज्ञानपीठाच्या वतीने एक विनंती करायची आहे. यंदाचा ज्ञानपीठ पुरस्कार तुम्हाला देण्याचा एकमताने निर्णय झाला आहे. आपण तो स्वीकारावा. आपली संमती मी गृहीत धरतो आहे.''

आता ज्ञानपीठाचा एक भूतपूर्व मानकरीच ही बातमी देत आहे; तेव्हा केदारनाथ सिंह एकदम अवाक् झाले असणार. काय प्रतिक्रिया द्यावी असा त्यांना प्रश्न पडला असावा. ''केदारनाथाजी, माझे बोलणे ऐकू येतेय ना?...'' तेवढ्यात फोन कट झाला. ''हे दिल्लीतले फोन ना!'' म्हणत हताश मुद्रेने निवड समितीचे अध्यक्ष आजूबाजूला बघू लागले. प्रवर समितीचे सात सदस्य-ज्ञानपीठचे संचालक-सर्वच स्तब्ध. त्या मूकनाट्याचे अगतिक प्रेक्षक.

ज्ञानपीठचे संचालक पुन्हा फोन लावतात. आता आवाज नीट ऐकू येतो. अध्यक्ष आधीचीच रेकॉर्ड वाजवून म्हणतात, ''येथे माझ्याबरोबर प्रवर समितीचे... हे सगळे बसले आहेत. त्या सर्वांची इच्छा आहे– आपण संमती द्यावी... तशी ती गृहीत धरलेलीच आहे...''

केदारनाथजी आता आश्चर्याच्या धक्क्यातून सावरलेले असणार. ते म्हणतात, ''मी काय बोलू? या पुरस्कारासाठी माझी आठवण... माझी

निवड... मला धन्यता वाटते. मला अजिबात कल्पना नव्हती. त्यामुळे आश्चर्य वाटले खरे! सर्वांना धन्यवाद. आपल्यालाही धन्यवाद.''

असा काहीतरी संवाद त्यावेळी झाला असणार.

आपल्या बापट-पाडगावकर-करंदीकर, दिलीप चित्रे, नारायण सुर्वे यांना समकालीन असणारे केदारनाथ हे हिंदी कवी. उत्तर प्रदेशातील बालियाँ जिल्ह्यातील चाकिया गावी ७ जुलै १९३४ रोजी त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षणही खेड्यातच झाले. बनारस येथील उदयप्रताप महाविद्यालयामध्ये पदवीपर्यंतचे अध्ययन झाले. काशी हिंदू विद्यालयातून बी.ए.पदवी घेतली. (१९५६) माध्यमिक विद्यालयात हिंदीचे शिक्षक म्हणून काम करीत एम.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर १९६४ मध्ये पीएच. डी. झाले. बनारसमधील अनेक महाविद्यालयांत तसेच गोरखपूर वगैरे ठिकाणीही त्यांनी अध्यापन केले. १९७८ मध्ये हिंदीचे प्राध्यापक म्हणून दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयात त्यांची नेमणूक झाली; आणि त्यांच्या आयुष्याला स्थैर्य लाभले. याच विद्यापीठातून ते १९९९ मध्ये विभागप्रमुख निवृत्त झाले. पुढे प्रोफेसर एमेरिटस म्हणूनही त्यांची नियुक्ती झाली.

बनारस येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना केदारनाथ यांचा प्रागतिक लेखक संघाच्या सदस्यांशी स्नेह जुळला. ग्रामीण जीवनातील दारिद्र्याचा आणि अभावाचा प्रत्यक्ष अनुभव आणि भोजपुरी भाषेतील लोकसाहित्याचे आईकडून झालेले संस्कार यांच्या पार्श्वभूमीवर डाव्या विचारसरणीचे आकर्षण कोणाही तरुणाला वाटावे असा तो काळ होता. साहित्यातील नव्या प्रवाहांचाही झपाटा विलक्षण होता. प्रा. नामवर सिंह, हजारीप्रसाद द्विवेदी, त्रिलोचन शास्त्री यांचा सहवास तरुण केदारनाथ यांचे वैचारिक अधिष्ठान परिपुष्ट करणारा ठरला. तारुण्यसुलभ वयात कविता हे माध्यम त्यांना आकर्षक वाटले. पाब्लो नरुदा, बर्थोल्ट ब्रेश्ट, पॉल एलॉर्ड (र्ल्ट्टें) यांच्या आक्रमक, रांगड्या भाषेचे आणि अभिव्यक्तीचे वेगळेपणही प्रभावी वाटले. लोकसाहित्याशी असणारी नाळ त्यामुळे अधिक दृढझाली. प्रतीक-प्रतिमांची नवनवी स्फुरणे आविष्काराला आशयघनता देऊ शकतात हे लक्षात आले. बनारसच्या वास्तव्यातच परंपरा, सनातनीपणा, धार्मिकता आणि आधुनिकता, सामाजिक समता यांच्या जाणिवांमधील अंतर्विरोध धारदार होत गेले. पाश्चात्य मूल्ये आणि पाश्चात्य जीवनशैली यांच्यापेक्षा

आपली भारतीय मूल्ये आणि जीवनशैली हीन वा गौण आहे; असे त्यांना कधीच वाटले नाही. आपल्या भोजपुरी भाषेचा त्यांना सातत्याने अभिमानच वाटत राहिला. त्यांच्या आरंभीच्या कविता याच उमाळ्यातून लिहिल्या गेल्या. त्या 'अभी बिलकुल अभी' या त्यांच्या पुस्तकात संकलित केल्या गेल्या. १९६० साली प्रसिद्ध झालेला त्यांचा हा पहिला काव्यसंग्रह जाणकारांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. पाश्चात्य विज्ञाननिष्ठा आणि तंत्रज्ञानातील प्रगती यामध्ये आपल्या आधुनिकतेची बीजे आहेत हेही त्यांना जाणवले; परंतु त्यामुळे न्यूनगंडाची भावना बाळगण्याचे काही कारण नाही; आपली भारतीय सांस्कृतिक संपन्नता आणि परंपरागत हस्तकला कौशल्ये तथाकथित आधुनिकतेपेक्षाही अधिक स्वयंपूर्ण स्वावलंबी जीवनाची निदर्शक आहेत असे त्यांना वाटे. येथील लोकांचे अडाणीपण आणि अज्ञान आजच्या तथाकथित मध्यवर्गीय साक्षरांच्या तुलनेत तुच्छ मानण्याचे कारण नाही अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे कट्टर डाव्या विचारसरणीपेक्षा मानवतावादी दृष्टिकोनातून ते जातिभेद, धार्मिक संघर्ष रूढी-परंपरा, पर्यावरणाचा ऱ्हास वगैरे प्रश्नांकडे पाहत.

'अभी बिलकुल अभी' या संग्रहानंतरचा बराच कालखंड हा जीवनसंघर्षात गेला. दिल्लीला जेएन विद्यापीठात १९७८ साली नियुक्ती झाल्यावर, घरप्रपंचाची घडी नीट बसली आणि त्यांचे लेखन नव्या जोमाने सुरू झाले. १९८० मध्ये 'जमीं पक रही है', १९८३ मध्ये 'यहाँ से देखो' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. प्रतिनिधी कविताएं (१९८५) मध्ये निवडक कवितांचे संकलन केले गेले. १९८८ मध्ये 'अकाल में सारस' हा संग्रह आला आणि केदारनाथ यांची प्रतिष्ठित हिंदी कवींमध्ये गणना होऊ लागली . तर 'कबीर और अन्य कविताएं' (१९९५), 'बाघ' (१९९६) या संग्रहांनीही पुरस्कार मिळवले. साहित्य अकादमी, कुमारन आसन, व्यास सन्मान यांचा खास निर्देश करता येईल.

मेरे समय के शब्द, कल्पना और छायावाद, हिंदी कवितामें बिम्ब विधान, कब्रिस्तानमें पंचायत या पुस्तकात समीक्षात्मक लेख आणि अभ्यासपूर्ण लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यांच्या काही कवितांचे अनुवाद इंग्लिश, डच वगैरे भाषांत अनुवाद झाले आहेत. वानगीदाखल एका कवितेचा अंश येथे देतो.

तुझा विश्वास बसतोय का
की, आजच्या सूर्यामध्ये आगामी शतकातील
शनिवारची ऊब सामावलेली आहे?
आत्ता या क्षणी
या शहरातील एकूण एक झाडेझुडपे
आपल्या अस्तित्वासाठी
आठव्या शतकात खोलवर पेरलेल्या
हिरव्याकंच खतामधून आपले जीवनद्रव्य घेत आहेत.

...केदारनाथ यांच्या एकूण लेखनाचा पसारा पंधरा-वीस पुस्तकांपेक्षा जास्त नाही. त्यांच्या समकालीन लेखककवींमध्ये पन्नासपेक्षा जास्त पुस्तके लिहिणारे अनेकजण आहेत. केदारनाथ यांचे लेखनही इ. स. २००० नंतर जवळजवळ थांबलेच आहे. दिल्लीतील साहित्यिक सभासंमेलनात ते सध्या फारसे दिसत नाहीत. वयोमानाप्रमाणे त्यांची भ्रमंतीही सीमित आहे. तरुणवर्गाशी वाङ्मयीन संपर्कावरही मर्यादा आल्या आहेत.

खरे सांगायचे तर हिंदी साहित्य-पत्रकारिता क्षेत्रात एक चलनी नाणे म्हणून केदारनाथ यांच्याकडे आज पाहिले जात नाही. त्यांनाही याची जाणीव आहे; आणि कुठल्याही मानमरातबासाठी त्यांनी कधी धडपड केल्याचे ऐकिवात नाही. गेला बाजार पद्मश्री - पण तीही नाही.

अशावेळी जवळजवळ विस्मृतीत गेलेल्या, मोजकेच लेखन करणाऱ्या, पंधरा-वीस पुस्तके नावावर असणाऱ्या, कुठल्याही आंदोलनात सक्रिय नसणाऱ्या केदारनाथ यांच्या नावाचे स्मरण ज्ञानपीठसाठी प्राथमिक नावे सुचवणाऱ्या हिंदी निवड समितीच्या एखाद्या सदस्याला व्हावे, आणि हिंदीला दहाव्यांदा ज्ञानपीठ पुरस्कार मिळावा - हे एक नवलच आहे. केदारनाथ यांचे दैवच बलवत्तर म्हणायला हवे. आपल्याकडे अनेक नवेजुने लेखक गुडघ्याला बाशिंग बांधून संमेलनाचे अध्यक्षपद किंवा गल्लीबोळातले पुरस्कार मिळवण्यासाठी धावाधाव करीत असतात. त्या पार्श्वभूमीवर केदारनाथ यांच्यासारख्या निवृत्त-अलिप्त व्यक्तीला ज्ञानपीठ सारखा सर्वोच्च वाङ्मयीन पुरस्कार मिळतो-याचे निश्चितच अप्रूप वाटते. न मागे तयाची रमा होय दासी - असे खरोखरच घडते म्हणायचे.

– शंकर सारडा
मो. ९८२३२६१०२३




## पुणे हास्ययोग परिषद

लोकमान्य हास्ययोग संघ परिवार आयोजित पुणे हास्ययोग परिषदेचे उद्‌घाटन संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांच्या हस्ते झाले. हास्ययोगाचे उद्‌गाते डॉ. मदन कटारिया, माधुरी कटारिया, लोकमान्य हास्ययोग संघ परिवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुभाष देसाई, सुशीला जगताप आदी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात 'हास्यामृत' ही स्मरणिका आणि आदर्श परिवार, विद्यार्थ्यांसाठी हास्ययोग या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. लोकमान्य हास्ययोग परिवाराच्या सदस्यांनी हास्ययोगाचे विविध प्रकार करून दाखविले. देखणे यांनी हास्ययोगाचे तत्त्वज्ञान विशद करताना संत ज्ञानेश्वर यांच्यापासून संत साहित्यामध्ये असलेल्या हास्ययोगाच्या उल्लेखांची माहिती सांगितली. "महाराष्ट्रात हास्ययोग क्लब वाढत आहेत. मात्र, हास्ययोगाच्या खोलात जाऊन संशोधन करण्याची गरज आहे," असे डॉ. कटारिया यांनी सांगितले.

हास्ययोगाची चळवळ समाजात अधिक खोलवर रुजण्यासाठी बंगळूरूमध्ये हास्ययोग विद्यापीठ सुरू होत असल्याची माहिती डॉ. कटारिया यांनी दिली. ऑगस्टमध्ये हे विद्यापीठ कार्यान्वित होणार असून, जगभरातील हास्ययोग तज्ज्ञ यात मार्गदर्शन करणार आहेत.

## नेहरूंचे परराष्ट्र धोरण

"भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या धोरणाचे महत्त्व आजच्या काळातही अबाधित असून, नेहरू यांनी भारताविषयी मांडलेला विचार अजून संपुष्टात आलेला नाही," असे मत भारतीय परराष्ट्र सेवेतील निवृत्त अधिकारी एम. के. भद्रकुमार यांनी व्यक्त केले.

बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाचे दिवंगत प्राचार्य प्रा. एस.व्ही.

कोगेकर यांच्या स्मृतिनिमित्त 'सेंटर फॉर ॲडव्हान्स स्ट्रॅटजिक स्टडीज' तर्फे (कॅस) 'पंडित जवाहरलाल नेहरूंच्या परराष्ट्र धोरणांचा आजच्या काळातील अन्वयार्थ' या विषयावर व्याख्यान झाले. विविध देशांत भारताचे राजदूतपद भूषविलेले एम. के. मंगलमूर्ती, निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले आदी उपस्थित होते.

## 'भैरू'ची धमाल

आदित्य इंगळे दिग्दर्शित बहुचर्चित 'आंधळी कोशिंबीर' सिनेमातील 'भैरू' गाण्याच्या व्हिडिओंनी सध्या सोशल नेटवर्किंग मीडियावर धमाल उडवून दिली आहे. विविध रेडिओ आणि टीव्ही चॅनल्सवरसुद्धा हे गाणं बरंच गाजतंय. अशोक सराफ, वंदना गुप्ते, आनंद इंगळे, हृषीकेश जोशींसारख्या दिग्गज कलाकारांमुळे हा सिनेमा आधीपासूनच चर्चेत होता. अनिकेत विश्वासराव, हेमंत ढोमे, प्रिया बापट आणि मृण्मयी देशपांडे यांच्यावर चित्रित झालेल्या वैभव जोशी लिखित या गाण्याला नरेंद्र भिडे यांनी संगीत दिले आहे. मराठीतला रॉक स्टार अवधूत गुप्ते आणि आघाडीची गायिका जान्हवी प्रभू अरोरा यांनी हे गीत म्हटले आहे. याचे नृत्य दिग्दर्शन अभिनेत्री मृण्मयी देशपांडेने केले आहे. हे गाणे ज्या पात्रांवर चित्रित झालेय ती पात्रे एकाहून एक नमुनेदार आणि डोक्याने जरा सरकलेली असल्यामुळे त्यांचा स्वभाव लक्षात घेऊन डान्स स्टेप्स बसवाव्या लागल्या. नरेंद्र भिडे आणि वैभव जोशी म्हणाले, 'हे गाणे सिनेमात एका दृष्याचाच भाग म्हणून चित्रविचित्र पात्रांच्या भूमिकेतून मांडायचे असल्यामुळे आव्हानात्मक होते. त्याला मिळणारा प्रतिसाद बघून आमच्या संपूर्ण टीममध्ये उत्साहाचे वातावरण आहे.'

या धमाल गाण्याबरोबरच सिनेमात अजून दोन गाणी असून त्यापैकी एक गाणे प्रसिद्ध गायक शंकर महादेवन आणि विभावरी जोशी यांनी गायले आहे. शीर्षक गीत अविनाश विश्वजीत या संगीतकार जोडीने केले असून अवधूत गुप्तेने म्हटले आहे.

## नोंदणी कार्यालयात हजारो दस्त पडून

दस्त नोंदणी झाल्यांनतर ज्या मालकांनी मूळ दस्त परत नेलेले नाही असे हजारो दस्त, नोंदणी निरीक्षकांच्या कार्यालयात धूळ खात पडून आहेत.

मूळ मालकांनी हे दस्त परत न्यावेत, यासाठी नोंदणी कार्यालयाकडून प्रयत्न होत नाहीत. पुणे शहर व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जमिनीचे व्यवहार होतात. यासाठी १९९८पासून दस्त नोंदणीच्या कामाचे संगणकीकरण करण्यात आले. यापूर्वी दस्त नोंदणी झाल्यानंतर मूळ दस्त मालकाला परत न देता त्यांची छायांकित प्रत दिली जात असे. यासाठी मूळ दस्त फोटोझिंको कार्यालयात पाठवून दिला जात असे. पोस्ट कार्ड आकाराच्या कागदावर फोटो कॉपी केल्यानंतर अर्जदाराने अर्ज केल्यास मालकास मूळ दस्त उपलब्ध करून दिला जात असे. फोटो कॉपी करण्यासाठी जास्त कालावधी लागत असल्यामुळे हजारो मूळ दस्त कार्यालयांमध्ये साठून ही पद्धत कालबाह्य झाल्यानंतरही हे दस्त पुणे शहर व जिल्ह्यातील सर्वच नोंदणी कार्यालयात पडून आहेत.

काही कार्यालयांमध्ये पावसाळ्यात पाणी साठत असल्यामुळे दस्तांचे नुकसान होते, अशी तक्रार नागरी हक्क संस्थेचे सुधीर कुलकर्णी यांनी केली आहे.

## मंत्रालयांसाठी 'सोशल मीडिया हब'

केंद्र सरकारच्या सर्व मंत्रालयांनी सोशल मीडियावर अपडेट राहावे, या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आदेशापाठोपाठ माहिती व प्रसारण खात्याने सर्व मंत्रालयासाठी 'सोशल मीडिया हब' तयार केला आहे. याद्वारे मंत्रालयांना फेसबुक, ट्विटर यांसारख्या सोशल मीडिया साइटवर माहिती पोचवणे सुलभ होईल.

लोकसभा निवडणुकीदरम्यान तरुण मतदारांमध्ये नरेंद्र मोदींची छबी तयार करण्यात सोशल मीडियाने मोठा हातभार लावला होता. आता सरकारचीही प्रसिद्धी या माध्यमाद्वारेच करण्याचा प्रयत्न मोदी सरकारचा आहे. त्या पार्श्वभूमीवर माहिती व प्रसारण राज्यमंत्री प्रकाश जावडेकर यांनी संसदीय कार्य राज्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर सोशल मीडिया हबबद्दल माहिती दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या इच्छेनुसार सर्व मंत्रालयांची धोरणे आणि सरकारचे निर्णय याबाबतची माहिती जनतेपर्यंत पोचवण्यासाठी आणि जनतेचा अभिप्राय जाणून घेण्यासाठी सोशल मीडियाचा वापर उपयुक्त ठरेल.

## 'बर्डस्नॅप' ॲपची संशोधकांकडून निर्मिती

न्यूयॉर्क शहरातील कोलंबिया इंजिनीअरिंगमधील संशोधकांनी प्रा. पीटर बेल ह्युमर यांच्या नेतृत्वाखाली पक्ष्यांची ओळख पटविणाऱ्या ॲपची निर्मिती केली आहे. 'बर्डस्नॅप' असे या ॲपचे नाव असून, त्यासाठी कम्प्युटर व्हिजन आणि मशिन लर्निंग टेक्निकचा वापर करण्यात आला आहे. सध्या हे ॲप केवळ 'आयफोन' वरच उपलब्ध असून, लवकरच ते ॲंड्रॉइडसह अन्य ऑपरेटिंग सिस्टीमवर पाहायला मिळेल.

ॲपच्या पहिल्या टप्प्यात उत्तर अमेरिकेत सर्वसामान्यपणे आढळणाऱ्या ५०० हून अधिक पक्ष्यांच्या माहितीचा फोटोसह अंतर्भाव करण्यात आला आहे. एखादा नवा पक्षी आढळल्यास युजरने फोटो काढून ॲपवर अथवा ॲपच्या वेबसाइटकर डाउनलोड करण्याचाच अवकाश....ॲप आणि वेबसाइटवर मिळून उपलब्ध पन्नास हजारपेक्षा अधिक फोटोंच्या माध्यमातून त्या पक्ष्यांची इत्थंभूत माहिती युजरला मिळेल, असा संशोधकांचा दावा आहे.

पक्षीअभ्यासक आणि पर्यटक या दोघांसाठी 'बर्डस्नॅप' हे उपयोगी ॲप असून, पक्ष्यांच्या प्रजातींविषयीची माहिती वर्णमालिकेच्या क्रमांनुसार उपलब्ध होणार आहे, ॲपनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यात वृक्ष आणि वन्य प्राण्यांविषयी माहिती उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहिती बेल ह्युमर यांनी दिली. एखाद्या पक्ष्याचे वर्णन केल्यास त्याच्याशी संबंधित अन्य पक्ष्यांची माहिती युजरला देण्यात येईल असे ते म्हणाले.

युजरने फोटो अथवा निरीक्षणे पाठविल्यानंतर 'बर्डस्नॅप' पक्ष्याच्या जवळ जाणारी माहिती, त्यात त्याचे नाव, मूळस्थान, स्थलांतरित आहे की स्थानिक आदींची माहिती पाठवेल. त्यासोबतच त्या पक्ष्याची तपशीलवार निरीक्षणे घेण्याविषयी मागदर्शन करेल, जेणेकरून पक्ष्याची जास्तीतजास्त माहिती संकलित होऊ शकेल. या माहितीमध्ये पक्ष्यांचे डोळे, चोच, विशिष्ट ठेवण, आवाज, सवयी, उडण्याचे प्रकार आदींचा समावेश आहे.

## ट्विटर युजर्समध्ये लवकरच भारत जगात तिसऱ्या स्थानी

जगभरात ट्विटर युजर्सची संख्या वाढत असताना, या वर्षाच्या अखेरपर्यंत भारत तिसऱ्या क्रमांकावर झेप घेईल. डिसेंबर अखेरपर्यंत भारतातील ट्विटर युजर्समध्ये एक कोटी ८० लाखांची भर पडेल, असे 'ई मार्केट' या संशोधन संस्थेने म्हटले आहे.

ट्विटर युजर्सच्या संख्येत आशिया पॅसिफिक क्षेत्रात ३२.९ टक्के, तर उत्तर अमेरिकेत २३.७ टक्के वाढ होईल. इंडोनेशिया चौथ्या क्रमांकावर झेपावेल. या वर्षांच्या अखेरपर्यंत ट्विटर युजर्सच्या संख्येत भारतात १ कोटी ८० लाखांची, तर इंडोनेशियात १ कोटी ५० लाखांची वाढअपेक्षित आहे.

## 'निंबस' द्वारे एकाच ठिकाणाहून रुग्णावर उपचार

सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हॉन्सड कॉम्प्युटिंगने (सीडॅक) 'मर्क्युरीटीएम निंबस' संच विकसित केला आहे. या संचामुळे खासगी व सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील डॉक्टरांना एकाच ठिकाणाहून रुग्णाला प्राथमिक उपचारासह तज्ज्ञांचा सल्ला देणे सोयीचे होणार आहे.

'महाटेलिमेडिकॉन-१३' परिषदेत हा संच कार्यान्वित करण्यात आला. दूरसंचार, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभागाकडून विकसित करण्यात आलेल्या प्रकल्पातील संकल्पना आणि तंत्रज्ञानाचा आधार घेऊन 'सीडॅक'च्या 'मेडिकल इन्फर्मेटिक्स ग्रुप'ने हा संच विकसित केला, असे 'सीडॅक'चे विभागप्रमुख पी. के. सिन्हा म्हणाले.

''सध्या हा संच 'विंडोज अझूर' या क्लाऊड सेवेसह कार्यान्वित आहे. यामुळे डॉक्टर आणि तज्ज्ञांना महागडे हार्डवेअर किंवा संगणक साहित्य विकत घेण्याची आवश्यकता नाही. शिवाय 'निंबस' चे व्यवस्थापनही अत्यंत सोयीचे आणि कमी खर्चिक आहे. आरोग्य सेवेच्या वितरणासाठी 'निंबस' फायदेशीर ठरणार असून, भविष्यात सर्वच क्लाउड सेवांसाठी ते उपलब्ध करून दिले जाणार आहे.''

क्लाउडवर मर्क्युरी, मर्क्युरी क्लाउड संग्रहालय आणि अँड्रॉईडसाठी मर्क्युरी अशी या संचाची टूल्स आहेत. त्यामुळे वैद्यकीय नोंदी ठेवणे, त्यांचे व्यवस्थापन करणे आणि उपचारासाठी मार्गदर्शन करणे सोयीचे आणि वेळेत होते. अँड्रॉईड प्रणाली असलेल्या मोबाईल फोनवरही ही सेवा वापरता येणार आहे.

'विंडोज अझूर' वरून गरजेप्रमाणे क्लाऊडचे सबस्क्रिप्शन घेता येईल. या सेवेचा परवाना घेण्यासाठी सीडॅककडे २५ हजार रुपये भरायचे आहेत. त्यानंतर दोन युजर मिळतील. व्हर्च्युअल इन्स्टन्सचा वापर करून सर्व्हरच्या मदतीशिवाय ही सेवा मिळाल्याने वेळ आणि पैशाची बचत होणार आहे.

डॉ. पी. के. सिन्हा, गौर सुंदर, प्रफुल्ल कोलते, शैलेंद्र नरवारिया,

अंकित ओझा, सौनिल कौर, दीपांकर दीक्षित हे या गॅजेटच्या संशोधनात सहभागी होते.

## ‘पेटवर्क १८ मीडिया’ रिलायन्स इंडस्ट्रिजकडे

रिलायन्स इंडस्ट्रिजने ‘पेटवर्क १८मीडिया अँड इन्व्हेस्टमेंट’ (एनडब्ल्यू १८) तसेच दुय्यम अंगभूत कंपनी ‘टीव्ही १८ब्रॉडकास्ट’ यांचा ताबा मिळविला. रिलायन्स इंडस्ट्रीजच्या संचालक मंडळाने चार हजार कोटी रुपयांचा निधी ‘इंडिपेंडंट मीडिया ट्रस्ट’ला (आयएमटी) मंजूर केला. रिलायन्स इंडस्ट्रिज ही ‘आयएमटी’ची एकमेव लाभार्थी आहे.

डिजिटल इंटरनेट प्रॉपर्टीज, ई-कॉमर्स बिझनेस आणि ब्रॉडकास्ट कंटेंटचा ताबा ‘एनडब्ल्यू १८’ कंपनीकडे होता. ‘आयएमटी’चा निधी ‘एनडब्ल्यू १८’ आणि ‘टीव्ही १८’यांचा ताबा मिळविण्यासाठी वापरण्यात येईल, असे कंपनीने स्पष्ट केले आहे. त्यामध्ये रिलायन्स इंडस्ट्रीजचा ‘एनडब्ल्यू’ मध्ये ७८ टक्के आणि ‘टीव्ही १८’मध्ये ९ टक्के मालकीहक्क असणार आहे. या व्यवहारामुळे रिलायन्सच्या ‘फोर-जी’ व्यवसायाच्या जोडीला दूरसंचार, वेध आणि डिजिटल कॉमर्सला चालना मिळेल.

सध्या डिजिटल प्रॉपर्टीजमध्ये ‘इनडॉट कॉम’, ‘आयबीएन लाइव्ह’, ‘मनी कंट्रोल’, ‘फर्स्ट पोस्ट’, ‘क्रिकेट नेक्स्ट’, ‘होम शॉप १८’, ‘बुक माय शो’ यांचा, तसेच ‘कलर्स’, ‘सीएनएन आयबीएन’, ‘सीएनबीसी टीव्ही १८’, ‘सीएनबीसी आवाज’ या वाहिन्यांचा समावेश आहे.

## ‘पूर्णम इकोव्हिजन’ कडून ‘कलेक्शन पॉइंट्स’

कपडे, काचा, नायलॉन आणि ई-वेस्ट स्वरूपातील अगदी टाकाऊ वस्तू गोळा करण्यासाठी सध्या ‘पूर्णम इकोव्हिजन’ तर्फे काही कलेक्शन पॉइंट्स तयार करण्यात आले आहेत. नवश्या मारुती, बाणेर-बालेवाडी, पिंपळे सौदागर आणि डहाणूकर कॉलनी या भागात दर महिन्याला ठराविक दिवशी टाकाऊ वस्तू गोळा केल्या जातात. त्यांचा पुनर्वापर करून उपयुक्त वस्तूंची निर्मिती केली जाते. त्या वस्तू मॉडेल कॉलनीतील ‘प्लॅनेट आर’या आऊटलेटमध्ये विक्रीसाठी ठेवल्या जातात.

‘असे आणखीही काही कलेक्शन पॉइंट्स येत्या काळात सुरू होतील. काही आयटी कंपन्यांमध्येही असे पॉइंट्स उभारण्यासाठी ‘कॉर्पोरेट सोशल

रिस्पॉन्सिबिलिटी फंड’ मधून निधी उभा करण्याच्या पर्यायाची ही चाचपणी केली जात आहे,’ असे ‘पूर्णम इकोव्हिजन’चे डॉ. राजेश मणेरीकर यांनी सांगितले. या वस्तूंच्या ‘कलेक्शन ड्राइव्ह’मध्ये जनाधार या स्वयंसेवी संस्थेचे योगदान आहे.

‘फुटलेल्या काचा, निकामी ट्यूब, बल्ब, वाया गेलेले मॉनिटर्स किंवा अन्य ई-वेस्ट यांची पर्यावरणदृष्ट्या योग्य प्रकारे विल्हेवाट लावणाऱ्या किंवा पुनर्वापर करणाऱ्या एका मोठ्या मान्यताप्राप्त संस्थेशी आम्ही जोडून घेतले आहे. आमच्याकडे गोळा झालेल्या टाकाऊ वस्तू त्या संस्थेकडे दिल्या जातात. त्यामुळे त्या वस्तू पर्यावरणात येणे टाळले जाते आणि त्यापासून होणाऱ्या प्रदूषणालाही काही प्रमाणात आळा बसतो,’ असे डॉ. राजेश म्हणाले.

पर्यावरण संरक्षणासाठी नुसती घोषणाबाजी करून उपयोग नाही; तर अशा सक्रिय पर्यावरणशास्त्रज्ञांची समाजाला गरज आहे. पर्यावरण संरक्षणाला हातभार लावण्यासाठी नागरिकांना हा उपक्रम नक्की उपयुक्त ठरेल.

कचरा व्यवस्थापनातील स्वयंसेवक म्हणून किंवा ‘पूर्णम इकोव्हिजन’चे ‘रिसोर्स पर्सन’ म्हणून, तसेच स्वत: टाकाऊ वस्तू देऊन नागरिक या उपक्रमात सहभागी होऊ शकतात.

आउटलेटमध्ये काय काय मिळते?

- जीन्स, साड्या आणि अन्य कपड्यांपासून बनवलेले आकर्षक डिझाइन्सचे फोल्डर्स, पाउच, पिशव्या, मोठ्या बॅग्ज, छोट्या-मोठ्या लेडीज पर्स, पाकिटे
- रिसायकल्ड कागदापासून बनवलेल्या वह्या, नोटपॅड्स
- नारळाच्या कागदापासून बनवलेल्या घरगुती वापराच्या विविध वस्तू
- सुपारीच्या पानांपासून बनवलेल्या डिश, वाट्या
- हेल्मेटपासून बनवलेल्या कुंड्या
- प्लॅस्टिकच्या बाटल्या आणि कागदाचा लगदा यांपासून बनवलेले फ्लॉवरपॉट पाच-दहा रुपयांच्या साध्या कापडी पिशव्यांपासून, ५०० रुपयांपर्यंतच्या बॅगांपर्यंतच्या वस्तू उपलब्ध आहेत.

## रिडम्शन व्हाउचरही

‘आम्ही तुम्हाला आणून देत असलेल्या वस्तू टाकाऊ असल्या, तरी

त्यापासून पुढे काहीतरी बनवले जाणार असते. मग त्याबद्दल आम्हाला काय मिळणार?' असा प्रश्न विचारला जात होता. अर्थात, तशी अपेक्षा असणेही काही चुकीचे नव्हते. त्यामुळे मग आम्हाला येणारा खर्च आणि अन्य बाबींचा विचार करून रिडम्शन व्हाउचर द्यायचे ठरवले. अशा टाकाऊ वस्तू देऊन आपल्याला छोटेसे का होईना, पण काहीतरी मिळणार आहे, या भावनेतून नागरिकांना आणखी प्रोत्साहन मिळू शकेल असे वाटले,' असे डॉ. राजेश यांनी सांगितले. 'पूर्णम'कडे आणून दिलेल्या टाकाऊ वस्तूंना सरसकट पाच रुपये किलो दर दिला जातो आणि तेवढ्या किंमतीचे रिडम्शन व्हाउचर दिले जाते. तीन महिने वैधता असलेल्या त्या व्हाउचरच्या साह्याने 'प्लॅनेट आर' या आउटलेटमधील वस्तूंची खरेदी करता येते.

## फुलपाखरांवरही होतोय हवामानबदलाचा परिणाम

वाढत्या तापमानाचा परिणाम फुलपाखरांवर होत असल्याचे संशोधनात आढळले आहे. गडद रंगाच्या फुलपाखरांची थंड प्रदेशात, तर फिकट रंगाच्या फुलपाखरांची उष्ण वातावरणात जोमाने वाढहोते असे संशोधकांचे म्हणणे आहे. 'नेचर कम्युनिकेशन्स' या जर्नलमध्ये हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. संशोधक पथकाने १९८८ते२००६दरम्यान युरोपातील फुलपाखरांच्या ३६६ आणि पतंगांच्या १०७ जातींचा अभ्यास केला. त्यात युरोपाच्या दक्षिणेकडील उष्ण भागात फिकट रंगाच्या, तर उत्तरेकडील आल्प्स आणि बाल्कन या थंड प्रदेशात गडद रंगाच्या फुलपाखरांच्या प्रजाती आढळल्या. ब्रिटनमध्ये गेल्या वर्षी उन्हाळा वाढल्याने लार्ज व्हाइट, कॅबेज व्हाइट आणि क्लाउडेड यलो सोअर ही फिकट रंगांची फुलपाखरे आढळली होती. 'द डार्क ब्ल्यू' प्रजातीतील गडद रंगाचे फुलपाखरू २०१० मध्ये तब्बल ५७ वर्षांनी प्रथमच सापडले. फिक्कट रंगाच्या कीटकांमध्ये उष्णता परावर्तित करण्याची क्षमता असल्याने ते उष्ण हवामानाशी जुळवून घेतात. लंडनमधील इंपिरियल महाविद्यालयाचे कार्स्टन राहबेक यांनी सांगितले, "हवामान बदलामुळे अनेक कीटकांनी आपला अधिवास बदलला आहे. निसर्ग आणि पर्यावरण संस्था बदलत आहेत."

## 'बालभारती' – पहिली ते आठवीची ९ कोटी पुस्तके

पाठ्यपुस्तकांची छपाई अद्याप पूर्ण झालेली नाही... पुस्तक अजून

बाजारात आलेले नाही... आधी शाळा; नंतर पुस्तके असे का.. अशा तक्रारी शाळा सुरू झाल्यानंतर दरवर्षी ऐकू येतात; पण यंदा त्या तक्रारी येऊ नयेत, म्हणून 'बालभारती'ने शाळा सुरू होण्याआधीच बाजारात पहिली ते आठवी सर्व विषयांची आणि सर्व भाषांमधील पुस्तके उपलब्ध आहेत, असे पहिल्यांदाच घडले आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने अभ्यासक्रम ठरविल्यानंतर 'बालभारती'तर्फे पहिली ते आठवीची पुस्तके छापून बाजारात उपलब्ध करून दिली जातात. यंदा या इयत्तांची ९ कोटी ९ लाख पुस्तके मराठीसह, इंग्रजी, उर्दू, हिंदी, गुजराथी, कन्नड, सिंधी, तेलगू अशा भाषांमध्ये छापून तयार आहेत. यातील सात कोटी ३८ लाख पुस्तके सर्व शिक्षा अभियानांतर्गत राज्यातील शाळांमधून विद्यार्थ्यांना मोफत वाटण्यात आली आहेत. यंदा तिसरीचा व चौथीचा अभ्यासक्रम बदलला आहे. त्यामुळे तिसरीला चार आणि चौथीला पाच विषयांची पुस्तके आहेत. याशिवाय, सर्व शिक्षा अभियानांतर्गत दिल्या जाणाऱ्या मोफत पुस्तकांचा पुरवठा बहुतांशी पूर्ण झाला आहे. 'बालभारती'तही पुस्तक विक्री केंद्र सुरू आहे.

## विद्यापीठात मराठी विभागासाठी दोनच वर्ग

पुणे विद्यापीठातील मराठी विभाग केवळ दोन वर्गखोल्यांवर चालू आहे. त्यामुळे पदविका अभ्यासक्रमाचे वर्ग काही वेळा अध्यापकांना त्यांच्या कार्यालयात घ्यावे लागत आहेत.

मराठी विभागात 'एमए'साठी ६० आणि 'एमफिल'साठी २० अशी एकूण १४० प्रवेश क्षमता आहे. या विभागाने काही पदविका अभ्यासक्रमही सुरू केले आहेत. परंतु त्यांचे वर्ग घेण्यासाठी खोल्या उपलब्ध नाहीत. प्रशासकीय लेखन, ग्रंथनिर्मिती व्यवहार, पटकथालेखन, अमराठी विद्यार्थ्यांसाठी मराठीच्या पदविका अभ्यासक्रमांपैकी केवळ अमराठीसाठी मराठी हा अभ्यासक्रम सुरू आहे. गेल्या पाच वर्षांपासून प्रशासनाकडे वर्गखोल्या वाढवून देण्याची मागणी केली जात आहे.

पीएचडीसाठी 'कोर्स वर्क'चे वर्ग सुरू झाले आहेत. वर्गखोल्यांअभावी त्यांचे वेळापत्रक तयार करताना कसरत करावी लागत आहे. नवीन पुस्तके ठेवण्यासाठी ही जागा अपुरी पडते. किमान आणखी चार खोल्यांची विभागाला गरज आहे.

विभागप्रमुख डॉ. विद्यागौरी टिळक म्हणाल्या, ''मराठी विभागाला वर्गखोल्या मिळाव्यात म्हणून प्रशासनाकडे मागणी केली आहे. नवीन बांधकाम झाल्यानंतर खोल्या मिळतील असे सांगण्यात आले.''

## विकासकामामुळे शिवनेरी किल्ला गतवैभवाकडे

शिवरायांचे जन्मस्थळ असलेल्या जुन्नरजवळील शिवनेरीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी विविध विकास कामे सुरू आहेत.

शिवनेरी हा सह्याद्रीच्या कुशीतील प्राचीन गड. छत्रपती शिवाजी महाराजांचा येथे जन्म झाल्याने विशेष महत्त्व असलेला हा किल्ला केंद्र सरकारने २६ मे १९०९मध्ये महाराष्ट्रातील संरक्षित स्मारक म्हणून घोषित केला. चारही बाजूंनी उभ्या कातळाचा चढाव व गडावरील बालेकिल्ला यामुळे जिंकावयास अवघड अशा या गडाची नंतरच्या काळात दुरवस्था झाली. तटबंदी ढासळली. जुन्या इमारती मार्गावरील पायऱ्या, प्रवेशद्वारांची दुर्दशा झाली. वृक्षराजी नष्ट झाली. येथील शिवजन्मभूमी विकास मंडळ, तसेच असंख्य शिवप्रेमींनी या किल्ल्याच्या दुरवस्थेकडे सरकारचे लक्ष वेधले. दहा वर्षांपूर्वी किल्ले शिवनेरी परिसर विकास मंडळाच्या माध्यमातून विकास कार्य सुरू झाले.

शिवनेरी किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे ११०० मीटर उंचीवर, पुण्याच्या वायव्येस १००किलोमीटर अंतरावर आहे. दक्षिणेकडून नागमोडी वळणावळणाच्या रस्त्याने गडाच्या पायथ्यापर्यंत पोचल्यानंतर पायऱ्यांच्या मार्गाने जात असताना नैर्ऋत्येस पहिला दरवाजा लागतो. त्यानंतर परवानगीचा दरवाजा, हत्ती दरवाजा, पीराचा दरवाजा आणि नंतर शिवाई मंदिर असा पहिल्या टप्प्याचा प्रवास पूर्ण होतो. शिवाई देवीचे दर्शन घेऊन पुढे गेल्यानंतर फाटक दरवाजा लागतो. यानंतर गडावरील शेवटचा कुलापकर दरवाजा लागतो. त्यापुढील सपाटीच्या भागावर वास्तूंचे अवशेष पाहावयास मिळतात. पुढे शिवजन्मस्थानाच्या अलीकडे असणारे शिवकुंज व त्यापूर्वी बाराही महिने पिण्याचे थंड पाणी उपलब्ध करून देणारी गंगा-यमुना ही पाण्याची दोन टाकी आहेत. गडावरील ५२ टाक्यांची स्वच्छता करण्यात आली आहे. त्यामुळे पाणीसाठा वाढला आहे.

## भारतीय भाषा ई-बाजारात सरस !

इंग्रजीचे प्रभुत्व असलेल्या इंटरनेट विश्वात आता भारतीय प्रादेशिक भाषांना अधिक पसंती मिळू लागली आहे. भारतीय भाषांमधील माहिती वाढू लागली आहे, याचबरोबर जाहिरातदारही प्रसिद्धीसाठी भारतीय भाषांचा वापर करू लागले आहेत. यामुळे येत्या काळात भारतीय इंटरनेट वापरकर्त्यांना भारतीय भाषांमध्ये अधिकाधिक माहिती उपलब्ध होईल असे भाकीत या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांतर्फे 'अनलॉकिंग इंडियाज टेक्नॉलॉजी पोटेन्शिअल थ्रू लँग्वेज इन्क्लुजन' या विषयावर एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संशोधन करणारी आयएमआरबी इंटरनॅशनल, हिंदी भाषेत सर्च इंजिन चालविणारी रफ्तार, मोबाइल जाहिरात एक्स्चेंज सर्व्हर्स मोबी आणि भारतीय भाषांमध्ये ॲप्स आणि संबंधित सुविधा पुरविणारी कंपनी रिवेरी यांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

भारतात आजही इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या केवळ १३.३टक्के इतकीच आहे. याचे मुख्य कारण म्हणजे यातील इंग्रजीची मक्तेदारी हेच असल्याचे आयएमआरबीचे प्रवक्ते तरुण अभिचंदानी यांनी स्पष्ट केले. सध्या इंटरनेट विश्वात भारतीय भाषांमधील माहिती मोठ्या प्रमाणावर तयार होत आहे. सन २०१२च्या तुलनेत सन २०१३मध्ये भारतीय भाषांमधील माहिती तयार होण्याचे प्रमाण तब्बल नऊ टक्क्यांनी वाढले. इंटरनेट वापरकर्त्यांपैकी ७०टक्के लोक हे ई-मेलसाठी भारतीय भाषांचा वापर करतात तर ४०टक्के लोक आपल्या मातृभाषेत बातम्या वाचणे पसंत करीत असतात.

## सप्तर्षी दांपत्याला महापालक सन्मान

सर फाउंडेशनचा 'महापालकसन्मान' पुरस्कार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. कुमार सप्तर्षी व डॉ. ऊर्मिला सप्तर्षी या दांपत्याला देण्यात येणार आहे. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष हरीश बुटले म्हणाले, "ज्यांनी अनेकांचे पालकत्व स्वीकारले आहे, अशा व्यक्तींना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार देण्यात येतो. डॉ. सप्तर्षी यांनी समाजवादी विचारांच्या अनेक तरुणांचे पालकत्व स्वीकारल्यामुळे त्यांना हा पुरस्कार देण्यात येत आहे."

## नगर पंचशतकोत्तर रौप्यमहोत्सव

ऐतिहासिक, धार्मिक व सामाजिक परंपरा असलेल्या नगर शहराची वाटचाल पंचशतकोत्तर रौप्य महोत्सवाकडे दिमाखात सुरू झाली आहे.

पंधराव्या शतकाच्या अखेरीस दक्षिण भारतातील बहामनी राजवट फुटल्याने त्याचा एक भाग असलेल्या मलिक अहमद बहिरी (अहमद निजामशहा) याने स्वत:चे राज्य स्थापन करण्याचे प्रयत्न केले. त्याला नेस्तनाबूत करण्यासाठी बिदरचा सेनापती जहांगीर खान त्याच्यावर चालून आला. नगरजवळील भिंगार येथे हे तुंबळ युद्ध झाले व त्यात जहांगीर खानचा पराभव झाला. या आनंदाप्रीत्यर्थ भिंगारजवळच भुईकोट किल्ला उभारण्याची व त्याच्याजवळ नगर शहर वसविण्याची मुहूर्तमेढ २८ मे १४९० या दिवशी मलिक अहमदने रोवली. हाच दिवस नगर शहराचा स्थापना दिन मानला जातो.

आजपर्यंतच्या ५२४ वर्षांच्या वाटचालीत निजामशाही, मोगलशाही, मराठेशाही, पेशवाई, ब्रिटिश व स्वातंत्र्योत्तर स्वकियांचा कालखंड अनुभवलेल्या नगर शहराची तुलना कैरो व बगदाद या शहरांशी होत असे. १९४२च्या चले जाव चळवळीत सहभागी पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेलांसह अन्य राष्ट्रीय नेत्यांना येथील किल्ल्यात स्थानबद्ध केले होते. उत्कृष्ट हवामान असलेले हे शहर आता बदलत्या काळानुसार अत्याधुनिकतेकडे वाटचाल करीत आहे.

नगर शहराच्या ५२४व्या स्थापनादिनानिमित्त शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या बागरोजा हडको येथील कबरस्थानी फुलांची चादर शहर प्रेस क्लबतर्फे अर्पण करण्यात येणार आहे. यावेळी महापौर संग्राम जगताप, जिल्हाधिकारी अनिल कवडे, पोलिस अधीक्षक रावसाहेब शिंदे उपस्थित होते. भिंगारजवळील आलमगीर या ठिकाणी दारूल उलूम या संस्थेने उभारलेल्या आलमगीर लायब्ररीचे उद्‌घाटन झाले आहे. इतिहासप्रेमी मंडळातर्फे उज्ज्वल सांस्कृतिक व साहित्यिक कामगिरीबद्दल ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भि. ना. दहातोंडे, इतिहास संशोधक प्रा. अशोक नेवासकर व डॉ. मिर्झा मोहंमद खिजर यांचा सत्कार महावीर कलादालनात करण्यात आला. यावेळी डॉ. आ. ह. साळुंखे, डॉ. भारत पाटणकर आदी उपस्थित होते.

## ‘रात्र वणव्याची’ पुस्तकावर मालिका

राज्याच्या निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण लिखित ‘रात्र वणव्याची’ या पुस्तकावर आधारित मालिका दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे अशी माहिती अभिनेते विक्रम गोखले यांनी दिली. दूरदर्शनचे अतिरिक्त महासंचालक मुकेश शर्मा, राहुल सोलापूरकर, कांचन जाधव, शंतनू मोघे यांच्यासह मालिकेतील कलाकार या वेळी उपस्थित होते. नीला सत्यनारायण यांनी त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीतील सहकाऱ्यांचे व स्वत:चे अनुभव या पुस्तकात एकत्रित केले आहेत.

गोखले म्हणाले, ‘समाजात स्त्रियांना कळतनकळतपणे दुय्यम दर्जाचे स्थान मिळते. स्त्रियांबद्दलच्या संवेदनशीलतेमध्ये बदल होण्यासाठी ही कथा पडद्यावर आणण्याचा प्रयत्न आहे.’’ सत्यनारायण म्हणाल्या, ‘‘कथेतील नायिका पुरुषप्रधान व्यवस्थेत आपले योग्य स्थान निर्माण करण्याचा कसा प्रयत्न करते, हा संघर्ष या पुस्तकात मांडला आहे. स्त्री-सक्षमीकरण हाच पुस्तकाचा खरा उद्देश आहे. या मालिकेतून सध्याच्या राजकीय व शासकीय व्यवस्थेतील स्त्री-दृष्टिकोन बदलण्यास नक्कीच मदत होईल.’’

जास्तीत जास्त लोकांना प्रेरणा देण्यासाठी ही मालिका भाषांतरित करून दूरदर्शनच्या अन्य राज्यातील वाहिन्यांवर प्रसारित करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे शर्मा यांनी या वेळी सांगितले.

## पंतप्रधानांच्या कविता

‘‘नव्या काव्यप्रेमींना आकृष्ट करण्यासाठी वाचकांची नस ओळखण्याची गरज आहे. त्यानुसार अधिकाधिक साहित्यिक उपक्रम राबविण्याची गरज आहे,’’ असे मत समीक्षक शंकर सारडा यांनी व्यक्त केले. ‘काव्यदीप’ मासिकाच्या नव्या अंकाचे प्रकाशन सारडा यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी आयोजिलेल्या ‘पंतप्रधानांच्या कविता’ या काव्यमैफलीला रसिकांची मनमुराद दाद मिळाली. या वेळी ‘प्रॉपर्टीज’चे संचालक ॲड. मजीद कच्छी, ‘काव्यदीप’चे संस्थापक संचालक प्रदीप निफाडकर, शिरीष चिटणीस आदी उपस्थित होते. मीरा सिरसमकर, शिल्पा चिटणीस आणि निफाडकर यांनी काव्यवाचन केले. जवाहरलाल नेहरूंपासून सुरू होणाऱ्या पंतप्रधानांच्या परंपरेतील अनेकांच्या कवितांचा समावेश यात करण्यात आला होता. अटलबिहारी वाजपेयी, इंद्रकुमार गुजराल, विश्वनाथ प्रतापसिंह आणि

नरेंद्र मोदी आदींच्या अपरिचित कवितांना रसिकांची पसंती मिळाली. यासोबत पंतप्रधानांच्या आठवणी, किस्से सांगितले गेले. राजकारण, प्रेम, आयुष्य अशा अनेकविध विषयांचा यात समावेश होता.

## रुबाई ही भावगर्भ कविताच

गजल आणि रुबाई म्हटले की मराठी माणसे नाक मुरडतात. पण, चार ओळींमध्ये भावगर्भ आशय सांगणारी रुबाई ही सशक्त कविताच असते, असे मत प्रसिद्ध रुबाईकार हिमांशु कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

उत्कर्ष प्रकाशनतर्फे ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव यांच्या 'मराठी रुबाया' या संग्रहाचे प्रकाशन हिमांशु कुलकर्णी याच्या हस्ते झाले. ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. स्वरानंद प्रतिष्ठानचे प्रा. प्रकाश भोंडे आणि प्रकाशक सु. वा. जोशी या वेळी उपस्थित होते.

हिमांशु कुलकर्णी म्हणाले, रुबाईचा बाप म्हणजे उमर खय्याम. नऊ शतकांनंतरही खय्यामच्या रुबाया सनातन सत्यासाठी शाश्वत आहेत. मराठीमध्ये माधव ज्युलियन, रॉय किणीकर आणि कुसुमाग्रज यांनी रुबाई हा काव्यप्रकार हाताळला. चार ओळींचा स्वयंपूर्ण आकृतिबंध म्हणजे रुबाई. पण, रुबाई म्हणजे चारोळी नव्हे. जन्म आणि मरणासह कारुण्यावर रुबाई गूढगर्भ भाष्य करते. चौथ्या ओळीमध्ये मिळणारा अनपेक्षित धक्का हा रुबाईचा विशेष वेगळेपणा आहे.

यशवंत देव यांनी प्रास्ताविकामध्ये लेखनामागची भूमिका स्पष्ट केली. उत्तरार्धात प्रमोद रानडे, कविता जांभेकर आणि भाग्यश्री अभ्यंकर यांनी यशवंत देव यांच्या सदाबहार रचना सादर केल्या. खुद्द देव यांनी खट्याळ गाणी सादर केली. शैला मुकुंद यांनी सूत्रसंचालन केले.

## 'ग्रॅण्ड इमॅजिका परेड'

आपल्या आवडत्या कार्टुनला प्रत्यक्षात भेटावे अशी प्रत्येक लहान मुलाची इच्छा असते. ही इच्छा पूर्ण करण्यासाठी आता दररोज संध्याकाळी पाच वाजता अॅडलॅब्स इमॅजिकामध्ये परेड निघणार आहे. या परेड दरम्यान बच्चेकंपनीला इमॅजिकामधील टब्बी, रोर्बटो, मोगँबो या त्यांच्या आवडत्या कार्टुन्सना प्रत्यक्ष भेटता येणार आहे.

या परेडचे उद्घाटन अभिनेत्री पल्लवी जोशी आणि दाक्षिणात्य

अभिनेता राणा डुग्गुबाती यांच्या हस्ते झाले. पल्लवी जोशी म्हणाली, ‘आमच्या लहानपणी आम्हाला या परेड्स पाहण्यासाठी परदेशात जावे लागत असे. पण, इमॅजिकाने या परेड्स भारतात सुरू केल्याने आपल्या मुलांसाठी ही एक पर्वणीच ठरणार आहे.’’

राणा डुग्गुबातीनेही या वेळी मोगँबोला पाहून आपण भारावून गेल्याचे सांगितले. मोगँबोबरोबर छायाचित्र काढून घेण्याची संधीही त्याने सोडली नाही. ‘या परेडच्या उपक्रमामधून इमॅजिकातील काल्पनिक पात्रांना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला असून २०० लोकांची ही परेड कुटुंबाचा आनंद नक्कीच द्विगुणित करेल’, असा विश्वास ॲडलॅब्सच्या सर्जनशील संचालिका आरती शेट्टी यांनी व्यक्त केला.

## मराठीत ‘अनुवाद संस्कृती’!

मराठी भाषेत चांगले अनुवादक निर्माण होऊन व्यापक अनुवाद संस्कृती रुजवण्यासाठी राज्य मराठी विकास संस्थेने पुढाकार घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून जुलैपासून व्यावसायिक अनुवाद प्रशिक्षणाचे विनामूल्य वर्ग सुरू करण्यात येणार आहे.

राज्य सरकारने २०१० मध्ये बनविलेल्या सांस्कृतिक धोरणात ‘अनुवाद संस्कृतीचे संबोधन’ या बाबीचा समावेश केला होता. त्याचाच एक भाग म्हणून जुलैच्या पहिल्या आठवड्यात तीन महिन्यांच्या कालावधीच्या प्रशिक्षण वर्गाची सुरुवात झाली आहे. सर्व विद्याशाखांचे विद्यार्थी, प्राध्यापक, पत्रकार, संशोधक अशा सर्वांना व्यावसायिक अनुवादाची कौशल्ये शिकवणारे हे प्रशिक्षण असेल. सध्या या प्रकल्पांतर्गत मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी अनुवादाचे प्रशिक्षण दिले जाईल. त्याला मिळणारा प्रतिसाद पाहून इतर भाषांसाठीचे अनुवाद वर्ग सुरू होणार आहेत.

याबाबत राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. अशोक सोलनकर म्हणाले, ‘‘सध्या पुणे व मुंबई इथे हे वर्ग सुरू करून पुढे राज्यात हा उपक्रम राबविणार आहे. अनुवाद क्षेत्रातील तज्ज्ञमंडळी यासाठीचा अभ्यासक्रम बनवीत आहेत. हे वर्ग विनामूल्य असून, यासाठी वयाची अट नाही. प्रशिक्षण देण्यासाठी साहित्यिक, भाषातज्ज्ञ व अनुवादकांना निमंत्रित करण्यात येणार आहे.’’

## लांडगा, श्रृंगी घुबड : पुण्याचे मानचिन्ह

वन्यजीवांविषयी देखील चोखंदळ असलेल्या पुणेकरांनी आकर्षक दिसणाऱ्या नव्हे तर, निसर्गसाखळीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या 'उमेदवारां'नाच मतदान करून वन्यप्राण्यांत लांडगा आणि पक्ष्यांमध्ये श्रृंगी घुबडाला पुण्याचे मानचिन्ह म्हणून विजयी केले आहे. वृक्षांच्या उमेदवारांमध्ये गणेर वृक्षाला सर्वाधिक मते मिळाली असून, फुलांच्या विभागात शिंदल मकोडी या फुलाने बाजी मारली आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वन विभागाने आयोजिलेल्या कार्यक्रमात 'मानचिन्ह निवडणुकी'चा निकाल जाहीर करण्यात आला. राष्ट्रीय प्राणी वाघ, राष्ट्रीय पक्षी मोर या धर्तीवर सर्व राज्यांनी काही वर्षांपूर्वी आपली मानचिन्हे जाहीर केली आहेत. याच धर्तीवर पुण्यातील वन्यजीव संवर्धनाला चालना देण्यासाठी बायोस्पिअर्स संस्था, वन विभाग आणि इंद्रधनुष्य पर्यावरण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मानचिन्ह निवडण्याची मोहीम राबविण्यात आली.

यासाठी वन्य प्राणी संशोधन क्षेत्रातील अभ्यासकांनी सुचविलेल्या वैशिष्ट्यपूर्ण वन्यजीवांमधून पक्षी, सस्तन प्राणी, कीटक, सरपटणारे प्राणी, वनस्पती फूल असे वीस विभाग करण्यात आले होते. बायो स्पिअर्सचे प्रमुख डॉ. सचिन पुणेकर आणि त्यांच्या टीमने या 'उमेदवारांचा' जोरदार प्रचार केला. या उपक्रमाच्या मतदानासाठी स्वतंत्र वेबसाइट, फेसबुक, गुगल फोरम, शॉर्ट कोड एसएमएस आणि बॅलेट सिस्टीम असे पाच पर्याय उपलब्ध करण्यात आले होते.

पंधरा हजार लोकांनी त्यांना आवडलेल्या उमेदवारांना मतदान केले. यात काही उमेदवारांमध्ये चुरशीची लढाई झाली. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने एकूण वीस मानचिन्हे जाहीर झाली आहेत.

"जिल्ह्याचे मानचिन्ह असा उपक्रम कोणीही आत्तापर्यंत राबविलेला नाही. 'मानचिन्ह निवड प्रक्रिया' आणि निवडून आलेल्या मानचिन्हांची माहिती राज्य वन्यजीव मंडळाकडे पाठविण्यात येणार आहे. या मानचिन्हांवर अधिकृत शिक्कामोर्तब व्हावे, यासाठीही पाठपुरावा करणार आहोत," अशी माहिती डॉ. सचिन पुणेकर यांनी दिली.

राष्ट्रीय प्राणी, राष्ट्रीय पक्षी यांच्या प्रमाणेच स्थानिक पातळीवरही महत्त्वाच्या वन्यजीवांची निवड करून जागरुकता आणणे, या वन्यजीवांना

'मानचिन्हा'चा किताब देऊन त्यांच्या संवर्धनासाठी उपक्रम राबविणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

## फेसबुक ट्विटरवर 'सीआयए'ही

अमेरिकेची गुप्तहेर संघटना असलेल्या 'सीआयए'नेही सोल नेटवर्किंगवर प्रसिद्ध असलेल्या फेसबुक आणि ट्विटरवर आपले खाते उघडले आहे. सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी (सीआयए) फेसबुक, ट्विटरवर येताच तिला मोठ्या प्रमाणात पसंती मिळाली आहे. ट्विटरवर 'सीआयए'च्या पेजला नऊ तासांतच २ लाख ६८ हजार फॉलोअर्स मिळाले. 'सीआयए'चे पहिले ट्विट १ लाख ७० हजार जणांना री-ट्विट केले. तर नऊ लाख जणांनी ते 'फेव्हरेट' केले आहे.

## विद्या ॲचिव्हर ॲवॉर्ड

"उद्याचे जग वेगवान असेल. त्यामुळे आज आपण शिकतो, तो अभ्यासक्रम केवळ पाठांतर करून चालणार नाही. त्यामागील तत्त्व आणि तर्क आत्मसात करावा लागेल. सातत्याने नवे शिक्षण आत्मसात करणारी माणसेच यापुढे यशस्वी होतील", असे प्रतिपादन लेखक व माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ अच्युत गोडबोले यांनी केले.

'सकाळ विद्या' तर्फे बारावी परीक्षेत प्रावीण्य मिळविणारे विद्यार्थी, दृष्टिहीन आणि गरीब परिस्थितीत शैक्षणिक चमक दाखविणारे विद्यार्थी यांना विद्या ॲचिव्हर ॲवॉर्ड पॉवर्ड बाय टीव्हीएस' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. विश्वकर्मा इन्स्टिटयूट हे पुरस्कारांचे प्रायोजक आहे.

'सकाळ'चे संपादक मल्हार अरणकल्ले, विश्वकर्माचे संचालक भरत आगरवाल, 'सकाळ'चे सरव्यवस्थापक (जाहिरात) आनंद कन्सल, 'टीव्हीएस'चे नितीन शर्मा, निवांत अंध विकासालयाच्या संचालिका मीरा बडवे वगैरे उपस्थित होते.

गोडबोले म्हणाले, 'परीक्षेतील गुणांएवढेच आपण व्यक्तिमत्त्व विकासालाही प्राधान्य दिले पाहिजे. पूर्वी बोर्डात चमकलेले विद्यार्थी आज कुठे आहेत? प्रभावी व्यक्तिमत्त्व असणारे विद्यार्थीच यशस्वी होतात. त्यामुळे केवळ पाठांतर करून चालणार नाही. विचार करण्याची कुवत, जगातील घडामोडींविषयी माहिती आणि सुसंवादी स्वभाव विद्यार्थ्यांकडे असला

पाहिजे.''

बडवे म्हणाल्या, ''दृष्टिहीन मुले वेगळे काही करू शकत नाहीत, ही मानसिकता बदलली पाहिजे. आपण त्यांच्यात कौशल्य न रुजविता त्यांना समाजात सोडतो. त्यामुळे ते दरिद्री राहतात. त्यांना संधी आणि सुविधा दिल्या तर तेही सक्षमपणे काम करू शकतात.''

## 'अनवट'ने घेतली पडद्यामागील कलाकारांच्या कामाची दखल

पडद्यावर दिसणाऱ्या कलाकारांपेक्षा पडद्यामागे काम करणाऱ्या कलाकारांची संख्या अधिक असते. मात्र या ऑफस्क्रीन कलाकारांची दखल फारशी घेतली जात नाही. याच विचाराला छेद देत 'अनवट' या चित्रपटाने पडद्यामागे काम करणाऱ्या कलाकारांचा सन्मान करत चित्रीकरण पूर्ण केले.

निर्माते शेखर ज्योती यांनी सांगितले, ''चित्रपटाची निर्मिती हे एक टीमवर्क आहे. चित्रीकरणात छोटी मोठी कामे करणाऱ्यांची दखल आम्ही घेतली. चित्रीकरणाच्या प्रत्येक दिवशी सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्यांचा सन्मान आम्ही केला. यामध्ये स्पॉटबॉय, वाहनचालकापासून ते केटरिंग सर्व्हिस करणाऱ्या विविध विभागांतील लोकांचा समावेश होता. त्यामुळे सेटवरचे वातावरण अगदी छान राहिले. शिवाय या निमित्ताने पडद्यामागील कलाकारांच्या कामाची दखल घेतली गेली.'' सत्तावीस दिवस या चित्रपटाचे चित्रीकरण चालले. या सत्तावीस दिवसांमध्ये सत्तावीस जणांचा सन्मान करण्यात आला.

'अनवट' चित्रपटाचे दिग्दर्शन गजेंद्र अहिरे यांनी केले असून, आदिनाथ कोठारे, मकरंद अनासपुरे, उर्मिला कानेटकर आदी कलाकारांच्या भूमिका आहेत. दरम्यान, गोवा मराठी चित्रपट महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी 'अस्तु', 'एक हजाराची नोट', 'अ रेनी डे', '७२ मैल-एक प्रवास', 'सलाम', 'फॅण्ड्री' आदी चित्रपट दाखविण्यात आले; तर 'बायोस्कोप' या चित्रपटाचा प्रिमिअर झाला.

## संजय सोनवणी यांच्या तीन कादंबऱ्यांचे प्रकाशन

''आज मराठी साहित्य, त्यातही मराठी कादंबरी ठराविक चौकटीत अडकून मृतावस्थेला लागली आहे. जागतिकीकरणाच्या युगाचे भान मराठी लेखकाला पुरेसे आल्याचे दिसत नाही'', असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ.

श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.

पुष्प प्रकाशनद्वारा आयोजित सोनवणी यांच्या 'कल्की', 'कुशाण' व 'ओडिसी' या कादंबऱ्यांच्या नवीन आवृत्त्यांचे प्रकाशन झाले. महाराष्ट्र साहित्य परिषदेत झालेल्या या कार्यक्रमात व्यासपीठावर डॉ. रमेश आवलगावकर, डॉ. निशिकांत मिरजकर, कवयित्री अंजली कुलकर्णी आणि संजय सोनावणी उपस्थित होते.

डॉ. सबनीस म्हणाले, ''मराठीत विश्राम बेडेकरांच्या 'रणांगण' कादंबरीनंतर वैश्विकतेला गवसणी घालणारा साहित्यिक म्हणून संजय सोनवणींच्या कादंबऱ्यांची नोंद घ्यावी लागेल. मानवी जीवनाचे गहन चिंतन, जागतिक संस्कृत्यांच्या उत्थान-पतनांचा अविरत शोध आणि त्याची साहित्यातून होणारी अभिव्यक्ती यामुळे त्यांच्या कादंबऱ्या तत्त्वज्ञानाचा अर्क बनतात.''

'कल्की' या कादंबरीवर बोलताना अंजली कुलकर्णी म्हणाल्या, ''राष्ट्रवाद आणि धर्मवादातील धोके दाखवून देणारी ही कादंबरी लिहून सोनवणी यांनी मोठे धाडस केले आहे. हे लिखाण चिंतन करायला भाग पाडते.''

'ओडिसी' या कादंबरीवर बोलताना डॉ. मिरजकर म्हणाले, ''होमरच्या महाकाव्याचा आधार घेत एका संस्कृतीचे पतन आणि त्यातूनही नवी झेप घेण्याची मानवी वृत्ती अत्यंत स्वतंत्र व प्रभावीपणे या कादंबरीत साकारली गेली आहे.''

डॉ. आवलगावकर म्हणाले, 'कुशाण' कादंबरीतील दोन हजार वर्षांपूर्वीचे भटके लढवय्ये समाज आणि नागरी जीवन जगणारे स्थिर लोक यांच्यातील संघर्ष आजही प्रत्ययाला येतो.

सोनवणी म्हणाले, ''माणसाचे माणूसपण शोधणे हा माझ्या लेखनाचा उद्देश आहे. जगातील कोणतीही संस्कृती स्थिर नाही. मानवी संस्कृती ही अधिकाधिक नैतिक, सामाजिक, कायदेशीर बेड्या बनवण्याची व्यवस्था आहे. त्यात मानवी स्वातंत्र्याचा संकोच होतो.'' महेश गजेंद्रगडकर यांनी सूत्रसंचालन केले.

## मोदी बनले 'फॅशन आयकॉन'

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना व्हिसा नाकारणाऱ्या अमेरिकेने आता

मोदींनाच अमेरिकेचा नवा 'फॅशन आयकॉन' बनवले आहे. मोदी यांच्या कुर्त्यापासून अंगरख्यापर्यंत त्यांच्या कपड्यांच्या स्टाइलविषयी अमेरिकेतील प्रसारमाध्यमे मुक्तकंठाने प्रशंसा करीत आहेत.

'नेता तो जे तो धारण करतो' असे शीर्षक असलेल्या लेखात 'न्यूयॉर्क टाइम्स' मध्ये 'मिशेल ओबामा यांना कपड्यांविषयी उत्तम जाण असल्याने त्यांच्यावर एक ब्लॉगच चालवला जातो. फ्रान्सचे अध्यक्ष फ्रान्कोईस होलांद आणि दिसे रुल्माफ यांनी निवडणुकीपूर्वी त्यांच्या कपड्यांमध्ये केलेला बदल, नेल्सन मंडेला यांचे शर्ट यांना जगभर मान्यता मिळाली असली, तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिमा आणि त्यांची फॅशन हा अभ्यासाचा विषय आहे. भारताच्या मानकांनुसार कपडे हे संवादाचे साधन असते, हे तेथील नेत्यांना माहिती आहे. मात्र, मोदी वेगळे आहेत धोरणात्मकदृष्ट्याही!' असे म्हटले आहे.

'वॉशिंग्टन पोस्ट'नेही मोदींच्या कपड्यांच्या निवडीचे कौतुक करून 'बाजूला व्हा, मिशेल ओबामा. जगाला नवा फॅशन आयकॉन मिळाला आहे. नाही, व्लादिमिर पुतिन नाहीत. भारताचे नवे पंतप्रधान नरेंद्र मोदी,'' असे कौतुकोद्गार काढले आहेत.

'भारतीय फॅशनमध्ये नरेंद्र मोदी हे पुढील बडे प्रस्थ आहे, हे स्पष्ट आहे. त्यांचा अपरा अंगरखा किंवा मोदी कुर्ता यांमुळे त्यांच्या स्टाइलचे कौतुक होत आहे', असे 'टाइम'ने म्हटले आहे.

## आळंदी देवस्थानावर सोन्याचा कळस

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरावरील कळसाला सोन्याचा मुलामा देण्यात आला. सोन्याचा मुलामा दिलेला सुमारे १६ किलोचा कळस वारकऱ्यांच्या हस्ते मंदिराच्या शिखरावर बसविण्यात आला.

आळंदी देवस्थानने गेल्या काही महिन्यांपासून माउलींच्या समाधी मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे काम सुरू केले. मंदिराच्या शिखरावर बसविण्यात आलेला कळस पुण्यातील पी. एन. गाडगीळ ज्वेलर्समधून तयार करण्यात आला असून, या कळसाची उंची साधारण पाच फूट आहे. मंदिरावरील शिखर आणि कळसासाठी आजपर्यंत सुमारे चाळीस लाख रुपये खर्च आला. यामध्ये शिखरावर सोन्याचा मुलामा देण्यासाठी दहा लाख रुपयांची देणगी अकलूजच्या विजयश्री पाटील यांनी

दिली. आलेगाव पागा येथील वारकऱ्याने एक लाख रुपयांची देणगी दिली. यामधून देवस्थानने संपूर्ण कळसाचे काम पूर्ण केले.

देवस्थानचे प्रमुख विश्वस्त श्यामसुंदर मुळे, पालखी सोहळा प्रमुख डॉ. शिवाजी मोहिते, विश्वस्त डॉ. प्रशांत सुरू, सुधीर पिंपळे, मुख्याधिकारी विनायक औंधकर, आळंदी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक कुमार कदम, दत्तात्रेय कुऱ्हाडे यांच्या उपस्थितीत राजाभाऊ चोपदार, दादा शिरवळकर, विजयश्री पाटील, विमल घुंडरे, मारुती कोकाटे, कल्याण गायकवाड, नीलेश लोंढे या वारकऱ्यांच्या हस्ते कळसाचे पूजन करून तो शिखरावर बसविण्यात आला. या वेळी पौराहित्य मुरलीधर प्रसादे यांनी केले.

## ‘भांडारकर’ निवडणूक

भांडारकर प्राच्यविद्या संस्थेच्या त्रैवार्षिक निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला. विद्यमान सदस्य प्रा. हरी नरके, श्रीकांत बहुळकर, पं. वसंत गाडगीळ, डॉ. मैत्रेयी देशपांडे यांच्यासह पंचवीस जण यशस्वी झाले. निवडून आलेल्या नियामक मंडळात १३ सदस्य प्रथमच संस्थेसाठी काम करणार आहेत.

संस्थेच्या नियामक मंडळाच्या डॉ. प्रसाद जोशी, मिलिंद गाडगीळ, ॲड. गिरीश डांगे यांनी मतपत्रिकांची छाननी केली. संस्थेच्या २०६५ मतदारांना मतपत्रिका पाठविण्यात आल्या होत्या. त्यापैकी ३७८ मतपत्रिका परत आल्या. २६ मतपत्रिकांवर पोस्टाने मयत असा शिक्का मारला. मतपत्रिकेतील चुकांमुळे ३७ मतपत्रिका बाद झाल्या. त्यामुळे मतदानाचा हक्क बजावलेल्या ७९७ मतदारांमधील ७६० मतदारांच्या मतपत्रिका ग्राह्य धरण्यात आल्या. संस्थेच्या नियामक मंडळावर निवडून आलेल्यांमध्ये प्रा. हरी नरके, श्रीकांत बहुळकर, पं. वसंत गाडगीळ, डॉ. मैत्रेयी देशपांडे, जी. यू. थिटे, विजय बेडेकर, डॉ. सदानंद मोरे, अभयकुमार फिरोदिया, विनायक अभ्यंकर, श्याम सातपुते, भूपाल पटवर्धन, प्रमोद जोगळेकर, सुधीर वैशम्पायन, वसंत वैद्य, नंदकुमार एकबोटे, श्रीनिवास कुलकर्णी, अनिरुद्ध देशपांडे, गोविंद पानसे, सुनील त्रिंबके, अरुण नहार, संजय पवार, सूर्यकांत हयातनगरकर, राजाराम पाठक, डी. एन. मांडलेकर हे उमेदवार निवडून आले. सहा जुलैला सर्वसाधारण सभा होणार असून नवीन नियामक मंडळ अस्तित्वात येणार आहे.

अत्याधुनिक मतपत्रिका, नवीन सॉफ्टवेअर, रजिस्टर एडीने पाठविलेल्या मतपत्रिका असे विविध प्रयोग या निवडणुकीत करण्यात आले. त्याचा फायदा झाल्याचे दिसून आले. आता संस्थेचे नेमके सदस्य किती याची माहिती हाती आली असून, पुढील निवडणुकीपूर्वी मतदारयादी अद्ययावत करण्यात येणार आहे, असे संस्थेचे विश्वस्त राहुल सोलापूरकर यांनी सांगितले.

## सांभाळा तुमचे गॅजेटस्

स्मार्टफोन, लॅपटॉप आणि टॅब्लेट हे आपल्या जीवनातील अविभाज्य भाग बनले आहेत. हे डिव्हाइस चोरीला गेल्याने आर्थिक तोटा तर होतोच, पण महत्त्वपूर्ण डेटाही आपण गमावू शकतो, ही भीती आपला कायम पिच्छा पुरवत असते. अशा वेळी पुढील टिप्स अंमलात आणल्यास चिंता थोडी कमी होईल.

अँड्राइड :

अँड्राइडच्या google.com/android/devicemanger या अॅड्रेसवर तुमच्या डिव्हाइसचा अॅक्सेस मिळू शकतो. याद्वारे आपल्या गुगल आयडीशी संलग्न असलेले अँड्राइड डिव्हाइस ट्रॅक करू शकते. डिव्हाइसचे लोकेशन नकाशावर पाहू शकता, तसेच डिव्हाइसमधील डेटा काढून टाकू शकता. याद्वारे डिव्हाइस लॉक करणेही शक्य आहे. तसेच एव्हीजीच्या मोफत अँटिव्हायरस अॅप्सचा वापर करूनही डिव्हाइस ट्रॅक करू शकते. यात फोन लॉक करण्याचे पर्यायही दिले आहेत.

अॅपल फोन, आयपॅड, आयपॉड टच :

'फाइंड माय आयफोन' हे अँटि थेफ्ट अॅप अॅपलकडून पुरवले जाते. हे अॅप सर्व अॅपल फोनसाठी उपयोगात येते. फोनवर याचे सहजपणे सेटिंग करता येते. याआधारे तुम्ही तुमचे डिव्हाइस आय क्लाउड अकाउंटवर लॉग-इन करून शोधू शकता. यानंतर त्यावर मेसेज पाठवता येणे शक्य आहे. तसेच डिव्हाइस लॉक करता येते किंवा डाटा डिलिट करता येतो. लॉस्ट फाइंडर किंवा सिक्युअर-इट या अॅप्सचाही वापर करून तुमचे डिव्हाइस सुरक्षित ठेवू शकता.

विंडोज फोन :

'फाइंड माय फोन' हे विंडोज फोनचे अँटि थेफ्ट फीचर आहे.

windowsphone.com साइन करून तुमच्या स्मार्टफोनच्या आयडीचा विंडोज लाइव्ह आयडीसाठी वापर करू शकता, यानंतर हे ब्राउजर तत्काळ तुमच्या फोनच्या नकाशावर लोकेशन दाखवते. तुम्ही तुमचा फोन कुठे आहे हे पाहण्यासाठी प्रिंटर जोडलेला असेल, तर त्या लोकेशनची हार्ड कॉपी प्रिंट काढू शकता. तसेच तुमच्या फोनची मोठ्याने रिंग वाजवू शकता. पासवर्ड टाकून लॉक करण्याबरोबरच डाटाही डिलीट करता येणे शक्य आहे.

ब्लॅकबेरी :

हे ब्लॅकबेरी स्मार्टफोनचे अँटि थेफ्ट सोल्यूशन आहे. एकदा हे अकाउंट ॲक्टिव्ह झाले की, आपोआपच तुमचे कॉन्टॅक्ट्स् कॅलेंडर एंट्री आणि बुकमार्क्सला बॅकअप मिळतो. इतर स्मार्टफोनसाठी तुम्ही प्रोटेक्ट वेब-साइटवर लॉगिंग केल्यास तुमच्या डिव्हाइसचे लोकेशन समजू शकते. या साइटवर लॉगिंग केल्यानंतर तुम्ही मेसेज पाठवू शकता किंवा डाटा डिलीट करू शकता. एका अकाउंटवरून सात डिव्हाइस मॅनेज करता येऊ शकतात.

विंडोज लॅपटॉप :

विंडोज लॅपटॉपसाठी lalarm.com हे पर्सनल यूजसाठी फ्री आहे. विंडोज लॉक झाल्यास अलार्म वाजू शकतो. एखाद्याने पॉवर कॉर्ड किंवा यूएसबी फ्लॅश ड्राइव्ह डिसकनेक्ट केले तरी अलार्म वाजू शकतो. लोकेट माय लॅपटॉप ही सेवा सुद्धा पर्सनल यूजसाठी मोफत उपलब्ध आहे. गुगल मॅपचा वापर करून आपले नोटबुक लोकेट करता येणे शक्य आहे.

ॲपल मॅकबुक्स :

नोटबुक्ससाठी ॲपलने फाइंड माय मॅक हे अँटिअँण्टी थेफ्ट सोल्यूशन ऑफर केले आहे. आय क्लाउड अकाउंटवर तुम्ही साइन केल्यानंतर हे ॲप आपोआपच कार्यान्वित होते. याद्वारे तुम्ही लॅपटॉप ट्रॅक करू शकता. तसेच तुमचा लॅपटॉप कोठे आहे, हे शोधू शकता.

## कान महोत्सवात प्रसून जोशी परीक्षक मंडळाचे अध्यक्ष

'तारे जमीं पर' मधील हृदयस्पर्शी गीते, जाहिरातींच्या जिंगल्स, 'भाग मिल्खा भाग' सारख्या हटके चित्रपटाची पटकथा.. अशी भरीव कामगिरी करणारे गीतकार प्रसून जोशी 'कान लायन्स टायटेनियम महोत्सवाच्या परीक्षक मंडळाचे यंदा अध्यक्ष होते. अध्यक्षपदी निवड होणारे जोशी हे पहिलेच आशियाई कलाकार आहेत. जाहिरात क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी

करणाऱ्यांना या महोत्सवात गौरवले जात असते.

जागतिक स्तरावर जाहिरात क्षेत्रात घडणाऱ्या बदलांचा या महोत्सवनिमित्ताने आढावा घेण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली, असे जोशी म्हणाले.

## 'सारेगमप' फेम संगीतकार गायकाची नवी ओळख

'सारेगमप'च्या पहिल्या पर्वातील विजय गटलेवार... त्याच्या खास आवाजामुळे प्रेक्षकांच्या चांगलाच लक्षात राहिला आहे. अनघा ढोमसे, अभिजित कोसंबी, ज्ञानेश्वर मेश्राम यांच्यामुळे काहीसा झाकोळला गेलेला विजय आता संगीतकार म्हणून नवीन ओळख निर्माण करू पाहात आहे. सुबोध पवार लिखित व दिग्दर्शित 'आयत्या बिळावर नारोबा' या नाटकाचा संगीतकार-पार्श्वसंगीतकार म्हणून तो कारकीर्दीची सुरुवात करतो आहे.

'सारेगमप' नंतर विजयाचा 'कुंडली' हा गझल आल्बम प्रकाशित झाला. तसेच 'तारक मेहता का उलटा चष्मा' या हिंदी मालिकेसाठीही त्याने पार्श्वगायन केले होते. 'करार केला' हा मराठी गझलांचा आल्बमही त्याच्या नावावर जमा आहे.

नाटकात तीन गाणी असून त्यात प्रेमगीत, लग्नाचे गाणे आणि थीम साँग यांचा समावेश आहे. या नाटकाचे संगीत आणि पार्श्वसंगीत अशी दुहेरी जबाबदारी विजयकडे आहे.

या नाटकाबरोबरच विजयने संगीत दिलेले 'राजवाडा', आम्ही बोलू प्रेमाचे', 'चंद्रकोर' हे तीन मराठी चित्रपट सप्टेंबर २०१४ मध्ये प्रदर्शित होत आहेत.

''सारेगमप मध्ये गायक म्हणून सहभागी झालो होतो. त्याच पर्वात इलाही जमादार यांची एक गझल मी संगीतबद्ध करून सादर केली होती. त्याच वेळी कुठेतरी 'संगीतकार' म्हणून काम करावे असे मनात होते. इतक्या वर्षानंतर आता ते प्रत्यक्षात येत आहे.'' असे गटलेवार यांनी म्हटले.

## संदीप लचके यांना पुरस्कार

नामदेव समाजोन्नती परिषदेच्या वतीने संदीप लचके यांना आदर्श युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ११ हजार रुपये रोख व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. नाशिक येथे झालेल्या अधिवेशनात ग्रामविकासमंत्री

जयंत पाटील यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

## ‘शाहिरी निनाद’चे प्रकाशन

अशोक भांबुरे यांनी संपादित केलेल्या ‘शाहिरी निनाद’ या विशेषांकाचे प्रकाशन दादा पासलकर यांच्या हस्ते झाले. शाहीर किसनराव हिंगे स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सुरखा उल्हास भोपळे-घुंगुर्डे यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. विद्यार्थ्यांनी पोवाडे सादर केले. सुरेश देशमुख, हेमंत मावळे, गणेश टोकेकर, रूपाली मावळे उपस्थित होते. तेजश्री बाभूळगावकर यांनी सूत्रसंचालन केले.

## धून काव्यसंग्रहाचे प्रकाशन

नीलिमा पुराणिक यांच्या धूम या काव्यसंग्रहाचे प्रकाशन गझलकार दीपक करंदीकर यांच्या हस्ते झाले. संवेदना प्रकाशनातर्फे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात झालेल्या समारंभात डॉ. रश्मी घोलप, नितीन हिरवे, सुरेंद्र पुराणिक उपस्थित होते. गीतांजली पारखे यांनी सूत्रसंचालन केले.

## मराठी भाषा संवर्धनासाठी ८० कोटींची तरतूद

राज्य सरकारने अंदाजपत्रकात मराठी भाषा संवर्धनासाठी ८० कोटी रुपयांची तरतूद केली या बाबीचे साहित्य वर्तुळातून स्वागत करण्यात आले आहे. भाषाविषयक उपक्रम राबविण्यासाठी हा निधी उपयुक्त ठरेल. त्याचा योग्य पद्धतीने विनियोग व्हावा अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय, साहित्य संस्कृती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्थेच्या माध्यमातून राज्य सरकार मराठी भाषा संवर्धन आणि प्रसारासाठी कार्य करते. गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकात सुमारे १६ कोटी रुपये मराठी भाषेसाठी ठेवण्यात आले होते. यंदा या रकमेत मोठी वाढकरण्यात आली आहे. त्याचा उपयोग करून मुंबईमध्ये मराठी भाषा भवन, भाषा संशोधन संस्था उभारण्यात येणार आहे. तसेच जुन्या कागदपत्रांचे डिजिटायझेशन, मोडी लिप्यंतर असे उपक्रमही राबविले जाणार आहेत.

‘अंतर्नाद’ मासिकाचे संपादक भानू काळे म्हणाले, ‘‘जास्त रक्कम देऊन भाषा, साहित्याचा दर्जा उंचावणार नाही. त्यासाठी इच्छाशक्ती, सुव्यवस्थित

यंत्रणा, योग्य विनियोग होणे आवश्यक आहे. कारण, भाषेचे संवर्धन ही समाजाची जबाबदारी आहे.''

भाषेसाठी राज्य सरकार जे काही करते, त्याचे स्वागत केले पाहिजे. कोणतेही उपक्रम राबविण्यासाठी निधीची आवश्यकता असतेच. त्यामुळे हा निधी भाषाविषयक उपक्रमांच्या कामी येईल अशी आशा आहे, असे ज्येष्ठ कवी रामदास फुटाणे यांनी सांगितले.

## चौथीच्या पुस्तकात सचिन तेंडुलकर

चौथीच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या पुस्तकांमध्ये हे कोलाज समाविष्ट करण्यात आले आहे. यात सचिनच्या कामगिरीवर प्रकाशझोत टाकण्यात आला असून त्याने बजावलेली कामगिरी, पटकाविलेले पुरस्कार आणि शेवटच्या सामन्यातील त्याचे भाषण यांचा समावेश आहे. क्रिकेटचा देव मानल्या जाणाऱ्या सचिन रमेश तेंडुलकरची यशस्वी कारकीर्द लक्षात घेता महाराष्ट्र राज्य पुस्तक मंडळाच्या शालेय अभ्यासक्रमात त्याचा धडा समाविष्ट करावा, अशी मागणी काही महिन्यांपूर्वी शालेय शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा यांच्याकडे करण्यात आली होती.

लहान मुलांना छायाचित्रांच्या माध्यमातून सोप्या पद्धतीने माहिती समजून घेता येते. त्यामुळे कोलाजच्या माध्यमातून सचिनच्या कामगिरीचा आढावा घेतला आहे असे बालभारतीचे चंद्रमणी बोरकर यांनी सांगितले.

## सोशल नेटवर्कमधून एकाधिकारशाहीचा धोका

''तरुणांनो संपूर्ण स्वातंत्र्य असणारे नवमाध्यम म्हणून तुम्ही इंटरनेट किंवा सोशल नेटवर्किंग याकडे पहात असाल, तर वेळीच सावध व्हा. पारंपरिक माध्यमांपेक्षा केवढी तरी मोठी एकाधिकारशाही निर्माण करण्याची अनिर्बंध ताकद इंटरनेट या माध्यमात आहे. तुमच्या वैयक्तिक माहितीचा वाटेल तसा वापर केला जाण्याची क्षमता त्यात आहे.'' असा इशारा जेष्ठ पत्रकार पी. साईनाथ यांनी दिला.

असोसिएशन ऑफ इलेक्ट्रॉनिक मीडियातर्फे आयोजित चौथ्या व्यंकटेश चपळगावकर स्मृती व्याख्यानमालेत 'मनी, मीडिया अँड पॉलिटिक्स' (पैसा, माध्यमे आणि राजकारण') या विषयावर त्यांचे भाषण झाले.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या ५४३ खासदारांपैकी ४४२ खासदार कोट्यधीश आहेत, याकडे साईनाथ यांनी सुरवातीलाच लक्ष वेधले. ''गेल्या दहा वर्षात संसदेतील कोट्यधीश खासदारांमध्ये बत्तीस टक्क्यांवरून ८२ टक्क्यांपर्यंत वाढझाली आहे. ज्या देशातील जनता बेघर आहे, भुकेलेली आहे; अशा जनतेचे प्रतिनिधित्व हे खासदार कसे करू शकतील?'' असा सवालही त्यांनी या वेळी केला.

लोकांच्या माध्यमांवरील विश्वासाच्या मुळावर घाला घालणारा 'पेड न्यूज' हा प्रकार असल्याचे साईनाथ म्हणाले. ''एके काळी माध्यमे उद्योग जगताच्या बाजूची म्हणून तरी निदान ओळखली जात असत; आज मात्र माध्यमे स्वत:च एक उद्योग म्हणून समाजात उभी ठाकली आहेत. हा बदल दुर्दैवी असून, यामुळे सर्वसामान्य जनतेपासून माध्यमे तुटत चालली आहेत. आजची माध्यमे केवळ कॉर्पोरेट कंपन्यांच्या इशाऱ्यावर काम करत असल्याचे दिसून येते,'' अशा आत्मटीकेच्या स्वरात साईनाथ यांनी कॉर्पोरेट कंपन्या व माध्यमांमधील साट्यालोट्याचा मुद्दा ऐरणीवर आणला. सोबतच माध्यमांमधील आशय संस्कृती व जबाबदारीची भावना व नैतिकता हरवत चालल्याची खंतही त्यांनी व्यक्ती केली. शेवटी, 'तुमचे कष्ट विका; मात्र तुमचा आत्मा शाबूत ठेवा,'' असा आशावादी सूर त्यांच्या व्याख्यानात दिसून आला.

यंदाच्या निवडणुकांचे विश्लेषण करताना अनेक माध्यम-चर्चामध्ये, आता जात हा मुद्दा भारतीय राजकारणापासून हद्दपार होत चालला आहे या निष्कर्षावर त्यांनी जोरदार टीका केली. ते म्हणाले, ''बदायूँमधील मारलेल्या मुलींना सांगा, हरियानातील बलात्काराच्या बळींना जाऊन सांगा. त्या विश्वास ठेवतील का जात संपली या विधानावर?''

## 'संतसूर्य तुकाराम' कादंबरी प्रकरण; लेखक-प्रकाशक मागणार दाद

'लोकसखा ज्ञानेश्वर' आणि 'संतसूर्य तुकाराम' या कादंबऱ्यांतील मजकूर आक्षेपार्ह ठरवून न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध साहित्यिक डॉ. आनंद यादव आणि प्रकाशक सुनील मेहता यांच्याबरोबरच तक्रारदार जयसिंग विश्वनाथ मोरे हेही सत्र न्यायालयात दाद मागणार आहेत. या प्रकरणामुळे अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेला आला आहे.

ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्यावरील या कांदबऱ्यांविरोधात मोरे यांनी

पाच वर्षांपूर्वी दावा दाखल केला होता. या प्रकरणी जिल्हा न्यायालयाने या कादंबऱ्यांचे लेखक आणि प्रकाशक यांना दोषी ठरवून प्रत्येकी १० हजार रुपयांचा दंड ठोठावला. तो न भरल्यास एक महिन्याची साधी शिक्षाही सुनावली; पण ही शिक्षा अत्यंत कमी आहे, असे सांगत या प्रकरणी न्यायालयात दाद मागितली जाईल, असे मोरे यांनी सांगितले.

मेहता म्हणाले, ''लोकसखा ज्ञानेश्वर' ही असंख्य वाचकांना आवडलेली कादंबरी आहे. त्यामुळेच सध्या या कादंबरीची पाचवी आवृत्ती सुरू आहे, तर 'संतसूर्य तुकाराम'ची पहिलीच आवृत्ती सुरू असताना त्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्यामुळे तिची विक्री लगेच थांबविण्यातही आली. या पुस्तकांत आक्षेपार्ह काहीही नाही, असे आमचे पूर्वीपासून म्हणणे आहे; पण न्यायालयाने ते आक्षेपार्ह ठरवले आहे. या प्रकरणी आम्ही सत्र न्यायालयात दाद मागणार आहोत. कुठलीही कलाकृती पूर्ण करण्यासाठी संदर्भ घ्यावे लागतात. ते घेऊनच लेखकाला कलाकृती पूर्ण करावी लागते. तेच या पुस्तकांच्या बाबतीतही लागू आहे. वास्तविक, या पुस्तकांच्या बाबतीत वाद निर्माण झाला त्या वेळी साहित्य संमेलनाच्या निवडणुकीची तयारी सुरू होती. या पार्श्वभूमीवरच हा वाद उपस्थित करण्यात आला.''

## भारतीय वंशाच्या साहित्यिकांचे साहित्य ब्रिटिश अभ्यासक्रमात

ब्रिटिश अभ्यासक्रमात भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचा समावेश नुकताच करण्यात आला होता. त्या नंतर आता भारतीयांसाठी आणखी एक समाधानाची बाब अशी की, शेक्सपिअर आणि चार्ल्स डिकन्स यांच्याप्रमाणेच व्हॉल्व्हरहॅम्पटनमध्ये जन्मलेल्या मीरा सियाल आणि भारतात जन्मलेले जॉर्ज ऑरवेल यांचेही साहित्य ब्रिटनमधील माध्यमिक शाळांच्या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले आहे. विशेष म्हणजे अमेरिकी साहित्यिकांच्या लेखनाचा समावेश या अभ्यासक्रमात नाही.

ब्रिटनमधील विद्यार्थ्यांनी वैविध्यपूर्ण साहित्याचे वाचन करावे, तसेच केवळ आपल्या देशातीलच नव्हे तर इतर देशातील, इतर शतकातील साहित्याचे वाचन- अध्ययन करावे, या उद्देशाने ब्रिटनमध्ये जीसीएसई (माध्यमिक शैक्षणिक जनरल अभ्यासक्रम) यांच्या इंग्रजी साहित्यातील पुस्तकांच्या यादीत सियाल आणि ऑरवेल यांच्या साहित्याचाही समावेश केला जाणार आहे; परंतु परीक्षा मंडळाने ब्रिटनमधील शाळांसाठीच्या

प्रस्तावित पाठ्यपुस्तकात एकाही अमेरिकन कादंबरीचा अथवा नाटकाचा समावेश केलेला नाही. जॉन स्टाइनबॅक आणि आर्थर मिलर यांसारख्या साहित्यिकांचे लेखन अभ्यासक्रमांतून वगळण्यास अनेक ब्रिटनवासीयांनी अर्जाद्वारे आणि ऑनलाइनवरही विरोध केला आहे. शिक्षणमंत्री मायकेल गोव्ह यांनी अमेरिकन साहित्यावर बंदी नसल्याचे सांगत विरोधकांना शांत करण्याचा प्रयत्न केला आहे.

शेरलॉक होम्सच्या गोष्टींनाही अभ्यासक्रमात स्थान मिळाले आहे. ऑर्थर कॅनन डायल यांची 'द साइन ऑफ फोर' ही कथा अभ्यासक्रमात आहे. ॲलन बेनेट्स यांचे 'हिस्टरी बॉइज' हे नाटक, टेनिसनची 'चार्ज ऑफ द लाइट ब्रिगेड' ही कविता यांचा तसेच, विली रसेल, ॲनल बेनेट आणि काझुओ इशिगुरो यांचा समावेश आहे.

जीसीएसईने साहित्यविषयक अभ्यासक्रम अधिक व्यापक करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी कोणत्या लेखकांचा साहित्यात अंतर्भाव करायचा हे ठरवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे. ब्रिटनशिवाय इतर देशातील आधुनिक विचारांच्या लेखकांचेही साहित्य मुलांनी वाचावे, यासाठी हा प्रयत्न केला गेला आहे. तसेच, कोणत्याही देशातील लेखकांना, पुस्तकांना बंदी घातलेली नाही. शिक्षकांवर आणि मुलांवर जास्तीचे ओझे लादले जाऊ नये यासाठी विनाकारण जास्तीचे धडे पुस्तकात घेतले जात नाहीत, असेही गोव्ह यांनी सांगितले.

## प्रस्तावित मराठी भाषा विद्यापीठ

मराठीचे जतन आणि संवर्धन यासाठी स्वतंत्र विद्यापीठ उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारच्या भाषा सल्लागार समितीने विद्यापीठाचा प्रस्ताव मान्य करत वेगळ्या विद्यापीठासाठी प्रारूप तयार केले आहे.

मराठी भाषेसाठी स्वतंत्र विद्यापीठाची मागणी बऱ्याच वर्षांपासून करण्यात येत आहे. त्यासंदर्भात वर्षभरापूर्वी राज्य सरकारपुढे प्रस्ताव मांडण्यात आला होता. भाषा सल्लागार समितीची पुण्यात बैठक झाली. या बैठकीनंतर समितीचे अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी माहिती दिली.

'मराठी भाषेसाठी स्वतंत्र विद्यापीठ ही आनंददायी बाब आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगभरातील मराठी अभ्यासकांशी संवाद साधता

येईल. नव्या पिढीलाही हे विद्यापीठ आपलेसे वाटेल. प्रस्तावित मराठी विद्यापीठ शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासासाठी कार्य करेल. तसेच मराठीच्या बोलीभाषांचे जतन आणि मराठीचा वापर सर्वदूर होण्यासाठी विद्यापीठ उपयुक्त ठरेल. विद्यापीठाच्या स्थळाबाबतचा निर्णय सरकार घेईल,' असे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठामध्ये दहा संकुले हवीत अशी शिफारस समितीने केली आहे. त्यात अनुवाद विद्या संकुल, दूरशिक्षण आणि विस्तार संकुल, तौलनिक भाषाभ्यास विद्या संकुल, मराठी कला आणि संस्कृती संकुल, उपयोजित भाषा संकुल, ज्ञानभाषानिर्मिती संकुल, भाषा प्रमाणीकरण संकुल, विस्तार-सेवा संकुल, संशोधन आणि प्रशिक्षण संकुल, माहिती आणि तंत्रज्ञान संकुल यांचा समावेश आहे.

## 'कर्मयोगी लोकमान्य' चरित्रग्रंथाचे प्रकाशन

"प्रत्येक पिढी आपला इतिहास स्वत:च लिहीत असते. मात्र, पूर्वीच्या चरित्रकारांच्या चुका दुरुस्त करणे, कालौघात समोर आलेल्या नव्या पुराव्यांची भर घालणे व चिंतन-मनन यांतून भूतकाळाचा नव्या संदर्भासह अर्थ लावणे या तीन हेतूंनी चरित्रांचे पुनर्लेखन झाले पाहिजे," असे मत ज्येष्ठ पत्रकार अरुण टिकेकर यांनी 'कर्मयोगी लोकमान्य' या डॉ. सदानंद मोरे यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात व्यक्त केले. ज्येष्ठ पत्रकार अरविंद गोखले, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक, गांधर्ववेद प्रकाशनचे प्रकाश व दीपक खाडिलकर उपस्थित होते.

टिकेकर म्हणाले, "येणाऱ्या पिढ्यांना लोकमान्य टिळक यांच्या लोकोत्तर कार्याची जाणीव करून देण्याच्या दृष्टीने हे चरित्र महत्त्वाचे आहे. चरित्रलेखन म्हणजे चरित्रनायकाच्या मनात डोकावणे. अनेकदा जातीय दृष्टिकोनातून लिखाण केल्याने चरित्रात उणिवा राहतात. डॉ. मोरे यांनी लिहिलेल्या चरित्रात लोकमान्य टिळक यांच्याविषयीच्या अनेक प्रवादांची स्पष्टीकरणे मिळतात. टिळक व्यवहारी नेते होते. इतर नेमस्तांच्या तुलनेत त्यांना समाजाची नाडी अचूक कळली होती. लोकमान्य टिळक व महादेव गोविंद रानडे यांच्यात वैचारिक मतभेद असले तरी दोघेही परस्परांच्या कर्तृत्वाचा पूर्ण आदर करायचे. महापुरुषांची उद्दिष्टे, विचार, कृती यांचा अभ्यास होत राहिला पाहिजे."

गोखले म्हणाले, ‘‘लोकमान्य हे ‘शीर्षकमहर्षी पत्रकार’ होते. त्यांच्यानंतर आचार्य अत्रे यांनाच ही पदवी देता येईल. त्यांनी कायमच लोकांच्या भाषेत, त्यांच्या हृदयाला हात घालणारे लिखाण केले.’’ डॉ. टिळक म्हणाले, ‘‘आजवर टिळकांचे कर्तृत्व शब्दबद्ध करणारे बहुतेक चरित्रकार हे टिळकभक्त होते. त्यामुळे त्यांच्या लिखाणाच्या वस्तुनिष्ठते-विषयी शंका घेतली जाऊ शकते. १९१४ ते १९२० या काळात प्रकृती बरी नसतानाही टिळकांनी भारतभ्रमण करत समाजमन जाणून घेतले. सर्व समाजघटकांना एकत्र बांधण्याचे काम केले.’’

डॉ. मोरे यांनी आपली लेखनविषयक भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, ‘‘मी महाराष्ट्राच्या जडणघडणीचा अभ्यासक असून, व्यक्ती व प्रक्रिया समजून घेण्यात मला रस असतो, त्यातही माझा अभ्यास व्यक्तिकेंद्री न होता प्रक्रियाकेंद्री असावा असा माझा कटाक्ष असतो. या चरित्रातून टिळकांचे तत्त्वज्ञान व राजकीय विचारधारा यांचा वेध घेण्याचा प्रयत्न मी केला आहे.’’

## लोकमान्यांच्या सुटकेची शताब्दी

लोकमान्य टिळक यांची मंडालेच्या कारागृहातून सुटका झाल्याच्या घटनेला शंभर वर्षे झाली म्हणून लोकमान्य टिळक स्मृती अभियानतर्फे १४ जून व १५ जून रोजी शताब्दी समारंभ पुण्यात आयोजित करण्यात आला होता.

राजद्रोहाच्या खटल्यात लोकमान्य टिळक यांना सहा वर्षे कारागृहाची शिक्षा ब्रिटिश सरकारने ठोठावली होती. त्यांना मंडालेच्या कारागृहात ठेवण्यात आले होते. या कारागृहातून त्यांची आठ जून १९१४ रोजी मुक्तता झाली. तेथून १५ जून १९१४ रोजी ते पुण्यात परतले. या घटनेला १५ जून २०१४ रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेल्या व देशाच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या ३० क्रांतिकारकांच्या परिवारातील सदस्य १४ जून रोजी पुण्यात आले. यावेळी शहिद भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांच्या अस्थींचा कलश पुण्यात आणण्यात आला. १४ जून रोजी टिळकवाड्यातले संग्रहालय सर्वांनी पाहिले. समारंभाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या खास स्मरणिकेचे प्रकाशन महापौर चंचला कोद्रे यांच्या हस्ते झाले. लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर आधारित लघुपट या वेळी प्रदर्शित करण्यात

आला.

गणेश कला क्रीडा मंच येथे मुख्य समारंभाचे आयोजन करण्यात आले. या वेळी प्रसिद्ध शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, केंद्रीय माहिती व प्रसारण आणि पर्यावरण खात्याचे मंत्री प्रकाश जावडेकर, खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, पेशव्यांचे वंशज उदयसिंह पेशवा उपस्थित होते.

## बालभारती पुस्तकात महाराजा सयाजीराव

राज्य पाठ्यपुस्तक व निर्मिती मंडळाच्या इयत्ता चौथीच्या बालभारतीच्या पुस्तकात महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवरांवरील धड्यांचा समावेश करण्यात आला आहे.

गुणग्राहक कल्याणकारी महाराजा सयाजीराव गायकवाड अशी ओळख पुस्तकात दिली आहे. नव्या पुस्तकात बाबा भांड, अशोक कोळी, सूर्यकांत सराफ, लीला शिंदे आदींचे पाठ विद्यार्थ्यांना अभ्यासण्यास मिळतील. प्राचार्य रा.रं. बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली हे पुस्तक संपादित केले गेले आहे. श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन कौशल्याच्या विकासासाठी नवीन पाठांची निवड करण्यात आली आहे. कविता, पाठ, कोडे, चित्रकथा, पूरक माहिती असे पुस्तकातील पाठांचे स्वरूप आहे. चार रंगांतील सचित्र छपाई, मोठा आकार व पाठांवर आधारित स्वाध्याय असे हे पुस्तक आहे. सचिन तेंडुलकरची चित्रमय गोष्ट यात आहे. मुलांच्या भावविश्वाचा विचार करून कृती आणि संस्कारक्षम पाठ या पुस्तकात दिले आहेत.

या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता तिसरीच्या नव्याने तयार केलेल्या बालभारतीच्या अभ्यासक्रमात औरंगाबाद येथील क्रॉम्प्टन ग्रीव्हज लि. मध्ये कार्यरत लेखक गेणू शिंदे यांच्या 'रोपटे' या वृक्षारोपणाचे महत्त्व सांगणाऱ्या धड्याचा समावेश आहे.

## 'साठवणीतील आठवणी'चे प्रकाशन

माणूस सतत हसतखेळत जीवन जगतो. पण, परिस्थितीनुसार त्याचे हसणे बदलते. एवढेच नव्हे तर, हसण्यामागील भावनादेखील बदलतात. माणसाला निरागसतेचे सोंग घेता येत नाही, असे मत प्रसिद्ध अभिनेते-दिग्दर्शक सचिन पिळगावकर यांनी व्यक्त केले.

प्रभात काळापासूनच्या चित्रपटांचे पब्लिसिटी डिझायनर श्रीकांत धोंगडे

यांच्या 'साठवणीतील आठवणी' या पुस्तकाचे प्रकाशन सचिन यांच्या हस्ते झाले. अभिनेत्री सुप्रिया पिळगावकर, कवी संदीप खरे, देवयानी कुलकर्णी-अभ्यंकर, पुस्तकाचे संपादक मंदार जोशी या वेळी उपस्थित होते. धोंगडे यांनी पुस्तकाच्या रॉयल्टीपोटी मिळालेली रक्कम अनाथ मुलांसाठी काम करणाऱ्या सोफोश संस्थेला दिली.

वडिलांचे घनिष्ठ मित्र असलेल्या धोंगडे यांच्याशी माझे छान नाते जुळले. मनापासून काम करणारा हा कलावंत आहे. इतरांच्या आयुष्यात त्यांनी रंग भरले आहेत. चित्रपटसृष्टीची सफर घडवितानाच नव्या पिढीला जगण्याची वेगळी अनुभूती देणारे हे पुस्तक आहे, असे सचिन यांनी सांगितले. उमेदवारीच्या काळात केलेला संघर्ष, घरातील परिस्थिती या आठवणी सांगताना धोंगडे यांनी श्रोत्यांपुढे आयुष्याचा पट उलगडला. आयुष्य म्हणजे कोरा कॅनव्हास असतो. प्रत्येकाने आपल्या प्रतिभेने या कॅनव्हासवर रंग भरायचे असतात, असेही त्यांनी सांगितले.

## कुंचल्याच्या दुनियेतील अवलिया शंभरीत

"त्यांच्या कुंचल्याला अजून वाढत्या वयामुळे कंप सुटलेला नाही... त्यांच्या रेषागिरीलाही वाढत्या वयाचा स्पर्श झालेला नाही... केस पांढरे झालेत; पण कॅनव्हासवरच्या रंगसंगतीवरची हुकमत कायम आहे. आणि ऐकायला थोडे कमी येत असले तरी त्यांच्यातल्या चित्रकाराची नजर मात्र तशीच तेजतर्रार आहे..." शंभरीत पदार्पण करत असलेल्या रंगनाथ वासुदेव तथा बाबा पाठक यांना भेटल्यावर हे सगळे जाणवते.

सध्या औंध परिसरात राहत असलेले पाठक मूळचे साताऱ्याचे. जन्मतारीख १३ जून १९१५. शिक्षण फारसे झालेले नाही. पण चित्रकला मात्र अंगभूत अशीच. औंध संस्थानाच्या पंतप्रतिनिधींनी त्यांच्यातल्या कलावंताला हेरले आणि बालपणाचा बारा वर्षांच्या वास्तव्यात रंगीबेरंगी झाला. औंधनंतर बडोदामार्गे ते मुंबईमध्ये जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये गेले आणि आयुष्याचाच कॅनव्हास बदलला.

व्यवसाय म्हणून त्यांनी काच कारखान्यात काम केले. वीस वर्षे स्वत:चा कारखाना चालवला. ग्लास पेंटिंग केले. नंतर १९७६च्या दरम्यान त्यांनी पुण्यात म्यूरल्स करायला सुरुवात केली. ताज ग्रुपच्या बहुतांश हॉटेलमध्ये त्यांची म्यूरल्स असल्याचे त्यांची कन्या राणी साठे सांगतात. केवळ

भारतातच नव्हे तर श्रीलंका, दुबई आणि हाँगकाँगमध्येही त्यांची म्यूरल्स पोचली आहेत. 'मला पोर्ट्रेट आवडतात,' असं सांगून बाबा म्हणतात, ''मी लँडस्केपमध्ये रमतो. कारण ती सोपी असतात आणि त्यानिमित्ताने भरपूर फिरता येते. लहानपणी चित्रकलेच्या परीक्षा दिल्या. त्यात खूप बक्षिसे मिळाली. त्याचा उपयोग पुढे ग्लास पेंटिंग आणि म्यूरल्सच्या व्यवसायात झाला. आता छंद म्हणून चित्रकला करतो.''

## गदिमांची नव्या स्वरूपातील वेबसाइट

आधुनिक वाल्मिकी ग.दि. माडगूळकर यांच्या अलौकिक शब्द-साहित्याचा प्रत्यय समग्र स्वरूपात जगभरातील साहित्यप्रेमींना घरबसल्या घेता येणार आहे. नूतनीकरण करण्यात आलेल्या 'गदिमा डॉट कॉम' या वेबसाइटवर गदिमांची ७२५ गाणी, संस्कृत गीतरामायण, मूळ गीतरामायण, गणपती अथर्वशिर्षाचे 'चैतन्य गौरव' हे मराठी गीतांतर असा अनमोल ठेवा उपलब्ध करून देण्यात आला आहे.

गदिमांचे नातू सुमित्र आणि नातसून प्राजक्ता माडगूळकर यांनी १९९८ मध्ये 'गदिमा डॉट कॉम' ही वेबसाइट सुरू केली. यंदा गीतरामायणाचे हीरकमहोत्सवी वर्ष असल्याने त्यानिमित्त विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहे. वेबसाइटचे नूतनीकरण हा त्यातीलच एक महत्त्वाचा प्रकल्प होता. गेले दीड वर्ष नूतनीकरणाचे काम सुरू होते. नव्या स्वरूपातील वेबसाइट गुरुवारी लाँच करण्यात आली. नव्या वेबसाइटवर गदिमांच्या ७२५ गाण्यांची चित्रपट गीते, बालगीते, लावण्या, भक्तिगीते, सवाल-जबाब अशी सविस्तर विभागणी करण्यात आली आहे. तसेच, सी. रामचंद्र आणि पं. यशवंत देव यांनी संगीतबद्ध केलेले गीतगोपाल, 'मी कवी कसा झालो' हे गदिमांचे एक तासाचे भाषण, पेशवाईवर आधारित 'गंगाकाठी : एक मराठी महाकाव्य हरवले गंगाकाठी' या एक तासाच्या दीर्घ काव्यकथेचे अभिवाचनही रसिकांना ऐकता येईल. तसेच गदिमांचे दुर्मिळ ३०० फोटोही वेबसाइटवर अपलोड करण्यात आले आहेत.

## भावनांना समजून घेणारा रोबो

काही वर्षांपूर्वी रजनीकांत यांचा रोबो हा सिनेमा आला होता. त्यात रोबोला भावना, संवेदना दिल्यानंतर काय हाहाकार उडतो, ते दाखविण्यात

आले होते. रोबो एक मशिन म्हणूनच असलेलं बरं, त्याला भावना नकोतच, असेही काही जणांना तेव्हा वाटले असेल. असा भावना असणारा संवेदनशील रोबो जपानच्या सॉफ्टबँक कंपनीने तयार केला असून त्याचे नाव 'पेपर' असे ठेवण्यात आले आहे. मानवी इतिहासात पहिल्यांदाच अशा प्रकारचा रोबो तयार होणार आहे.

या रोबोमध्ये एक इमोशनल इंजिन असून त्यामुळे तो आपल्या भावना, संवदेना समजू शकतो. आपल्या समोरील मनुष्याचे हाव-भाव, इशारे आणि बोलण्याचा अंदाजही तो अचूक हेरतो. एखाद्या मित्राशी गप्पा माराव्या तसा संवाद या रोबोशी आपण करू शकतो, असं शास्त्रज्ञांनी सांगितले आहे.

जपानमध्ये रोबोची मोठी बाजारपेठ असून पुढच्या वर्षी 'पेपर' विक्रीसाठी उपलब्ध होईल. त्याची किंमत १९३० डॉलर असणार आहे. जपानमध्ये जन्मदर घटतो आहे आणि वृद्धांची संख्या झपाट्याने वाढते आहे. त्यामुळेच कामांसाठी रोबोची मागणी वाढतच आहे.

## जुनी पुस्तके खरेदी करणाऱ्यांचा 'व्हॉट्स ॲप' ग्रुप!

जुनी पुस्तके खरेदी करणाऱ्या ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी 'व्हॉट्स ॲप' ग्रुप तयार झाला आहे. जुन्या पुस्तकांचे मोल जाणणाऱ्या वाचकांना आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या जाळ्यामध्ये अडकवित विक्रेत्याने जुन्याची आस असलेल्यांसाठी नव्या माध्यमाची कास धरली आहे. डेक्कन परिसरातील खंडुजीबाबा मंदिराच्या दारामध्ये रस्त्याच्या कडेला समीर कलारकोप यांचे जुन्या पुस्तकांच्या विक्रीचे दालन आहे. गेल्या चार दशकांपासून हा छोटेखानी संसार अस्तित्वात आहे. आरंभीची दोन दशके वडिलांनी काम केल्यानंतर गेल्या दोन दशकांपासून समीर हे वाचकांच्या सेवेमध्ये दाखल झाले आहेत. मात्र हा पारंपरिक व्यवसाय करताना आधुनिकतेचा वसा घेत समीर यांनी 'व्हॉट्स ॲप'च्या माध्यमातून ग्रुप निर्माण केला आहे. 'ओल्ड बुक्स डेक्कन ग्रुप' असे त्याचे नाव असून गेल्या दोन महिन्यात जुनी पुस्तके खरेदी करणारे ५० ग्राहक या ग्रुपचे सभासद झाले आहेत. इंग्रजीतील अभिजात कादंबऱ्या, मराठीतील श्रेष्ठ लेखकांच्या साहित्यकृती, विश्वकोश, शब्दकोश, संदर्भकोश, माहितीकोश, इतिहास-तत्त्वज्ञान आणि विज्ञान या विषयावरील पुस्तके, जुने दिवाळी अंक, स्पर्धा परीक्षा पुस्तके, ब्रेन डेव्हलपमेंट, व्यक्तिमत्त्व विकास या विषयावरील

पुस्तकांचा खजिना सापडतो.

लेखक, प्राध्यापक, अभियंते, डॉक्टर अशा समाजातील विविध घटकांसह सामान्य वाचनप्रेमी आमचे ग्राहक आहेत. त्यांना आकर्षित करण्यासाठी व्हॉट्स ॲप ग्रुपची निर्मिती केली आहे. दरवेळी नवे लोक या ग्रुपला कनेक्ट होतात. तर काहीजण त्यातून बाहेर पडत असले तरी सरासरी ५० लोक या ग्रुपचे सभासद असतात. त्यांच्यासाठी मी नव्याने आलेल्या पुस्तकांची मुखपृष्ठे अपलोड करतो. मग, सदस्य आपल्याला हवे असलेले पुस्तक मेसेजच्या माध्यमातून नोंदणी करून बाजूला ठेवायला सांगतात. दरमहा होणाऱ्या उलाढालीमध्ये २० टक्के योगदान व्हॉट्स ॲप सभासदांचे आहे, असेही समीर यांनी सांगितले. आपल्याकडे येणाऱ्या ग्राहकांपैकी अनेकजण सधन आहेत. पण, नव्या पुस्तकांची खरेदी करण्यापेक्षा तेवढ्याच रकमेमध्ये येथे अधिक पुस्तकांची खरेदी करून वाचनाची भूक भागविता येते. ज्येष्ठ लेखक निरंजन घाटे, अनंत भावे, कवी म. भा. चव्हाण हे सातत्याने भेट देऊन जुनी पुस्तके नव्याने खरेदी करतात, असेही त्यांनी सांगितले.

## मराठी तरुणांनी तयार केला युनिकोड फॉन्ट : 'एक मुक्त'

कम्प्युटरवर सुबोध देवनागरी लेखनासाठी उपयुक्त ठरणारा 'एक मुक्त' हा युनिकोड मराठी फॉन्ट मराठी तरुणांच्या अथक प्रयत्नांतून आकाराला आला आहे. विशेष म्हणजे, मराठी लिहिण्यासाठी सर्वगुणसंपन्न असलेल्या या फॉन्टवर गुगलच्या मान्यतेचीही मोहोर उमटली असून, गुगलवरून तो विनामूल्य डाउनलोड करता येईल.

युनिकोड फॉन्टमुळे कोणत्याही कम्प्युटरवर देवनागरी लिहिणे-वाचणे सुलभ होते. जगभरातील विविध भाषांमध्ये युनिकोड फॉन्टमध्ये लिहिले जाते. मात्र, मराठी भाषेच्या गरजा पूर्ण करणारे फार मोजके फॉन्ट उपलब्ध आहेत. दर्जेदार असलेले फॉन्ट वापरण्यासाठी पैसे मोजावे लागतात. 'एक टाइप' या कपंनीचे संचालक सारंग कुलकर्णी, डॉ. गिरीश दळवी, यशोदीप घोलप, नुपूर दाते यांच्यासह त्यांच्या टीमने तयार केलेल्या 'एक मुक्त'ने ही उणीव दूर केली असून, हा फॉन्ट मराठी भाषेच्या गरजा पूर्ण करणार आहे. सुमारे अडीच वर्षांच्या प्रयत्नानंतर त्यांना हे यश प्राप्त झाले आहे.

'यापूर्वी आम्ही बरेच फॉन्ट डिझाइन केले. अलिकडे बऱ्याच कंपन्यांमधून स्वत:चे फॉन्ट तयार करून घेतले जातात. मात्र, मराठी

लिहिण्यासाठी इच्छुक असलेल्या सर्वांनाच असा स्वतंत्र फॉन्ट तयार करून घेणे शक्य नसते. त्यामुळे सर्वांना वापरता येईल असा, ओपन सोर्स असणारा, भाषेच्या गरजा पूर्ण करणारा फॉन्ट तयार करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत होतो. त्यातूनच मुक्त शब्द हा फॉन्ट आकाराला आला,' असे सारंग कुलकर्णी यांनी सांगितले. सर्व जोडाक्षरांचा समावेश असलेल्या, दिसायला व्यवस्थित या फॉन्टला गुगलनेही मान्यता दिली आहे. 'गुगलने निर्धारित केलेल्या फॉन्टच्या निकषांना पात्र ठरल्याने त्यांनी मुक्त शब्दला मान्यता दिली आहे. गुगलच्या अधिकृत युनिकोड फॉन्टमध्ये याचा समावेश झाला आहे,' असे सारंग कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

युनिकोड म्हणजे लिपीचिन्हांची प्रमाणित संकेतप्रणाली आहे. या प्रणाली अंतर्गत जगभरातील जवळपास सर्वच भाषांतील सर्व अक्षरे, अंक आणि चिन्हे यांना काही विशिष्ट क्रमाने गणितीय आकडे देण्यात आले आहेत. युनिकोड ही प्रणाली सर्व ऑपरेटिंग सिस्टिमवर व्यवस्थित चालते.

मराठीबरोबरच इतर भारतीय भाषांमध्ये युनिकोड फॉन्टची निर्मिती करण्यात येत आहे. गुजराती फॉन्टचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच मल्याळम्, तेलुगू आदी भाषांतील फॉन्टही तयार होणार आहेत.

## अण्णा भाऊंचे साहित्य आता हिंदी, इंग्रजीतही

ग्रामीण भागातील उपेक्षित दलित समाजाचे दाहक वास्तव जगासमोर मांडणारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याला देश विदेशातून मागणी वाढत आहे.

त्यांची ग्रंथसंपदा नव्या पिढीसमोर यावी. तसेच त्या ग्रंथसंपदेचे हिंदी व इंग्रजीत भाषांतर करण्यासाठी राज्य सरकारने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीत उपाध्यक्ष उच्च शिक्षण राज्यमंत्री असतील. अन्य सदस्यांमध्ये आमदार रमेश बागवे, डॉ. दिलीप अर्जुने, शिवाजी कांबळे, प्रा. राजेंद्र रायप्पा कुंभार, डॉ. संजय दासू शिंदे, डॉ. माधव गादेकर, डॉ. प्रमोद गारोडे, डॉ. अश्रू पुंजाजी जाधव, डॉ. बाबुराव अंभोरे आणि शासकीय मुद्रणालयाच्या संचालकांचा समावेश आहे.

## कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी मधु मंगेश कर्णिक

ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांची कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. कुसुमाग्रज स्मारकात डॉ. जब्बार पटेल यांच्या उपस्थितीत आयोजित विश्वस्त मंडळाच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. डॉ. पटेल यांच्या विश्वस्तपदाची मुदत २५ जून रोजी संपत असल्यामुळे विश्वस्तांनी एकमताने प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदासाठी कर्णिक यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. प्रतिष्ठानच्या विश्वस्तपदी अशोक हांडे यांची पाच वर्षांसाठी निवड करण्यात आली.

## यूथपर्यंत पोहोचवणारं 'ॲपिसोड'

कॉलेजमधील उपक्रम, संगीत, फॅशन, स्पोर्ट्स, शिक्षण, पर्यटन, कला यांसारख्या क्षेत्रांतील नवनव्या संकल्पनांमधून प्रत्यक्षात उतरलेल्या ॲक्टिव्हिटी शहरातील सगळ्या तरुणाईपर्यंत विनाखर्च पोहोचल्या तर? नेमका हाच विचार करून प्रांजल अक्कलकोटकर या धडपड्या तरुणानं 'ॲपिसोड' हे ॲप्लिकेशन तयार केलं आहे.

'ॲपिसोड'चे प्रतिनिधी प्रत्येक कॉलेजात राहणार आहेत. त्यांच्यामार्फत कॉलेजमधील अशा ॲक्टिव्हिटी या ॲपपर्यंत पोहोचवता येणार आहेत. आपल्या ॲक्टिव्हिटीही पोस्ट करता येणार आहेत. विशेष म्हणजे हे ॲप फ्री असून त्याच्या यूझरला प्रत्येक वीकेंडला अशा ॲक्टिव्हिटीजचा संकलित एपिसोडही पाठवला जाणार आहे. 'यू ट्यूब', 'फेसबुक', 'व्हॉट्स अप' सारखे सोशल नेटवर्किंगचे पर्याय उपलब्ध असताना या ॲप्लिकेशनची गरज काय, असं वाटू शकतं; पण प्रांजलनं याचाही विचार केला आहे. 'फेसबुक किंवा यू ट्यूब या परदेशी मातीतील साइटस आहेत.

'ॲपिसोड'मध्ये मॉडरेटरची यंत्रणा असेल. त्यांनी मान्यता दिल्यानंतरच या पोस्ट वॉलवर दिसतील. यू ट्यूबवर तुम्ही एखादा व्हिडिओ टाकल्यास, त्याला मिळणाऱ्या प्रतिसादापेक्षा थेट हाती असलेल्या मोबाइलमधील फ्री ॲपला निश्चितच चांगला प्रतिसाद असेल. शहरातील हजारो तरुणांपर्यंत पोहोचण्याचं हे एक चॅनेल असेल,' असं तो सांगतो.

## मोबाइलवरून 'सुगंध' पाठवा

आजच्या इन्स्टंट मेसेंजर चॅटच्या जमान्यामध्ये एखादा नवीन पदार्थ

बनवल्यास किंवा हॉटेलमध्ये नवीन डिश खाल्ल्यास लगेच आपण त्याचा फोटो काढून मित्र-मैत्रिणींना पाठवतो. मात्र नुसते नेत्रसुख देण्यापेक्षा तुम्हाला त्या पदार्थांचा सुवास– 'अरोमा' फोनवरून पाठवता आला तर... हो हे खरंय. तुम्ही आता एखाद्या पदार्थांचा खमंग वास ओफोनवरून इतरांना पाठवू शकणार आहात.

हार्वर्ड विद्यापीठातील इंजिनीअरिंगचे प्राध्यापक डेव्हिड एडवर्ड यांनी ओफोन नावाचे डिव्हाइस तयार केले आहे. या नवीन डिव्हाइसमुळे एखादी वस्तू किंवा पदार्थाच्या फोटोबरोबर त्याचा सुगंधही समोरच्या व्यक्तीला पाठवता येणार आहे. एडवर्ड यांनी १० जून रोजी ओफोनच्या पहिल्या यशस्वी चाचणी दरम्यान न्यूयॉर्क येथून आपल्या पॅरिस येथील मित्राला एका पदार्थाचा सुगंध पाठवला.

या विशेष डिव्हाइसमध्ये युजर्स ३२ प्रकारचे सुगंध आणि सुवास एकत्र करून तीन लाख नवीन प्रकारचे सुवास (अरोमा) तयार करू शकतात.

ओफोनवरील हॉटस्पॉटवरून पहिल्या ओफोनवरून फ्री ओनोट्स डाऊनलोड करू शकता. ओनोट्स म्हणजेच दोन ओफोनमध्ये तीन लाख सुवास पाठवण्यासाठी गरजेचा असणारा डेटाबेस. यामध्ये अक्षरे, फोटो आणि आवाजांचा समावेश असणार आहे. सुवास ओळखण्यासाठी ओनोटची एक लायब्ररी उपलब्ध असणार आहे; ज्यात एखादा नवीन सुवास ओळखण्यासाठी युजर या लायब्ररीतून योग्य तो संदर्भ शोधू शकतात.

ओफोन शिवाय मोबाइल फोनमधून सुगंध पाठवण्याचे फीचर्स यूजरला उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने काम करीत असल्याचे ओफोन बनवणाऱ्या वापोर कम्युनिकेशन या कंपनीने सांगितले आहे. शब्दांमधून सुगंध कसा पाठवता येईल, यावर सध्या कपंनी काम करीत आहे. जर हा प्रयोग यशस्वी झाला तर मेडिकल, भावना व्यक्त करणारे मनोरंजन, पर्यटन आणि मार्केटिंगसारख्या क्षेत्रामध्ये नवीन संधी उपलब्ध होणार आहेत.

## लोकपरंपरेतील सीता

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीचा धांडोळा घेणाऱ्या ज्येष्ठ लेखिका डॉ. तारा भवाळकर यांना रामायणातील 'सीता' ही व्यक्तिरेखा खुणावत आहे. सीतेचे विविध पैलू उलगडणारे 'लोकपरंपरेतील सीता' हे पुस्तक त्या लिहीत आहेत.

राजा जनकाची कन्या जानकी आणि प्रभू रामचंद्र यांची पत्नी ही सीतेची आपल्याला असलेली ओळख. पण ही सीता आपल्या लोकपरंपरेत कशी आली याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. वेगवेगळ्या भाषांतील वैविध्यपूर्ण गीते, आख्याने आणि कथांतून दिसणारे प्रतिबिंब कसे भावते याचा अभ्यास केला आहे. बंगाली, गढवाली, तमीळ या प्रादेशिक भाषांसह कोकणी आणि वैदर्भीय बोलीतील मराठी अशा आतापर्यंत दहा कथांचा अभ्यास झाला आहे. या लोकपरंपरेतील सीता ही आपल्याला माहीत असलेल्या वाल्मीकी रामायणातील सीतेपेक्षा भिन्न आणि क्रांतीकारी आहे, असेही भवाळकर यांना वाटते.

लोकसाहित्य आणि लोकपरंपरेचा धागा गुंफत लेखन करणाऱ्या व्यक्तिरेखांवर आधारित 'अभ्यासक स्त्रिया' या डॉ. तारा भवाळकर यांच्या आगामी पुस्तकात लेखिका मालती दांडेकर, विदुषी दुर्गा भागवत यांच्यापासून ते प्रसिद्ध कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांच्यापर्यंत ज्ञात-अज्ञात अशा २५ अभ्यासक स्त्रियांच्या संशोधन कार्याचा परिचय करून दिला जाणार आहे. भारती विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्रातर्फे या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. याखेरीज लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीचे ज्येष्ठ अभ्यासक-संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे, ज्येष्ठ लेखिका कमल देसाई यांच्या मुलाखतींचा समावेश असलेले पुस्तकही तयार होत आहे.

## पुरुषोत्तम भापकर यांचा काव्यसंग्रह

''समाजातील अनुभव आणि अस्वस्थतेतून काव्यनिर्मिती होत असते. डॉ. पुरुषोत्तम भापकर हे प्रशासनात असूनही त्यांच्यात संवेदनशीलता टिकून आहे. त्या संवेदनशीलतेतूनच भापकर यांचे काव्य निर्माण झाल्याचे मत कवी फ. मुं. शिंदे यांनी व्यक्त केले.

प्रेरणा फाउंडेशनच्या कार्यक्रमात डॉ. भापकर यांच्या 'चांदणं उन्हातलं' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. यावेळी गझलकार भीमराव पांचाळे, प्रेरणा फाउंडेशनचे अनिल कांबळे, वि. सु. चव्हाण, प्रकाशक दिलीप साळुंखे उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, 'डॉ. भापकर यांनी प्रशासकीय अधिकारी म्हणून चांगली कामगिरी बजावली आहे. औरंगाबादमध्ये असताना त्यांनी अतिक्रमण हटविण्याची मोहीम यशस्वीरीत्या राबविली. प्रशासनातील ते पुरुषोत्तम

असल्याचे त्यांच्या कार्यपद्धतीवरून दिसून येते. निर्मळ भावनेतून प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याची दृष्टी भापकर यांच्याकडे आहे.''

डॉ. भापकर म्हणाले, ''मी जे जगलो, जे भोगले ते कवितेच्या रूपाने जनतेसमोर येत आहे. विविध पदांवर कार्य करताना अनेक आव्हाने आली. नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली तर समाजातील प्रश्न लवकर सुटू शकतात, हेच डोक्यात ठेवून काम करण्याचा प्रयत्न केला.''

पांचाळे यांनी भापकर यांच्या कविता आणि गझल सादर केल्या. साळुंखे यांनी काव्यसंग्रहाच्या निर्मितीी प्रक्रिया उलगडली. कांबळे यांनी प्रास्ताविक केले.

## अलास्कन लोककथांचे प्रकाशन

''पंचमहाभूतांच्या ओंजळीतील लोकमानसाचा उत्कट आविष्कार म्हणजे लोकसाहित्य. जगण्याचे शहाणपण मार्मिकपणे सांगणाऱ्या लोककथांनी मानवी मूल्यव्यवस्था समृद्ध केली आहे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. द.ता. भोसले यांनी केले.

उषा प्रभुणे व अरुण प्रभुणे यांनी अनुवादित केलेल्या अमेरिकन लेखक जॉन स्मेल्सर यांच्या 'उत्तर ध्रुवाजवळील अलास्कन लोककथा' या पद्मगंधा प्रकाशनाच्या पुस्तकाचे प्रकाशन भोसले यांच्या हस्ते झाले. या वेळी लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर, समीक्षक सुधीर रसाळ, पद्मगंधा प्रकाशनाचे अरुण जाखडे, उदय प्रभुणे उपस्थित होते.

डॉ. भोसले म्हणाले, ''लोकसाहित्य व समाजजीवनाचा संबंध प्राचीन आहे. भूतकाळाचा अंश, वर्तमानातील सत्य व भविष्याची सूचना या साहित्यप्रकारात आढळते. देवदेवतांचे स्मरण, श्रमपरिहार, निर्मितीचा सत्कार अशा अनेक बाबी साध्य करत लोकसाहित्य संस्कृतीला समृद्ध करते.''

डॉ. भवाळकर म्हणाल्या, ''माणूस कितीही प्रगत झाला तरी आपली मुळं शोधण्याची आस त्याला असते. बहुजन समाज निसर्गाशी बांधलेला असल्याने तो देवक ही संकल्पना मानतो.''

रसाळ म्हणाले, ''येत्या काळात स्थापन होणाऱ्या मराठी विद्यापीठामध्ये लोकसाहित्य ही स्वतंत्र ज्ञानशाखा असणार आहे.'' उद्धव कानडे यांनी सूत्रसंचालन केले.



# पुरस्कार

## केदारनाथ सिंह यांना 'ज्ञानपीठ'

भारतीय साहित्यक्षेत्रातील सर्वोच्च मानाचा असा, सन २०१३ चा ज्ञानपीठ पुरस्कार प्रख्यात हिंदी कवी, निबंधकार, कथाकार केदारनाथ सिंह यांना २० जून रोजी जाहीर करण्यात आला. ८० वर्षीय केदारनाथ सिंह हे हिंदीमधील एक प्रमुख कवी मानले जातात.

साधीसोपी भाषा, रोजच्या आयुष्यातील गोष्टींचा प्रतिमांसाठी वापर, वाचकांच्या मनाला थेट भिडणारा आशय ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये. 'अभी बिल्कुल अभी,' 'यहाँ से देखों,' 'बाघ', 'टॉलस्टॉय और साइकिल,' 'अकाल में सारस,' 'उत्तर कबीर और अन्य कविताएँ' हे त्यांचे काव्यसंग्रहही हिंदी साहित्यात महत्त्वाचे मानले जातात. त्यांनी समीक्षात्मक आणि वैचारिक साहित्यातही ठसा उमटवला आहे. त्यांनी ताना-बाना (आधुनिक भारतीय कविता से एक चयन), समकालीन रूसी कविताएँ यांसारख्या पुस्तकांचे संपादनही केले आहे. उत्तर प्रदेशातील बलियाँ जिल्ह्यात चाकिया या गावात त्यांचा जन्म झाला. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात त्यांनी हिंदी विभागप्रमुख म्हणून काम पाहिले आहे.

## 'धवलबुक' करतेय कर्तृत्ववानांच्या नोंदी

विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या व्यक्तींच्या बातम्यांच्या कात्रणांच्या नोंदी ठेवण्याचे काम सोलापूर येथील 'धवलबुक वर्ल्ड रेकॉर्ड' या नोंदणीकृत संस्थेकडून करण्यात येत आहे. या संस्थेने आत्तापर्यंत साडेचार लाखांहून अधिक कात्रणे जपून ठेवली आहेत, अशी माहिती सोलापूर येथील धनंजय शिंदे आणि गणेश देशपांडे यांनी दिली.

या संस्थेतर्फे गोळा करण्यात आलेली कात्रणे संबंधित व्यक्तींना विनामूल्य, नि:शुल्क पोहोचती केली जातात. या धवलबुकमध्ये २०००

पासूनच्या कात्रणांच्या नोंदी ठेवण्यात आल्या आहेत.

विविध क्षेत्रांतील लोकांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल वर्तमानपत्रात बातम्या छापून येतात. त्यातून विविध पदांवर करण्यात आलेल्या नियुक्त्या, निवड याची माहिती कात्रणांद्वारे गोळा करण्यात येते. आपल्याला मिळालेला पुरस्कार, निवड, नियुक्ती असेल तर त्याची माहिती dhavalbooks@gmail.com या ईमेलवर लोकांनी पाठवावी.

## बाबा आढाव यांचे ८५ व्या वर्षांत पदार्पण

''गेली सहा दशके कास्तकार, हमाल, कागद-काचा-पत्रेवाल्या महिला असा सगळा माझा जिव्हाळ्याचा गोतावळा... त्यांच्यासाठीच त्यांच्यासह लढताना कधी येतेच की मलाही निराशा, उदासी वगैरे... मग बागेत जातो, शांतपणे झाडांना पाणी घालतो. फुलवलेली फळं-फुलं पाहिली की मनावरचं मळभ नकळत दूर होतं... मी पुरोगामी आहेच, पण म्हणून काय अगदीच अरसिक असावं असं थोडंच आहे...'' कष्टकऱ्यांसाठी अविरत लढणारे बाबा आढाव बोलता बोलता हाती सोनचाफा देतात अन् भवताल सुगंधी होतो.

डॉ. आढाव यांनी जूनमध्ये ८५व्या वर्षांत पदार्पण केले. निवृत्तीचे वय कधीचेच उलटून गेल्यानंतरही बाबा भरभरून बोलतात, तेव्हा त्यात डोळस आशावाद दिसतो. समाजकार्यांच्या यशापयशाविषयी बाबा सांगतात, ''मनात एक सततचे भय, अपराधभाव घेऊन जगणारी कष्टकरी बाई आता संघटित झालीय. व्यसनी नवऱ्यासह शोषक व्यवस्थेलाही ती चार खडे बोल सुनावते. हे पाहिले की वाटते, अरे, आपण पेरलं, ते उगवतंय की हळूहळू!'' आज लोकशाही विजयी करण्यासाठी धर्मनिरपेक्षतेचा बळी द्यावा लागू नये, असे परखड व सूचक विधान ते करतात. नव्या पिढीबाबत ते म्हणतात, ''देवदर्शनासाठी ताटकळत रांगा लावणारा, संगणकावर कुंडली पाहत विवाह जुळवणारा 'आधुनिक' तरुण नकोय. व्यवस्थेला प्रश्न विचारणारे, वैज्ञानिक दृष्टीचा आग्रह धरणारे, जाती-धर्माची चिकित्सा करणारे बंडखोर तारुण्य मला हवे आहे.''

## अ. भा. मराठी नाट्य परिषदेचे पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने यंदाच्या नारायण राणे पुरस्कृत 'तात् सीताराम राणे स्मृती जीवनगौरव' पुरस्कारासाठी रंगभूमीवरील ज्येष्ठ

अभिनेते स्वरूपकुमार (अनंत मेहेंदळे) आणि ज्येष्ठ अभिनेत्री वत्सला देशमुख यांची निवड केली आहे. रोख २५ हजार रुपये, शाल, श्रीफळ, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

महाराष्ट्र सरकार पुरस्कृत राम गणेश गडकरी, बालगंधर्व, चिंतामणराव कोल्हटकर आणि केशवराव भोसले पुरस्कारांसाठी अनुक्रमे ल. मो. बांदेकर, विश्वनाथ कान्हेरे, भालचंद्र कुलकर्णी आणि नाट्यसंपदाच्या 'जगणे व्हावे गाणे' या नाटकाची निवड झाली आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने ७० पारितोषिकांची घोषणा केली आहे.

यंदा परिषद पुरस्कृत शं. ना. नवरे स्मृती पुरस्कार उत्कृष्ट प्रकाश योजना, सुधीर भट स्मृती उत्कृष्ट लोककलावंत पुरस्कार आणि विनय आपटे, अविनाश फणसेकर आणि भाई बोरकर स्मृती उत्कृष्ट प्रायोगिक नाट्य संस्था पुरस्कार देण्यात येणार आहेत. यासाठी अनुक्रमे गुरुदत्त पेडणेकर, नंदकुमार पाटोळे आणि पंचम संस्था (जळगाव) यांची निवड करण्यात आली आहे. त्याप्रमाणे ज्येष्ठ नाटककार वसंत जाधव स्मृती रंगकर्मी पुरस्कार यंदापासून सुरू करण्यात आला आहे. या पारितोषिकांसाठी राजीव शिंदे यांची निवड करण्यात आला आहे.

गोपीनाथ सावकार स्मृती पुरस्कारासाठी प्रियदर्शन जाधव म्हैसकर, फाऊंडेशन पुरस्कृत पारितोषिकांसाठी रमो उदारे, कमलाकर वैशंपायन पुरस्कारासाठी सुरेश परांजपे, लीला मेहता पुरस्कृत भार्गवराम पांगे पुरस्कारासाठी शिवाजी शिंदे, राजाराम शिंदे पुरस्कृत नाट्यमंदार पारितोषिकासाठी सोमनाथ मुटकुळे, बबन प्रभू पुरस्कारासाठी पुष्कर श्रोत्री, लीला मेहता रंगदेवता पुरस्कारासाठी विनोद राऊत, मा. दत्ताराम स्मृती पारितोषिकासाठी स्वप्नील जोशी, दिनकर कामण्णा रसिक गौरव पुरस्कारासाठी भारत गणेशपुरे, भक्ती बर्वे पुरस्कृत सतीश दुभाषी स्मृती पारितोषिकसाठी हृषीकेश जोशी, आचार्य अत्रे गुणगौरव पारितोषिकासाठी समीर मोने यांची निवड झाली आहे.

गेल्या वर्षी १४ जूनपासून नाट्य परिषदेच्या शाखांतर्फे गो. ब. देवल स्मृतिदिन साजरे करण्यात आले. यंदाचा देवल स्मृतिदिन १४ जून आणि २५ जुलैला होणार आहे. १४ जूनला आणि २५ जुलैला मनोरंजनाचे कार्यक्रम आणि पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे.

## कृत्रिम पायाने 'किलीमांजारो' सर

''रेल्वे अपघातात एक पाय गमवावा लागला. त्यामुळेच एव्हरेस्ट शिखर सर करण्याची प्रेरणा झाली. कारण, अपघात घडण्याअगोदर एव्हरेस्ट सर करण्याचा विचार आला नाही. लोकांनी केलेल्या अपमानाने आत्मशक्ती दिली. त्यामुळे मी माझ्या अपंगत्वालाच संधी बनविले,'' असे मत कृत्रिम पायाने एव्हरेस्ट शिखर पार करणाऱ्या पहिल्या महिला अरुणिमा सिन्हा यांनी व्यक्त केले.

अरुणिमा यांनी सात महाशिखरे सर करण्याच्या मोहिमेत आफ्रिकेतील किलीमांजारो शिखर नुकतेच सर केले. यानिमित्ताने भारत विकास ग्रुप (बीव्हीजी) इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष एच. आर. गायकवाड यांच्या हस्ते अरुणिमा यांचा सत्कार करण्यात आला.

अरुणिमा म्हणाल्या, ''अनेक व्यक्ती शरीराने चांगल्या असूनदेखील मनाने आणि बुद्धीने अपंग असतात. तरीही अपंग व्यक्ती मनाने सक्षम असेल, तर ध्येय साध्य करणे सहजशक्य होते. तरुण-तरुणींनी विचार करून आपले लक्ष्य निश्चित करून आत्मविश्वासाने ध्येयाकडे वाटचाल केल्यास हमखास यश मिळते.''

## सुलोचनादीदी यांना प्रभात जीवनगौरव पुरस्कार

''बालपणी गावी तंबूत पाहिलेला सिनेमा 'सिंहगड'... चित्रपटात काम करण्यासाठी पुण्यात आल्यावर 'जिवाचा सखा' मध्ये मिळालेली भूमिका आणि रुपेरी दुनियेत ओळख मिळाल्यावर केलेला राजा ठाकूर यांचा 'गजगौरी'... वयाच्या आणि कारकीर्दीच्या अशा तिन्ही टप्प्यांवर 'प्रभात'शी जुळलेले ऋणानुबंध ही मोलाची ठेव आहे.'' असे सुलोचनादीदी यांनी नमूद केले. अभिनेते विक्रम गोखले, कवी रामदास फुटाणे, माजी आमदार उल्हास पवार व 'प्रभात'चे विवेक दामले उपस्थित होते.

सुलोचनादीदी म्हणाल्या, ''वडील फौजदार होते त्यामुळे बालपणी सिनेमा पाहताना तिकीट काढायची वेळ कधी आली नाही. 'प्रभात'चे अभिजात सिनेमे बघत मी त्या भारावलेल्या काळाचा एक भाग बनले. आजवर अनेक सन्मान मिळाले; पण हा पुरस्कार मला मोलाचा वाटतो, कारण तो माझ्या जिव्हाळ्याच्या माणसांनी दिलाय.''

'प्रभात'च्या सुवर्णकाळाचे साक्षीदार असणारे बबनराव वाळवेकर आणि

दत्तोबा भडाळे यांना 'प्रभात'चे शिलेदार या पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी प्रदीर्घ काळ सेवा देणाऱ्या चित्रपटगृहांनाही प्रभात कृतज्ञता पुरस्काराने गौरविण्यात आले. 'आर्यन थिएटर'चे अनंत पाठक, 'विजयानंद टॉकीज'चे विनय चुंबळे व 'सेंटर प्लाझा'चे प्राणलाल दोशी यांना हा पुरस्कार देण्यात आला. नागराज मंजुळे दिग्दर्शित 'फॅन्ड्री' चित्रपटाला प्रभात विशेष पुरस्कार देण्यात आला.

'प्रभात' सन्मानाचे मानकरी :

सर्वोत्कृष्ट चित्रपट : यलो, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक : महेश लिमये (यलो) सर्वोत्कृष्ट पटकथा : अभिजित पानसे (रेगे), सर्वोत्कृष्ट कथा : अजित व प्रशांत दळवी (आजचा दिवस माझा), सर्वोत्कृष्ट अभिनेता : डॉ. मोहन आगाशे (अस्तु), सर्वोत्कृष्ट खलभूमिका : जितेंद्र जोशी (दुनियादारी), बालकलाकार : सोमनाथ अवघडे (फॅन्ड्री) व गौरी गाडगीळ (यलो), विभागून, सहायक अभिनेत्री : अमृता सुभाष (अस्तु), हृषिकेश जोशी (आजचा दिवस माझा).

## उत्तम कांबळे यांना मायमराठी पुरस्कार

''साहित्याचा जन्म समाज बदलण्यासाठी झाला आहे. हरवलेल्या माणसांना त्यांचा चेहरा प्राप्त करून देण्यासाठी आणि स्वातंत्र्य, समता व न्याय या घटनेतील उद्दिष्टांवर आधारित समाज तयार करण्यासाठी हे साधन वापरले पाहिजे,'' असे प्रतिपादन उत्तम कांबळे यांनी केले.

साहित्य, कला आणि संस्कृती मंडळातर्फे कांबळे यांना पहिला 'मायमराठी पुरस्कार' ज्येष्ठ कृषितज्ज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

शब्द ही सर्वांत मोठी जोखीम असल्याचे सांगताना कांबळे म्हणाले, ''शस्त्रांनी झालेली क्रांती अल्पकाळाची असते. मात्र, शब्दांनी केलेली क्रांती चिरकाल टिकते. प्रगत आणि प्रस्थापित समाज ज्यांना ज्यांना विसरतो, तिथे साहित्यिकाने जायला पाहिजे.''

डॉ. मुळीक यांनी शेती आणि साहित्यातील विरोधाभासावर मार्मिक विचार मांडून शेतीप्रति संवेदना ठेवण्याचे आवाहन केले. यावेळी प्रभाकर ओव्हाळ (साहित्यभूषण), दमयंती खान (संस्कृतिभूषण), प्रा. सुभाष जगताप (शिक्षणभूषण), पं. शरद जोशी (कलाभूषण) आणि शिवाजीराव

गोपाळे (समाजभूषण) यांना सन्मानित करण्यात आले.

स्वागताध्यक्ष ॲड. सहदेव मखामले, कार्याध्यक्ष अमीन खान यांनी मनोगत व्यक्त केले. अर्जुन गायकवाड यांनी प्रास्ताविक, तर शैलेश मखामले आणि आरती सावंत-दिवाकर यांनी सूत्रसंचालन केले.

## अविनाश झेंडे यांना जीवनगौरव पुरस्कार

साखर तंत्रज्ञ अविनाश झेंडे यांना डेक्कन शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशनने जीवनगौरव पुरस्कार जाहीर केला आहे. साखर प्रक्रिया विभागातील रस शुद्धीकरण व स्फटीकीकरण या दोन क्षेत्रांत झेंडे यांनी मोलाचे संशोधन केले. कच्च्या साखरेपासून पांढरी शुभ्र साखर निर्माण करण्यासाठी अनेक कारखान्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. साखर उद्योगात गेली ५० वर्षे ते काम करीत आहेत.

## राजवर्धन पाटील याला पुरस्कार

पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सेंट लॉयला प्रशालेतील राजवर्धन पाटील या विद्यार्थ्याला राजीव गांधी पर्यावरण पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. राजवर्धन याने पर्यावरण विषयावर तीन लघुपट बनविले आहेत. वृक्षारोपण, जैविक विविधता या माध्यमातून त्याने अनेक उपक्रम राबविले आहेत. संजय देवताळे व माणिकराव ठाकरे यांच्या हस्ते मुंबईत पुरस्कार वितरण झाले.

## ‘ब्राह्मोस’चे यशस्वी प्रक्षेपण

ताशी २९० किलोमीटर वेगाने मारा करणाऱ्या ‘ब्राह्मोस’ या देशातील अतिवेगवान जहाजभेदी क्षेपणास्त्राची कर्नाटकातील कारवारच्या समुद्रकिनारी ‘आयएनएस कोलकाता’ या स्वदेशी बनावटीच्या युद्धनौकेवरून यशस्वी चाचणी घेण्यात आली.

माझगाव डॉकयार्ड लिमिटेड कंपनीने तयार केलेल्या ‘आयएनएस’ कोलकाता’ या युद्धनौकेचा नौदलात औपचारिकरीत्या अद्याप समावेश झालेला नाही, ही नौका १५ अल्फा प्रकल्पाच्या मालिकेअंतर्गत तयार करण्यात आली आहे. ‘आयएनएस कोलकाता’ ही देशातील सर्वोत्कृष्ट युद्धनौका असून, तिचा जुलैमध्ये नौदलात समावेश होईल.

नौदलाने अनेक युद्धनौकांवर ब्राह्मोस शस्त्रप्रणाली तैनात केली आहे. भविष्यात नौदलावर होणारे विध्वंसक हल्ले रोखण्यासाठी, तसेच पाणबुडीसाठीही 'ब्राह्मोस'चा उपयोग होऊ शकतो.

## पं. मुजुमदार यांना संगीतोन्मेष पुरस्कार

संगीतोन्मेष संस्थेच्या वतीने देण्यात येणारा कलागौरव पुरस्कार प्रसिद्ध बासरी वादक पं. रोणू मुजुमदार यांना संस्थेच्या २७व्या वर्धापन दिनी विरासत संगीत महोत्सवात १३ जून रोजी डॉ. शां. ब. मुजुमदार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ५१हजार रोख, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## सोशल मीडियाचे आभासी जग

''सोशल मीडिया हे आभासी जग असून, त्यातून पेरलेले जातीयवादाचे विष हे वास्तववादी दुनियेत दंगलींचा वणवा पेटवेल,'' अशी भावना राष्ट्रीय आरोग्य सेनेचे संस्थापक-प्रमुख डॉ. अभिजित वैद्य यांनी ता. १२ जून रोजी व्यक्त केली. आरोग्य सेनेने आयोजित केलेल्या 'आरोग्य अदालत'मध्ये 'फेसबुक आणि पुण्यातील धार्मिक व जातीय दंगली'या विषयावर वैद्य म्हणाले, ''युवकांकडून सोशल मीडियाचा सर्वाधिक वापर होतो. भविष्यात सोशल मीडियाच्या माध्यमातून भाषा, जात, प्रांत, धर्म यात तेढनिर्माण होऊ नये, यासाठी तरुणांनी जास्तीत जास्त प्रयत्न केले पाहिजेत. हडपसरमध्ये घडलेल्या दंगलीमागे सोशल मीडियाच कारणीभूत आहे. देशात कोणतेही शहर न पेटता पुणेच का पेटले? हा प्रश्न दंगल पूर्वनियोजित असल्याचे उत्तर देतो.'' यावेळी डॉ. नितीन केळकर, लक्ष्मीकांत मुंदडा, प्रा. प्रमोद दळवी आदी उपस्थित होते. अनेक गंभीर गुन्हे दाखल असतानाही धनंजय देसाई वाहनांचा ताफा घेऊन फिरताना कारवाई का केली नाही असा सवालही वैद्य यांनी उपस्थित केला.

## डॉ. प्रभा अत्रे यांना स्वरभास्कर पुरस्कार

पुणे महापालिकेच्या वतीने भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या नावे देण्यात येणारा स्वरभास्कर पुरस्कार यंदा ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे यांना जाहीर झाला आहे. बालगंधर्व पुरस्कारासाठी नृत्यकलाकार डॉ. नंदकिशोर

कपोते यांची निवड करण्यात आली.

संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कलाकारास स्वरभास्कर पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर, पंडित बिरजू महाजराज, ज्येष्ठ संतूरवादक पंडित शिवकुमार शर्मा यांना यापूर्वी या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. एक लाख अकरा हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. महापालिकेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार देण्यात येत आहे.

बालगंधर्व पुरस्कार १९९२ पासून देण्यात येत असून, ५१ हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे त्या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कारांबरोबरच शिवराज वायचळ (दिग्दर्शन), सदाशिव कांबळे (वेशभूषा), गिरीश गोडबोले (बुकिंग), राजेश वाघ (प्रकाश योजना) आणि श्रुती कुमार करंदीकर (गझल गायन) या पाच कलाकारांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. अकरा हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## देवर्षी नारद पुरस्कार

''संपत्तिनिर्मिती ही ज्ञाननिर्मितीवर अवलंबून असते. मात्र, इतर देशांच्या तुलनेत आपल्याकडे ज्ञाननिर्मितीचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे संशोधन, नवीन तंत्रज्ञान विकास याबाबत आपला देश मागे आहे,'' असे मत प्रा. डॉ. जे. बी. जोशी यांनी व्यक्त केले.

विश्व संवाद केंद्र व डेक्कन एज्युकेशन सोसायटी आयोजित 'देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार' पत्रकार पराग करंदीकर यांना नितीन गोखले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

'युवा पत्रकार पुरस्कार' सागर वैद्य यांना, तसेच 'वृत्त छायाचित्रकार पुरस्कार' राजू शेख यांना प्रदान करण्यात आला. संवाद केंद्राचे अध्यक्ष मनोहर कुलकर्णी, एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष विकास काकतकर उपस्थित होते.

डॉ. जोशी म्हणाले, ''सरकारच्या अनेक किचकट नियमांमुळे संशोधन व तंत्रज्ञाननिर्मिती कमी असल्याने ७५ टक्के तंत्रज्ञान आयात करावे लागत आहे.''

गोखले म्हणाले, ''मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओरिसा या भागांमध्ये नक्षलवाद वाढत आहे. त्यांना देशातील अंतर्गत संस्थांकडून पाठिंबा मिळत

आहे. देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा मोठा धोका आहे.''

## पत्रकार संघ : नवे पदाधिकारी

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी 'सकाळ'चे बातमीदार महेंद्र बडदे यांची, तर सरचिटणीसपदी सुनीत भावे (महाराष्ट्र टाइम्स) यांची निवड झाली. पत्रकार संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही निवड करण्यात आली. पत्रकार संघाचे यंदा अमृतमहोत्सवी वर्ष आहे.

उपाध्यक्षपदी स्वप्नील पोरे (केसरी) व मुकेश आकडकर (आज का आनंद) यांची तर खजिनदारपदी मंगेश कोळपकर (सकाळ) यांची निवड झाली.

इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : चिटणीस : सुनील जगताप (पुढारी), पवन खेंगेरे (इंडियन एक्स्प्रेस), कार्यकारिणी सदस्य : पांडुरंग सरोदे (सकाळ), सुशांत सांगवे (सकाळ), अरुण गायकवाड (सकाळ), अरुण सुर्वे (सकाळ), स्वप्नील शिंदे (महाराष्ट्र टाइम्स), विक्रांत आढाव (पुण्यनगरी), अभिजित बारभाई (सामना), सुकृत मोकाशी (बेळगाव तरुण भारत), निनाद देशमुख (लोकमत), शिवाजी शिंदे (पुढारी). ॲड. प्रताप परदेशी, ॲड. सुभाष किवडे, जिल्हा माहिती अधिकारी रवींद्र राऊत यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

## पुणेकर आदित्य इस्रोच्या 'धवन' शिष्यवृत्तीचा मानकरी

इस्रोची मानाची 'धवन' शिष्यवृत्ती पटकावलेल्या आदित्य चाफळकर या पुणेकर तरुणाने पदव्युत्तर पदवीच्या परीक्षेतही उत्तुंग यश मिळवले आहे. या शिष्यवृत्तीवर कॅलिफोर्नियाला 'एअॅरोस्पेस' विषयात पदव्युत्तर पदवी घेण्यासाठी गेलेल्या आदित्यने तेथील अंतिम परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला. आदित्य सध्या कॅलिफोर्नियात आहे. आदित्यचे शिक्षण पुण्यातील भावे प्रशालेत मराठी माध्यमातून झाले आहे. 'एअरोस्पेस' या विषयात पदवी घेतल्यानंतर त्याची 'इस्रो'च्या (इंडियन स्पेस रीसर्च ऑर्गनायझेशन) 'धवन' शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आली. ही शिष्यवृत्ती पटकावणारा आदित्य हा पहिला विद्यार्थी ठरला. या शिष्यवृत्तीवर त्याने कॅलिफोर्नियातील 'कॅलटेक युनिव्हर्सिटी'त जाऊन एअरोस्पेस विषयातील नऊ महिन्यांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला. नुकताच या

अभ्यासक्रमाचा पदवीप्रदान समारंभ झाला असून आता आदित्य परत येऊन इस्त्रोमध्ये रुजू होणार असल्याने चाफळकर यांनी सांगितले.

## 'राम नगरकर कलागौरव' पुरस्कार

राम नगरकर यांच्यावर सिनेमा होणार असे कळतेय, या सिनेमात रामभाऊंची भूमिका मला मिळावी, असा मी हट्ट करेन.... अशा शब्दांत प्रसिद्ध अभिनेते भालचंद्र ऊर्फ भाऊ कदम यांनी पहिला 'राम नगरकर कलागौरव पुरस्कार स्वीकारला. भाऊंच्या या हट्टाला नगरकर कुटुंबियांसह उपस्थित चाहत्यांनीही टाळ्यांच्या गजरात दाद दिली. ज्येष्ठ साहित्यिक द.मा. मिरासदार, ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे, नाट्य परिषदेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष सुरेश देशमुख, प्रसिद्ध एकपात्री कलाकार बंडा जोशी, अकादमीचे संस्थापक अध्यक्ष वंदन नगरकर, उपाध्यक्ष उदय नगरकर, संध्या आणि वैजंयती नगरकर आदी या वेळी उपस्थित होते.

'नगरकरांचे व्यक्तिमत्त्व नेहमीच प्रेक्षकांवर ठसा उमटवणारे तर त्यांचा विनोद निरागस होता. ते स्वत:वरही विनोद करायचे. मला वाटते स्वत:ची थट्टा हा सर्वश्रेष्ठ विनोद आहे,' असे मिरासदार म्हणाले.

सुहासिनी देशपांडे यांनी सहकलाकार म्हणून नगरकरांच्या मिश्किल स्वभावाचे किस्से सांगितले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात बंडा जोशी यांनी 'हास्यपंचमी' तर वंदन नगरकर यांनी 'रामनगरी' कार्यक्रम सादर केला. जुईली जोगळेकर यांच्या गाण्यांनाही रसिकांनी दाद दिली.

## ह. ल. निपुणगे यांच्या पुस्तकास पुरस्कार

सुखकर्ता सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने ह. ल. निपुणगे यांनी लिहिलेल्या 'हलचल' या पुस्तकास 'साहित्य संवर्धन' पुरस्कार २९ जून रोजी ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांच्या हस्ते देण्यात आला. तीन हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## खुटवड, खांडेकर यांना अत्रे पुरस्कार

सामान्य कुटुंबातून येऊन अंगी असलेल्या कौशल्याचा वापर करीत सु.ल. खुटवड, राजीव खांडेकर व सुप्रिया पाठारे यांनी आपापल्या क्षेत्रात झोकून देऊन निष्ठेने काम केले. त्यामुळे कऱ्हेकाठी आचार्य अत्रे यांच्या

नावाचा पुरस्कार हा जीवनाच्या वाटचालीसाठी मोठा गौरव व पाठबळच आहे, अशा शब्दांत गदिमा प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीधर माडगूळकर यांनी पुरस्कारार्थींचे कौतुक केले.

साहित्यसम्राट आचार्य प्र.के. अत्रे यांच्या सासवड (ता. पुरंदर) या जन्मगावी येथील आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानाच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारे, विविध क्षेत्रांसाठीचे पुरस्कार माडगूळकर यांच्या हस्ते वितरित झाले. अत्रे यांच्या नावाने दिला जाणारा 'साहित्यिक पुरस्कार' विनोदी लेखक सु.ल. खुटवड यांना, 'पत्रकारिता पुरस्कार' एबीपी माझाचे संपादक राजीव खांडेकर यांना व 'कलावंत पुरस्कार' दूरचित्रवाणीवरील विनोदी कलाकार सुप्रिया पाठारे यांना देण्यात आला. या वेळी अत्रे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, रावसाहेब पवार, नगराध्यक्ष निलीमा चौखडे, डॉ. नीलेश साबळे, 'सकाळ'चे सहयोगी संपादक रमेश डोईफोडे आदी उपस्थित होते.

## 'रोटरी लीडरशिप एक्सलन्स' पुरस्कार

वास्तुशोध प्रोजेक्टसचे व्यवस्थापकीय संचालक सचिन कुलकर्णी यांना रोटरी क्लब ऑफ पुणे विस्डम तर्फे रोटरी लीडरशिप एक्सलन्स पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले. किफायतशीर दरातील गृहप्रकल्प या क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल कुलकर्णी यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

उद्योगपती व कायनेटिक समूहाचे अध्यक्ष अरुण फिरोदिया यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. मानपत्र आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. या प्रसंगी बोलताना या कुलकर्णी म्हणाले की, अशा पुरस्कारांमुळे नक्कीच प्रेरणा मिळते आणि त्याबरोबरच आमची जबाबदारीही वाढते. पुण्यामध्ये आज सहा लाख किफायतशीर घरांचा तुटवडा आहे आणि ही तूट भरुन काढण्यासाठी वास्तुशोध प्रोजेक्टस आमच्या परीने प्रयत्न करीत आहे. येत्या तीन वर्षांमध्ये महाराष्ट्रामध्ये तेरा ते पंधरा हजार किफायतशीर घरे बांधण्याची योजना असल्याचे त्यांनी या प्रसंगी नमूद केले.

## हिराबाई लाखे यांना जीवनगौरव पुरस्कार

बालगंधर्व रंगमंदिराच्या ४६व्या वर्धापन दिनानिमित्ताने 'बालगंधर्व परिवारा'चा 'जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ लोककलावंत हिराबाई लाखे यांना, गायिका-अभिनेत्री कीर्ती शिलेदार यांना संगीत नाटकातील योगदानाबद्दल,

तर नाट्य समीक्षेबद्दल ‘सकाळ’चे उपसंपादक राज काझी यांना ‘बालगंधर्व पुरस्कार’ देण्यात आला.

इतर पुरस्कार विजेत्यांमध्ये प्रकाश पारखी, वंदन नगरकर, माधव थत्ते, प्रवीण बर्वे, प्रतिमा काळेले, रोहन पडर, मंदार बापट, विजय गायकवाड, पिंकी महाडीक, रेश्मा पुणेकर, राधिका पाटील, स्वरूपकुमार, भारती गोसावी, मंजिरी धामणकर, सतीश पंडित, नीलकंठ कुलकर्णी, रेश्मा एकबोटे, बाळासाहेब काळजे, विनायक कडवळे, बंडा देशमुख, सुरेश बांदल, भास्कर महाडीक, सुनील कुरपे, सखाराम भिलारे, दत्तोबा भाडाळे, जालिंदर दुलगुडे, सोमनाथ फाटके, व्यंकटेश गरुड, अनिल गोंदकर, बच्चू पांडे, कलाल पेंटर यांचा समावेश होता.


**४थी आवृत्ती**

# सुमीता

व्यंकटेश माडगूळकर

**किंमत : ३५०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




“तू आमचं नेतृत्व कर” असं म्हणून भास्करनं आपल्या हातातील मशाल सुमीताच्या हाती दिली. गांधीग्राममध्ये प्रवेश करता करता तिच्या हातातील कंदील आपल्या हातात घेतला. त्यांच्या मनात आलं की आपल्या ओळखीची सुमीता ही नव्हे....
प्रथम आपल्याला गावच्या सडकेवर दिसली ती ही नव्हे...
त्या जुन्या देवळाबाहेर पडताच थोडी अधिक शहाणी झालेली, ती ही नव्हेच...
हिच्यात नेमका कोणता बदल झालेला आहे हे तिला सांगता येत नव्हतं; पण आत्ताची सुमीता ही नवी होती; एक चमत्कार होता.




# पाथ्स ऑफ ग्लोरी

एव्हरेस्टवर प्रथम पाऊल ठेवण्याचा विक्रम थोडक्यात हुकला,
त्याची चटका लावणारी कहाणी




लेखक : जेफ्री आर्चर

अनुवाद : सुभाष जोशी

पृष्ठे ३६४ । किंमत ₹ ४०० । पोस्टेज ₹ ३० । सभासदांना सवलतीत

**जेफ्री आर्चर हा आजच्या काळातील एक सर्वाधिक बेस्टसेलर लेखक म्हणून ओळखा जातो. १९४० साली जन्मलेला जेफ्री आर्चर आज पंचाहत्तरीतही उत्साहाने लेखन करीत आहे. त्याच्या पुस्तकांच्या कोट्यवधी प्रती खपल्या आहेत आणि अनेक भाषात त्याच्या कथा-कादंबऱ्यांचे अनुवाद झालेले आहेत. आजच्या युगातला हा विलक्षण कथाकार, असामान्य रंजनकार, एखादा विषय निवडतो तेव्हा त्या विषयाला जणू आपल्या परीसस्पर्शाने सोन्याची झळाळी देतो.**

**एव्हरेस्ट हे जगातील सर्वोच्च शिखर. त्यावर प्रथम पाऊल ठेवणारे गिर्यारोहक म्हणून एडमंड हिलरी आणि तेनसिंग यांना ओळखले जाते. त्यांच्या आधीही तसा प्रयत्न अनेक साहसी गिर्यारोहकांनी केला आणि आता एव्हरेस्ट पादाक्रांत करणाऱ्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे.**

**१९२४ साली जॉर्ज मॅलरी एव्हरेस्टपासून सहाशे फुटांवर असताना बर्फात गाडला गेला. त्याचा शोध घेण्यासाठी अनेक मोहिमा काढण्यात आल्या. शेवटी १९९९ मध्ये १ मे रोजी जॉर्जचे कलेवर २६,७६० फुटांवर सापडले. त्याच्या जवळच्या पाकिटात त्याच्या प्रेयसी-पत्नीचा (रूथचा) फोटो मिळाला नाही. त्याचा कॅमेराही मिळाला नाही. या संपूर्ण मोहिमेतील प्रत्येक दिवसाची हकीकत जॉर्ज रूथला पत्राद्वारे कळवत असे. या पत्रांचा वापर करून जेफ्री आर्चरने पाथ्स ऑफ ग्लोरी या पुस्तकात या मोहिमेचा मागोवा घेतला आहे. एव्हरेस्ट प्रथम सर करण्याचा मान त्याला मिळाला नाही. त्यापासून तो वंचित राहिला. परंतु त्याच्या साहसाचे, मोल त्यामुळे कमी होत नाही. पत्रे आणि मोहिमेदरम्यानच्या घटना यांचा मेळ घालत जेफ्री आर्चरने मॅलरीची ऊर्जस्वल व्यक्तिरेखा उभी केली आहे.**

या पुस्तकाची वानगी म्हणून पुढे काही उतारे देत आहोत.

*१२ मार्च, १९२४*

*माझ्या लाडक्या रूथ,*

*बोटीवरच्या या प्रदीर्घ प्रवासाचा एक मोठा फायदा झाला, तो म्हणजे, एका उमद्या गटाचं नेतृत्व करायची संधी मला मिळालेली आहे, हे माझ्या लक्षात आलं. मी नेहमी, स्वत: केलेल्या त्यागाचाच विचार करत असतो, पण या जगावेगळ्या धाडसी मोहिमेवर जाण्यासाठी, माझ्याबरोबर यायला तयार झालेल्या या तरुणांनी केलेल्या त्यागाचा, मी पुरेसा विचारच करत*

*नाही. आपल्या मित्रांना आणि कुटुंबाला सोडून जाताना, त्यांनाही किती यातना होत असतील, याची मला कल्पना आहे.*

*माझा सुरुवातीला जरी गैरसमज झाला असला, तरी हा सॅण्डी आयर्विन, पोरगा, फारच तल्लख बुद्धीचा आहे. तो फक्त २२ वर्षांचा जरी असला, तरी त्याच्या रुंद खांद्यावर, उत्तरेकडच्या हुशार माणसाचं डोकं घट्ट बसवलेलं आहे. आता तो आणि मी बिर्केनहेडला राहतो, हा योगायोग, एखाद्या कादंबरीतही अतिशयोक्तीचा वाटेल.*

*अर्थात, तो अजून ५,५०० फुटांच्यावर गेलेला नाही, याची मला काळजी वाटते, पण आम्हा सर्वांपेक्षा, जास्त तंदुरुस्त आहे, हे मला मान्य करावंच लागेल. आम्ही बोटीवर सकाळी जनरलसाहेबांच्या तीक्ष्ण नजरेखाली व्यायाम करतो, तेव्हा काही प्रवासी आमची कवायत पाहत असतात. आमच्या या मेळाव्याला जनरल ब्रुस, आनंदाने मार्गदर्शन करतात, पण त्यात सहभागी होण्याचा विचारही, त्यांच्या मनाला शिवत नाही.*

*मला आणखीन एक कबुली दिलीच पाहिजे. आयर्विनच्या रसायनशास्त्राच्या ज्ञानाबद्दल, हिंक्स जे काही बोलला होता, त्यात अजिबात अतिशयोक्ती नव्हती. तो फिंचइतकाच त्या शास्त्रात निपुण आहे. अर्थात, नॉर्टन आणि ओडेलना, अजूनही ऑक्सिजनचा वापर करू नये, असंच वाटत आहे, मग ती अवजड नळकांडी, पाठीला बांधण्याची गोष्टच दूर. या उपकरणांच्या शिवाय, शिखरावर जाणं अशक्य आहे, हे ते शेवटी मान्य करतील का? का ते, फिंचच्याच शब्दांत सांगायचं तर, असले हटवादी नवखे, अपयशीच झाले पाहिजेत? याचं उत्तर येणारा काळच देईल.*

***

*आमची बोट बॉम्बेच्या बंदराला २० मार्चला लागली आणि आम्ही लगेचच, दार्जिलिंगला जाणाऱ्या गाडीत बसलो. तिथे गेल्यावर, आम्ही आमचे शेर्पा आणि खेचरं निवडली. जनरल ब्रुसने परत एकदा चमत्कार केला आणि आम्ही दुसऱ्या दिवशीच, साठ खेचरं आणि १०० शेर्पांच्या सोबत, आमचा तिबेटचा लांब पल्ल्याचा प्रवास सुरू केला. छोट्या गाडीने दार्जिलिंगला जाण्याच्या आधी, आम्ही लॉर्ड लिटन बरोबर रात्रीचे भोजन घेतले. ते इथले नवीन गव्हर्नर-जनरल आहेत. त्यांनी आणि त्यांच्या पत्नीने आमची उत्तम बडदास्त ठेवली होती. अर्थात, या वेळी फिंच नसल्यामुळे, फारसं विशेष काही सांगण्यासारखं घडलंच नाही, मात्र एक नक्की, की*

*आयर्विन, गव्हर्नर-जनरलच्या मुलीवर फिदा झाला होता आणि आपल्या मुलीला- लिंडाला- लेडी लिटन प्रोत्साहन देत होती.*

*माझ्या बहिणीने, मेरीने, पाठवलेलं एक पत्र, माझी एम्बसीमध्ये वाट बघत होतं. तिच्या नवऱ्याची सिलोनला बदली झाली आहे, हे नशीबच म्हणायचं, कारण सिलोनला पाऊस सुरू झाला, की सुमारे दहा दिवसांनी, तो हिमालयात पोहोचतो. ती आम्हाला आता त्याची आधीच कल्पना देऊ शकेल. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही, ८० मैलांवरील असलेल्या तिबेटच्या दिशेने निघालो. हा सर्व प्रवास सुखरूप झाला. दुर्दैवाने जनरल ब्रुसना मलेरियाची लागण झाली आणि त्यांना दार्जिलिंगला परतावं लागलं. आता ते आम्हाला भेटणारच नाहीत, अशी भीती मला वाटते. जाताना त्यांनी सिगारच्या बारा पेट्या, वाईन आणि शँपेनचे निम्मे खोके, टबबाथ आपल्याबरोबर नेले - मात्र बाकीचं निम्मं सामान, त्यांनी दयाळूपणे, मागे आमच्यासाठी ठेवलं. हो, आणि त्या झोंगपेनसाठी आणलेल्या भेटवस्तूही त्यांने आमच्या स्वाधीन केल्या. आम्ही जेव्हा तिबेटच्या सीमेवर, आमची कागदपत्रे दाखवू, तेव्हा अर्थातच झोंगपेनला त्या द्याव्या लागतील.*

*जनरलचा दुय्यम साहाय्यक असलेल्या लेफ्टनंन्ट कर्नल नॉर्टनने, आता मोहिमेची सर्व सूत्रं ताब्यात घेतलेली आहेत. तुला नॉर्टन आठवत असेलच. त्याच्या नावावरच, सर्वांत उंच चढाई करण्याचा विक्रम, प्रथम नोंदला गेला होता, पण त्या फिंचने केवळ चोवीस तासांतच, तो निष्ठुरपणे, त्याच्यापासून हिसकावून घेतला. नॉर्टन त्याविषयी कधी बोलत नाही, पण मला माहीत आहे, की त्याला सगळा हिशेब चुकता करायचा आहे; निदान त्यासाठी तरी त्याने २७,००० फुटांवर गेल्यावर, ऑक्सिजनच्या वापराला मान्यता द्यावी. तसं झालं, तर तोच माझ्याबरोबर शेवटच्या चढाईसाठी असेल, हे उघडच आहे. सोमरवेलचं मत आता बदलत चाललेलं आहे, असं वाटतं. त्याने जर ऑक्सिजन वापरला, तर तोसुद्धा मला पर्यायी साथी ठरू शकतो. एक मात्र नक्की, शेवटचे २,००० फूट बाकी राहिले असताना मी त्या ओडेलबरोबर मात्र शिखरावर जाणार नाही.*

*या वेळी सीमा पार करताना आम्हाला अजिबात त्रास झाला नाही. आम्ही स्वत: जरी जुने बूट आणि बॉम्बेमध्ये विकत घेतलेली स्वस्तातली घड्याळं वापरत असलो, तरी झोंगपेनवर मात्र आम्ही हॅरोड्स, फोर्टनुम्स, डेव्हीडॉफ्स आणि लाक्समधल्या भेटवस्तूंचा मारा केला. संगीत समूहाचं संचालन*

*करणारा जी काळी छडी वापरतो, तशाच एका छडीवर, इंग्लंडच्या राजाच्या डोक्याची चांदीची प्रतिमा लावलेली छडी, मी त्याला भेट दिली आणि 'ही स्वतः राजेसाहेबांनी दिली आहे' अशी थाप मारली, तेव्हा झोंगपेन भयानक खूश झाला.*

*जनरल ब्रुसची तब्येत चांगली नसल्याचं ऐकून, आपल्याला वाईट वाटलं, अस जेव्हा झागेंपेन म्हणाला, तेव्हा सर्वांनाच आश्चर्य वाटलं. आपल्या जुन्या मित्राला भेटायला तो अधीर झाला असावा. त्याने जनरलचं हाफ-हंटर हातात घातलं होतं आणि त्याच्या गळ्यात त्यांची साखळी लटकत होती, हे माझ्या लक्षात आलं, पण माझा ओल्ड वाकेहॅमिस्टचा टाय कुठे दिसला नाही.*

***

*सकाळी पांग-ला पासून जाताना, अचानक ढग पांगले आणि आम्हाला, क्षितिजावर चोमोलुन्माचं शिखर तळपताना दिसलं. परत एकदा तिच्या सौंदर्यापुढे मी निःशब्द झालो. एखादा चाणाक्ष माणूस, भुरळ पाडणाऱ्या तिच्या सौंदर्याला बळी न पडता, पाठ फिरवेल, पण त्या बासरीवाल्या-प्रमाणेच, ती या खडकाळ आणि फसव्या प्रदेशात, लोकांना आकर्षित करून आणतच असते.*

*आम्ही जसे उंच उंच जात आहोत, तसा मी, आयर्विनवर बारीक नजर ठेवून आहे, मला वाटतं, तो आमच्याइतकाच, या वातावरणाशी रुळलेला आहे, पण काही वेळा, मी हे विसरतो, की तो माझ्याहून, सोळा वर्षांनी लहान आहे.*

***

*आज सकाळी आम्ही, एव्हरेस्टच्या पार्श्वभूमीवर, गेल्या मोहिमेत, आपले प्राण गमावलेल्या, न्यिमणा आणि सहा शेर्पांना श्रद्धांजली वाहिली. या खेपेला आम्हाला शिखरावर जायलाच हवं, इतर कोणासाठी नाही, तरी या शेर्पांच्या दुखःद आठवणीसाठी.*

*आज न्यिमा माझ्या बाजूला उभा असायला हवा होता, कारण माझ्या मनात जराही संदेह नाही, की मी त्य्ण २१,००० फुटांवरला, क्रमांक तीनचा तळ, सुसज्ज णआहे. तिथे सर्वांत तरबेज असलेले, अकरा शेर्पा, गाय बुलॉकणच्या आधिपत्याखाली सज्ज आहेत.*

*हे सगळं, त्या नोएलने दिलेल्या ८,००० पौंडांमुळे शक्य झाले आहे आणि विसरता येणार नाही, आमच्या आजूबाजूला जे काही हलत असेल, त्याचं चित्रण, त्याची मंडळी करत आहेत. याची जेंव्हा संस्करीत आवृत्ती दाखवण्यात येईल, तेव्हा, ती 'बर्थ ऑफ ए नेशन'लाही मागे टाकील.*

***

*मी हे पत्र आमच्या पायथ्याच्या तळावरून लिहीत आहे. काही मिनिटांतच, मी त्यांच्याबरोबर जेवायला जाईन तेव्हा, नॉर्टन मला या मोहिमेची सूत्रं हातात सोपवेल. नंतर मी माझ्या सहकाऱ्यांना, माझी एव्हरेस्टवर जाण्याच्या योजनेची सविस्तर माहिती देईन तेव्हा लाडके, आता आमच्या धाडसी उपक्रमाला सुरुवात होणार आहे. या खेपेस, मला विजयी होऊन परत येण्याची फार खात्री वाटत आहे. मी तिथे पोहोचलो, की मग एक बटण दाबीन आणि काही क्षणांतच, तू माझ्या शेजारी उभी असशील. हे वाचून, तुझ्या लक्षात येईलच, की मी एचजी वेल्सचं, टाइम मशीन हे पुस्तक, परत वाचायला घेतलेलं आहे. अर्थात हे काल्पनिक बटण, जरी मला दाबता आलं नाही, तरी मी, माणसाला शक्य असेल, तितक्या वेगाने परत तुझ्याकडे येईन, कारण मला नंतर एक क्षणही तुझ्यापासून लांब राहायचं नाही आणि तुला वचन दिल्याप्रमाणे, मी शिखरावर पोहोचलो, की तिथे तुझा फोटो ठेवणार आहे...*

***

## गुरुवार : १ मे, १९२४

त्या तंबूत आठजण, टेबलाभोवती जमलेले होते. ''सभ्य गृहस्थांनो, हिज मॅजिस्स्टी द किंग,'' असं म्हणत, टेबलाच्या प्रमुख स्थानावर बसलेल्या नॉर्टनने हातातला मग उचलला. बाकीचे सगळे ताडकन उभे राहिले आणि त्यांनी आपापल्या हातातले मग उंचावले. आणि म्हणाले, 'द किंग.'

''कृपा करून, तसेच उभे राहा,'' जॉर्ज म्हणाला, ''चोमोलुन्मा, पृथ्वीची देवता,'' असं म्हणत, त्याने हातातला मग, परत एकदा उंचावला. परत सगळ्यांनी हातातले मग उंचावले. तंबूच्या बाहेर असलेले शेर्पा, पाठीवर झोपून, डोंगराच्या दिशेने बघत बसले होते.

''मित्रांनो, तुम्ही आता धूम्रपान करू शकता.''

सगळे खाली बसले आणि हातातली सिगार पेटवत, रक्षापात्र

दुसऱ्याकडे देऊ लागले. काही क्षणांतच जॉर्ज उभा राहिला आणि त्याने समोरच्या ग्लासवर, चमच्याने आवाज करत, सगळ्यांचं लक्ष वेधलं.

"आज इथे, या प्रसंगी जनरल ब्रुस नाहीत, हे आपलं दुर्भाग्य आहे आणि आपणा सर्वांना त्यांची फार उणीव भासत आहे, हे मला नमूद करावसं वाटतं."

'हियर, हियर, - हियर, हियर, हियर'चा जल्लोश झाला.

"आणि त्याने आपल्याला नजराणा केलेली वाईन, जी आज संध्याकाळी आपण चाखतो आहोत, त्याच्याबद्दल, त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. आपण अशी आशा करूया, की त्यांनी दिलेली शँपेन, आपल्याला उघडायची लवकरच, संधी मिळेल."

परत एकदा, 'हियर, हियर, हियर, - हियर, हियर'चा जल्लोश झाला.

"जनरलसाहेबांच्या दूरदृष्टीला आणि त्यांच्या धोरणीपणाला आपण दाद दिली पाहिजे, की त्या राक्षसाला काबूत करून, परत आपापल्या गावी आपलं नेहमीचं आयुष्य व्यतीत करायला, आपण परत जाऊ शकू. शेवटच्या चढाईसाठी कुठले दोन चमू असतील, ते मी अजून ठरवलेले नाही, हे मला मुद्दाम सांगितलं पाहिजे."

"गेल्या वेळेप्रमाणे, मी प्रत्येकावर नजर ठेवून असेन आणि इथल्या वातावरणाशी, कोण जास्त रुळलेला आहे, याचा तपास करीन हे लक्षात घ्या आणि उद्या सकाळी सहा वाजता, आगेकूच करायला तयार राहा. उद्या आपल्याला दुपारपर्यंत १९,००० फुटांवर पोहोचून, सूर्यास्ताच्या आत, परत या ठिकाणी यायचं आहे."

"आपल्याला जर लवकरात लवकर, वरतीच चढाई करत राहायचं असेल, तर परत, खाली कशाला यायचं?" आयर्विनने विचारलं.

"लवकरात लवकर नाही," जॉर्ज म्हणाला आणि त्याला अननुभवी आयर्विनच्या बोलण्याचं हसू आलं, "इथल्या वातावरणाशी रुळायला, तुलाही काही कालाचा अवधी द्यावा लागेल," तो पुढे म्हणाला, "मला शेवटी २३,००० फुटांवर जाऊन, तिथे नार्थ कोलला आपला चौथा पाडाव टाकायचा आहे. तिथे आपण रात्र काढली की २५,००० फुटांवर आपला पाचवा तळ आपण उभारू. शेवटी २७,००० फुटांवर आपला सहावा तळ असेल आणि तिथूनच आपण, आपल्या शेवटच्या चढाईसाठी जाणार आहोत." पुढचं वाक्य बोलण्याच्या आधी जॉर्ज थांबला. "तुमच्या

माहितीसाठी सांगतो, की तिथे मी ज्या दोघांना माझ्याबरोबर घेईन, ते या शिखरावर दुसऱ्यांदा चढाई करणारं पथक असेल आणि त्यांनाच इतिहास घडवण्याचा पहिला मान मिळेल. या मोहिमेला जर यश लाभलं नाही, तर दुसऱ्या दिवशी, मी आणि माझा एक जोडीदार, दुसरा प्रयत्न करू. मला कल्पना आहे, की आपल्यातल्या प्रत्येकालाच, चोमोलुन्मावर प्रथम पाऊल ठेवण्याची इच्छा आहे, पण हे तुम्हाला सांगणं रास्त ठरेल, की तो पहिला माणूस, मी असेन.''

यावर सगळे हसले आणि त्यांना टेबलावर मग आपटून आनंद व्यक्त केला. थोडासा आवाज कमी झाल्यावर, जॉर्जने, 'कोणाला काही प्रश्न आहेत का' विचारलं.

''आता दुसऱ्या प्रयत्नाच्या वेळी, तू ऑक्सिजनचा विचार करणार आहेस का?'' नॉर्टनने विचारलं.

''हो, करणार आहे. तो फिंचच बरोबर होता, या निर्णयाला मी येऊन पोहोचलो आहे आणि शेवटचे २,००० फूट, त्याचा वापर केल्याशिवाय चढणं केवळ अशक्य आहे.''

''तसंच जर असेल, तर मग मला पहिल्या वेळीच पाठव, म्हणजे मी तुझं म्हणणं चुकीचं ठरवून दाखवीन. थोडीशी शरमेची बाब आहे मॅलरी, पण एव्हरेस्टवर पाय ठेवणारा मीच पहिला माणूस असेन.''

या वेळी जास्तच जोरात टेबलावर मग आपटले गेले आणि आनंद व्यक्त झाला.

''नॉर्टन,'' जॉर्जने त्याला सुनावलं, ''तू जर तसं केलंस, तर दुसऱ्या दिवशी, मी ऑक्सिजनशिवाय अनवाणी चढाई करीन.''

''ते तर फारसं विशेष होईल असं वाटत नाही,'' आपला मग, जॉर्जच्या दिशेने उंचावत, नॉर्टन म्हणाला, ''कारण दुसऱ्याचं नाव कोणीच लक्षात ठेवत नाही.''

***

''हाऊझ दॅट!''

''नॉट आउट.''

आपण स्वप्न तर बघत नाही? मॅलरीला प्रश्न पडला, का आपण खरंच क्रिकेटचा चेंडू बॅटवर आदळलेला ऐकला? त्याने तंबूतून डोकं बाहेर काढलं, तेव्हा हिमालयाच्या बर्फाळ जमिनीचं, इंग्लिश क्रिकेटच्या मैदानात

रूपांतर झालेलं, त्याला दिसलं.

२२ यार्डांवर बर्फात वापरायच्या दोन कुदळी, स्टंप्सप्रमाणे खोचल्या होत्या. ओडेलच्या हातात चेंडू होता आणि तो आयर्विनला गोलंदाजी करत होता. काही चेंडू टाकलेले पाहिल्यावरच, बॅट चेंडूला भारी पडत असल्याचं मॅलरीच्या लक्षात आलं. बाजूला शेर्पा घोळक्याने उभे होते आणि आपापसात बोलत होते. या इंग्लिश खेळाकडे ते कौतुकाने पाहत होते आणि एखादा कसोटी सामना असावा, अशा थाटात, नोएल त्याचं चित्रीकरण करत होता.

मॅलरी रांगत आपल्या तंबूतून बाहेर पडला आणि यष्टिरक्षण करणाऱ्या नॉर्टनच्या शेजारी, पहिल्या स्लिपमध्ये उभा राहिला.

''आयर्विन, गड्या मस्त चाललेलं आहे,'' नॉर्टन म्हणाला. ''तो अर्ध शतकाच्या जवळपास पोहोचला होता.''

''हा किती वेळ फलंदाजी करतो आहे?'' जॉर्जने विचारलं.

''जवळपास अर्धा तास.''

''आणि तो अजूनही धावा काढू शकतो आहे?''

''काहीच अडचण दिसत नाही. त्याची फुप्फुसं फुग्यांसारखी असतील, मला वाटतं, पण एक विसरू नकोस मॅलरी, तो सर्वांच्यापेक्षा कमीतकमी पंधरा वर्षांनी लहान आहे.''

''कॅप्टन उठा, झोपा काढू नका,'' मॅलरीच्या बाजूने बॉल गेला, तेव्हा ओडेल ओरडला.

''माफ कर ओडेल, माझं लक्ष नव्हतं,'' मॅलरी म्हणाला.

आयर्विनने पुढच्या बॉलला चौकार ठोकला आणि आपलं, सर्वांत उंच जागेवरचं, अर्धशतक पूर्ण केलं, तेव्हा त्याचं टाळ्या वाजवून स्वागत करण्यात आलं.

''या साल्या ऑक्सफर्डच्या माणसाची मी फार टुरटुर सहन केली,'' असं म्हणत, गाय बुलॉकने ओडेलकडून चेंडू हातात घेतला.

गायच्या पहिल्या चेंडूवर, आयर्विनने चौकार मारला आणि चार धावा मिळवल्या, मात्र दुसरा चेंडू बर्फाळ जमिनीवर सरकला आणि त्याने आयर्विनच्या बॅटची कड चाटली आणि आपल्या उजव्या बाजूला झेपावणाऱ्या जॉर्जच्या हातात पडला.

''छान पकडलास, कॅप्टन. तू थोडा आधी यायला हवा होतास.''

''चला मुलांनो, आता बंद करा. अर्ध्या तासात मला इथून बाहेर पडायचं

आहे.''

अचानक ते मैदान ओस पडलं आणि सगळे क्रिकेटवीर आता कसलेल्या गिर्यारोहकाच्या भूमिकेत शिरले. तीस मिनिटांत, नऊ गिर्यारोहक आणि तेवीस शेर्पा, तयार होऊन सज्ज झाले. एखाद्या वाहतूक पोलिसाप्रमाणे मॅलरीने हात केला आणि ते सगळे मार्गस्थ झाले. या वरच्या उंचीवर कोणाचा निभाव लागणार नाही, ते आज समजणार होतं.

एक-दोन शेर्पा वाटेतच धडपडले आणि त्यांचं सामान बर्फात पडलं. ते परत खाली आले. गिर्यारोहकांच्यापैकी कोणालाच काही त्रास जाणवत असल्यासारखं वाटलं नाही. पाठीवर दोन सिलेंडर्सची अवजड नळकांडी असली, तरी आयर्विन, आपल्या नेत्याच्या पावलावर पाऊल ठेवून चालला होता.

मॅलरी थोडा बुचकळ्यात पडला, कारण आयर्विनने तोंडावरचा मास्क लावलेला नव्हता. हा आपल्या सोबत असेल, असं जॉर्जला वाटलं. ''आपण २५,००० फुटांवर जाईपर्यंत, तुला ऑाक्सिजन लागणार नाही आयर्विन,'' तो म्हणाला.

आयर्विनने मान डोलववली. ''आपण किमान २७,००० फुटांवर जाईपर्यंत, या किमती वस्तूचा एक औंसही वापरायचा नाही, असं मी ठरवलेलं आहे. खरं तर मला या जास्तीच्या वजनाची सवय व्हावी म्हणून मी हे बरोबर घेतलेले आहेत. मी आधी तिथे जाऊन बसणार आहे,'' शिखराकडे बोट दाखवत, तो म्हणाला, ''आणि तिथे तुमची वाट बघणार आहे. संधी मिळाली की घाव घालणं, हे आम्हा ऑक्सफर्डच्या लोकांचं आद्य कर्तव्य आहे.''

जॉर्जने त्याच्या बोलण्याला दाद दिली. ''उद्या ती तुझी नळकांडी माझ्या पाठीवर बांध. प्रश्न नुसत्या वजनाचा सराव होण्याचा नाही, तर, एखाद्या खडकाला किंवा बर्फाच्या अडथळ्याला वळसा घालून जाताना, थोडं जरी वजन कललं, तरी तोल जाऊ शकतो आणि ते फार भयानक ठरू शकतं.''

दोन तासांच्या चढाईनंतर, जॉर्जने सगळ्यांना विश्रांतीची सुट्टी दिली. डायजेस्टीव्ह बिस्कीट्स आणि चहा प्यायल्यावर सगळे माघारी परतायला लागले. गिर्यारोहणाच्या दृष्टीने वातावरण तर फारच आदर्श होतं. मधूनच बर्फाची भुरभुर व्हायची, पण त्याने बर्फात खेळणारी मुलंही विचलित झाली नसती. अशीच हवा किती दिवस राहील, त्याचा जॉर्ज विचार करायला

लागला.

त्याने मनोमन प्रार्थना केली, पण त्याच्या प्रार्थनेला अनुकूल प्रतिसाद मिळाला नाही.

***

*१७ मे, १९२४*

*माझ्या लाडक्या रूथ,*

*भयानक उत्पात. गेल्या दोन आठवड्यांत, काहीच मनासारखं घडलेलं नाही. हवा फारच विचित्र झाली आहे. बर्फवृष्टी तर इतकी तुफान होते आहे, की नाकासमोर काही फूट अंतरावरचंही दिसत नाही.*

*नॉर्टन, नेहमी सिंहासारखा धाडसीपणाने वागतो. तो आणि सोमरवेल कसेबसे २३,४०० फुटांवर पोहोचले आणि तिथे चौथ्या क्रमांकाचा तळ ठोकला आणि तिथेच रात्र काढली. दुसऱ्या दिवशी त्यांना परत तिसऱ्या तळावर यायला रात्र झाली. बर्फाच्या वर्षावात, २,४०० फूट अंतर कापायला त्यांना आठ तास लागले, कल्पना कर, किती जिकिरीचं काम असेल...! म्हणजे ते तासाला फक्त १०० यार्ड चालू शकले - हेच अंतर हेरॉल्ड अब्राहमने ९.६ सेकंदात पार केलं होतं.*

*दुसऱ्याच दिवशी, मी, ओडेल आणि बुलॉकने, २५,३०० फुटांवर जात, तिथे बर्फाच्या कड्यावर कसाबसा पाचव्या तळाचा तंबू ठोकला, पण तिथे एक रात्र काढल्यावर, वाईट हवामानामुळे आम्हाला परत तिसऱ्या तळावर यायला लागलं. परत आलो तेव्हा डॉ. हिंग्स्टनने आमचं स्वागत एक बातमी देऊन केलं. एका शेर्पाचा पाय मोडला होता, तर दुसऱ्याला न्यूमोनिया झाल्याचा संशय होता. माझा गुडघासुद्धा आता जरासा त्रास देत असल्याचं, मी त्यांना सांगितलंच नाही. गाय आणि त्या दोघांना परत खाली नेण्याची तयारी दाखवली, हा त्यांचा चांगुलपणा आहे. तिथून त्या दोघा शेर्पांना त्यांच्या गावी पाठवण्याची व्यवस्था करण्यात येईल.*

*दुसऱ्या दिवशी गाय परत आला, तेव्हा त्याने फारच भयानक बातम्या सांगितल्या. आमच्या चांभाराला, हिमबाधा होऊन तो मेला, गुरख्याला मेंदूत गाठ झाल्यामुळे तो अस्वस्थ आहे आणि बारा शेर्पा पळून गेले. आता आठवड्याला त्यांना एक शिलिंग पगार मिळतो, तेव्हा त्यांना काय दोष देणार? थोडक्यात म्हणजे, तळावरच्या पाडावातल्या माणसांची मानसिकता फार दुर्बल झाली आहे, अर्थात इथे वरही काही वेगळं नाही.*

***

*नॉर्टन आणि सोमरवेल, शेवटी एकदाचे नॉर्थ कोलला पोहोचले आणि तिथे तंबू टाकला, तेव्हा शून्याखाली २४ अंश तापमान होतं. ते परत यायला निघाले, तेव्हा बर्फाचे कडे कोसळतील या भीतीने चार शेर्पा परत वर गेले आणि तिथेच नॉर्थ कोलला रात्र काढली. दुसऱ्या दिवशी मी, नॉर्टन आणि सोमरवेलने बचाव कार्य सुरू केले आणि त्या शेर्पांना त्यातल्यात्यात सुरक्षित जागी, म्हणजे, तिसऱ्या तळावर आणलं. ते आता पळून जातील, यावर मी पैज लावायला तयार आहे.*

*हे सगळं पुरेसं नव्हतं, म्हणून की काय, आमच्या हवामान खात्याच्या माणसाने मला सकाळी नाश्त्याच्यावेळी सांगितलं, की लवकरच पावसाळा सुरू होण्याची दाट शक्यता आहे, अर्थात गेल्या वेळेला भरपूर पाऊस पडल्यानंतर मग किती दिवस आकाश स्वच्छ होतं, याचीही त्याने मला आठवण करून दिली, पण असल्या ठोकताळ्यांवर, किती विश्वास ठेवायचा? मी मात्र जो कोणी हवामानाचा देव असेल, त्याची प्रार्थना केली आणि तितकंच माझ्या हातात आहे...*

***

एव्हरेस्टवर चढाई करण्याच्या नादात, जॉर्जचं, आजूबाजूच्या परिस्थितीकडे लक्षच गेलं नाही. नॉर्टनने जेव्हा एक तातडीची बैठक बोलावली, तेव्हा त्याला काही विपरीत घडत असल्याचं जाणवलं.

''सद्य: परिस्थितीत, मित्रांनो, आपण आपलं आणखीन नुकसान करून घेण्यापेक्षा, आपला दौरा अर्धवट सोडून, माघार घेणंच उचित ठरेल.''

''मला नाही तसं वाटत,'' जॉर्ज लगेचच म्हणाला. ''हेच जर करायचं होतं, तर आपण आपल्या आयुष्यातले सहा महिने, वाया घालवले आणि लोकांना दाखवायला हातात काही नाही.''

''निदान परत लढण्यासाठी, आपण जिवंत तर असू,'' सोमरवेल म्हणाला.

''आपल्याला कोणीही परत एखादी संधी देणार नाही, सोमरवेल. ही आपली शेवटचीच संधी आहे आणि ते तुलाही चांगलंच माहीत आहे.''

जॉर्जच्या बोलण्यातला आवेश पाहून, सोमरवेल क्षणभर अवाक झाला आणि काही वेळेनंतर बोलला, ''पण आपण जिवंत तर राहू.''

''माझी जगण्याची कल्पना फार वेगळी आहे,'' जॉर्ज परत त्वेषाने म्हणाला. दुसरा कोणी मध्ये बोलण्याच्या आधीच, त्याने गायला विचारलं,

''गाय तुझं मत काय आहे?''

सगळे जरी बुलॉकच्या उत्तराची वाट बघत असले, तरी तो लगेच काही बोलला नाही.

''मी अजूनही तुझ्या मतालाच पाठिंबा देईन, जॉर्ज,'' शेवटी तो म्हणाला. ''वातावरण सुधारण्याची आणखीन थोडे दिवस वाट बघायला हरकत नाही.''

''माझंही तेच मत आहे,'' आयर्विन म्हणाला, ''पण माझी परत जायलाही तयारी आहे, कारण तुमच्यामध्ये मीच सगळ्यात वयाने लहान असल्यामुळे, मला परत केव्हाही येता येईल.''

या बोलण्यावर सगळेच हसले, तेव्हा बैठकीतलं वातावरण जरा निवळलं.

''मला वाटतं, आपण आपलं दुकान बंद करायची आणखीन एक आठवडा वाट पाहावी,'' ओडेलने सूचना केली. ''जर त्यानंतरही हवामान सुधारलं नाही, तर आपण आपला पराभव मान्य करून, गाशा गुंडाळावा आणि घरी परत जावं.''

आपले सहकारी, या विचाराशी सहमत होत, माना डोलवत असल्याचं जॉर्जला दिसलं. या वेळी त्याला एसी बेन्सनचा सात्त्विक सल्ला आठवला : आपण पराभूत झालो आहोत, असं लक्षात येताच, मोठ्या मनाने स्वीकारा.

''ठरलं तर मग,'' जॉर्ज म्हणाला. ''आपण एक आठवडा वाट पाहू. जर हवामान सुधारलं नाही, तर मग नॉर्टन परत या मोहिमेची सूत्रं हातात घेईल आणि आपण इंग्लंडच्या दिशेने कूच करू.''

जॉर्जला वाटलं, आजचा दिवस तरी आपण जिंकला - का अचूक सांगायचं तर सात दिवस जिंकले, पण हे पुरेसं आहे का?

***

५.३०वा. सकाळी, १९९५ साली, १४ मे रोजी, सकाळी ५:३० वाजता जॉर्ज ली मॅलरी-२ याने, जॉर्ज आणि रूथचे लॅमिनेटेड फोटो, एव्हरेस्टच्या शिखरावर ठेवले. त्याच्याच शब्दात सांगायचं तर...

*तो आपल्या कुटुंबाचं थोडंसं राहिलेलं काम पूर्ण करत होता.*

३री आवृत्ती

# भारतीय साहित्यिक

डॉ. सुनीलकुमार लवटे

**किंमत : १४०/-रु.**

**पोस्टेज : ३०/-रु.**




आजच्या जागतिकीकरणाच्या रेट्यात जोपर्यंत आपण आपली भाषा, संस्कृती, साहित्य टिकवून धरू तोवरच आपले स्वतंत्र अस्तित्व आणि अस्मिता सुरक्षित राहील. जागतिक स्तरावरील ज्ञानाचे संपादन हे आज आपल्या समग्र भाषा व साहित्य व्यवहाराचे उद्दिष्ट होऊ पाहत आहे. ते उद्दिष्ट साध्य करताना आपणापुढे भारतीय ज्ञान, साहित्य, संस्कृती, भाषा जपण्याचे व ते सारे समृद्ध करण्याचेही आव्हान आहे.


अखिल भारतीय अकादमीक समाजनिर्मिती हे एकविसाव्या शतकातील आपले साहित्यिक लक्ष्य आहे. त्यासाठी भारतीय भाषा व साहित्याचे एकसमन्वयी, समयोचित रूप तयार करणे आवश्यक झाले आहे. त्याकरिता प्रत्येक भाषा व साहित्याची समृद्ध जाण हवी. अशी जाण भारतीय साहित्यिक हे पुस्तक तुमच्यात निर्माण करेल.

भारतासारख्या बहुभाषिक देशात भारतीय साहित्यिक सारखं पुस्तक संग्रही असणं म्हणजे भारतीयतेचं स्पंदन आपल्या हृदयाशी जपण्यासारखंच!




# बंदा रुपाया

साहित्य, इतिहास, नाट्य, संगीत आणि
सिनेमा क्षेत्रातील दिलदार आस्वादक अनुभूती




लेखक : विश्वास पाटील

पृष्ठे २४० । किंमत ₹ २२० । पोस्टेज ₹ ३० । सभासदांना सवलतीत

***पानिपत, झाडाझडती, महानायक, संभाजी, चंद्रमुखी इ. कादंबऱ्यांनी आपल्या प्रतिभेचे विविध रंग प्रकट करणाऱ्या विश्वास पाटील यांच्या 'नॉट गॉन वुइथ द वुइंड'मध्ये नाट्य-चित्रसृष्टीतील त्यांच्या स्वैर मुशाफिरीचा रसिकांनी आनंद लुटला. 'बंदा रुपया'मध्ये नाट्य, चित्रपट, संगीत, साहित्य यांची पंचरंगी भ्रमंती अशीच चिंतनशील आणि रंगतदार वाटेल.***

***वानगीदाखल एक लेख :***

# मृत्यूच्या छायेतील महापुरुष आणि खलपुरुष

'तो जन्माला आला, तेव्हा नागडाच होता. आपल्या कफनासाठी एक वाव कपडा मिळावा, या एका लालसेपायी पुढे जीवनभर तो खस्ता खात बसला!' मनुष्यदेहाचे असे अल्पाक्षरी, वास्तव वर्णन एका उर्दू शायराने केले आहे.

जेव्हा मनुष्य आपल्या कुमार अवस्थेत हुंदडत असतो; तेव्हा तो एका अज्ञानाच्या गाभुळत्या, उबदार धुंदीमध्ये वावरत असतो. अजून माझे खूप आयुष्य पडले आहे, जगायचे खूप बाकी आहे, असे म्हणता-म्हणता बालपण सटकन संपून जाते. पुढे येतो; तो तारुण्याचा कैफ. मी तरुण आहे... मी तरुण आहे... असा रोमारोमांत चाललेला कंठरव काही वर्षे कसाबसा टिकतो अन् एक दिवस तारुण्यही हरणाच्या पाडसासारखे चपळ उडी घेऊन, गुंगारा देऊन केव्हा पळून जाते, हेसुद्धा समजत नाही. पंचावन्न-साठीच्या उंबरठ्यावर आपला अखेरचा अध्याय चालू झाल्याची जाणीव फार थोड्यांना होते. त्यापुढे काही वर्षांनी शरीररूपी पानाचा देठ अधिक पिकला की, भली-भली माणसे – मग ते महापुरुष असोत वा खलपुरुष – सारी कासावीस होऊ लागतात.

साफल्यपूर्ण जीवनाची पुरचुंडी गाठीला बांधून 'हरीऽऽ हरीऽऽ' करण्याच्या तयारीत फार थोडे जण असतात. बाकीचे बहुतांशी गोंधळलेले असतात. आतून हादरून गेलेले असतात. 'अजून माझी जगायची खूप तृष्णा होती... हे करायचे होते... ते करायचे बाकी राहिले होते... अशा विचारांनी त्यांचे मस्तक पेटते.' जर तुम्ही फाजील धनसंचय केला असेल, तर त्या खजिन्याला विळखा घालायच्या इच्छेने अनेक विषस्पर्श

जिभल्या चाटीत तुमच्या आवतीभोवती वळवळत राहतात. बनेल नातलगांचे तांडे हाकलून दूर लोटले, तरी हक्क सांगत पाय रोवून उभे राहतात. तो कर्तृत्ववान पुरुष एका नारीऐवजी अनेक जणींच्या बाहुपाशात गुंतून गेला असेल, तर त्या हिसाब-किताबाची आणि संतापाची परी काही वेगळीच असते. महापुरुष असोत वा खलपुरुष – त्यांचा एकदा मृत्यूच्या अटळ दरवाज्याकडे प्रवास सुरू झाला की, तो अभ्यासकांसाठी चिंतनाचा, जनतेसाठी विस्मयाचा अन् कादंबरीकार व नाटककारांच्या लेखण्यांसाठी एक सुगीची पर्वणी ठरतो.

विदर्भातील एक ज्येष्ठ संशोधक आणि ललित लेखक शरद कोलारकर यांचे 'काही महनीय व्यक्तींचे अखेरचे दिवस' हे पुस्तक प्रस्तावनेसाठी माझ्याकडे आले, तेव्हा मला मोठी अपूर्वाई वाटली. या ग्रंथात एकीकडे महात्मा गांधी, अब्राहम लिंकन, चर्चिल, नेपोलियन, शिवाजीमहाराज, लोकमान्य टिळक, लेनिन, जवाहरलाल नेहरू, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. आंबेडकर... अशा महापुरुषांच्या मांदियाळीत पोहोचलेल्या श्रेष्ठ व्यक्ती आहेत; तशाच इंदिरा गांधी, जॉन एफ. केनेडी, झुल्फिकार अली भुट्टो, माओ, स्टॅलिन... असे राजकारणाच्या वादळावर आरूढ झालेले तेजस्वी तारे आहेत. याचबरोबर हिटलर, मुसोलिनी, औरंगजेब, बॅरिस्टर मोहमद अली जीना... यांच्यासारखे रंगतदार नाट्यमय जीवन लाभलेले खलपुरुषही आहेत. या अत्यंत वाचनीय,ललितरम्य लेखांचे परिशीलन करताना इतिहासातल्या आणि साहित्यातल्या अनेक ज्येष्ठांचे अखेरचे दिवस, त्यांच्या कथा-दंतकथा माझ्या डोळ्यांसमोरून तरळून गेल्याशिवाय राहिल्या नाहीत.

मृत्यू छोट्या वा मोठ्याचा असो – त्याच्या सावल्या, त्याची चाहूल वा हूल या गोष्टी तशा भीतिदायकच. त्याचे वर्णन कमी-अधिक शब्दांत करता येईल. या निमित्ताने बालपणी वसंत सबनीस आणि दादा कोंडके मंडळींनी सादर केलेली 'विच्छा माझी पुरी करा'ची बतावणी आठवते. हवालदार झालेले दादा शाहिरांना म्हणजे सबनीसांना विचारतात, ''राजा मरण पावला की, त्याचे वर्णन कसे कराल?''

''राजेसाहेबांचे महानिर्वाण!''

''अन् प्रधान मेला तर?''

शाहीर उत्तर देतो, ''प्रधानसाहेबांचे दु:खद निधन!''

''अन् माझ्यासारखा एखादा हवालदार गचकला तर?''

''चला, मातीला चलाऽ!'' एकूणच, राजा असो वा रंक, श्रेष्ठ वा कनिष्ठ; 'मृत्यू' हा एक ना एक दिवस प्रत्येकाच्या दरवाज्यावर न चुकता खडा राहणारा पाहुणा असतो.

पानिपताच्या ऐन घमासान महायुद्धात अहमदशहा अब्दाली गोविंदपंत बुंदेल्यांची मुंडी कापून ती संदुकीमध्ये घालून भाऊसाहेबांकडे पाठवून देतो. गोविंदपंत हे पेशव्यांचे उत्तरेतील कारभारी. बादशहा मुंडीसोबत पेशव्यांना चिठ्ठी पाठवतो, 'तुमच्या स्वागताची तयारी करावी, यासाठी तुमच्या आधी तुमच्या कारभाऱ्याला तिकडे स्वर्गात पाठविले आहे.' तेव्हा पेशवे त्याला जाबसाल पाठवून देतात, 'तो रस्ता कुणाला चुकला आहे? आम्ही मृत्यूचा मुका घ्यायला सिद्ध आहोत!'

महापुरुषांच्या वर्तनाने देश घडतात आणि काही वेळा त्यांच्या चुकीच्या निर्णयामुळे बिघडतातसुद्धा. त्यांच्या वास्तव्याने, कर्तृत्वाने देशाची, मानवी समाजाची उंची वाढते. खलपुरुषांच्या कारवायांमुळे काही राष्ट्रांची घडी विस्कटली आहे. दुसऱ्या महायुद्धात हिटलरने लक्षावधी ज्यूंची कत्तल केली. नेपोलियनने आपल्या तलवारीने अर्ध्या जगाचा नकाशा बदलला. बॅरिस्टर मोहमद अली जीनांच्या अंध महत्त्वाकांक्षेमुळे हिंदुस्थानसारख्या खंडप्राय देशाचे तुकडे झाले. त्यामुळेच समाजोद्धारक आणि देशतारक महापुरुषांच्या चरित्राबद्दल समाजमनाला आकर्षण असते. भविष्यातील चुका टाळण्यासाठी खलपुरुषांचे, क्रूरकर्म्यांचे चारित्र्यही तपासून पाहावे लागते.

बऱ्याचदा मनुष्य मेल्याशिवाय त्याची किंमत लोकांना कळत नाही अन् जेव्हा ती कळते, तेव्हा दुर्दैवाने वेळ निघून गेलेली असते. जॉन एफ. केनेडी आपल्या तारुण्यात अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत फक्त ०.२ टक्के मताधिक्याने, केवळ दैव बलवत्तर म्हणून निवडून आले होते. त्यांनी निक्सनचा पराभव केला होता. त्यांना लाभलेली शेलाटी शरीरयष्टी, त्यांचे मृदू हास्य आणि संभाषणातील चातुर्य या बळावर पाहता-पाहता ते लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन पोहोचले; परंतु अमेरिकेचे अध्यक्ष असलेल्या आपल्या कर्तृत्ववान पतीची किंमत त्यांची पत्नी जॅकलिन केनेडी हिला फारशी कधी समजली नाही. तिला म्हणे, अध्यक्षांच्या राजप्रासादाची – 'व्हाइट हाउस'ची – ॲलर्जी होती. त्यामुळेच नवऱ्याच्या विरोधाची तमा न बाळगता; ती ओनॅसिस नावाच्या कोट्यधीशाच्या 'ख्रिस्तिना' नावाच्या महागड्या ग्रीक जहाजावर मौजमजा करायला बाहेर पडली. दिनांक २२

नोव्हेंबर, १९६३ या दिवशी डलास येथे जनतेला अभिवादन करत उघड्या मोटारीतून केनेडी पुढे चालले होते. तेव्हा गर्दीतून दोन गोळ्या आल्या आणि जॉन केनेडी रक्तबंबाळ झाले. त्या वेळी 'ओऽऽ नो!' करीत जॅकलिनने त्यांना कळवळून मिठी मारली होती. दुर्दैवाने त्या गोळीबारातच तरुण केनेडींचा मृत्यू ओढवला.

महापुरुषांच्या अखेरच्या पर्वात त्यांच्या सोबत राहणारे, त्यांच्या सहवासाचा सुगंध लाभलेले कुणी कुशल लेखणीबहाद्दर सोबत असतील; तर त्यासारखी बहार नाही. टी. जी. तेंडुलकरांसारखा सव्यसाची अभ्यासक गांधीजींच्या सावलीची सोबत जीवनभर करत होता. त्यामुळेच त्यांनी लिहिलेले नऊखंडी चरित्र आणि टिपलेली असंख्य छायाचित्रे हा आज आपल्या राष्ट्राचा ठेवा बनला आहे. वंगबंधू चित्तरंजन दास यांच्या अखेरच्या दिवसांचे साक्षीदार या नात्याने नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी मोठ्या तन्मयतेने आपल्या आत्मचरित्रात त्यांचे करुण चित्र रेखाटले आहे.

बऱ्याचदा मृत्युपंथाच्या कुशीवरसुद्धा महापुरुष आपली विनोदबुद्धी शाबूत ठेवल्याशिवाय राहत नाहीत. मुंबईच्या सरदारगृहामध्ये जेव्हा लोकमान्य टिळक आपला अखेरचा अध्याय व्यतीत करत होते, तेव्हा आपल्या थोर पित्याच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी त्यांच्या सर्व मुली त्यांच्याभोवती गोळा झाल्या होत्या. तेव्हा त्यांच्याकडे पाहत लोकमान्य विनोदाने बोलले, ''पुन्हा सगळ्या जमलात का तुम्ही? नाहीतरी उठल्या-सुटल्या माहेरी यायची सवयच जडली आहे तुम्हाला.''

महापुरुषांच्या महानिर्वाणावेळा अनेक श्रद्धा-अंधश्रद्धांनाही ऊत आल्याशिवाय राहत नाही. लोकमान्यांना जेव्हा अखेरची घरघर लागली, तेव्हा ब्रह्मवृंदांना त्यांचा शेवट शुष्क पलंगावर होऊ नये असे वाटले, म्हणून त्यांनी त्यांच्यासाठी जमिनीवर दर्भाचे उच्चासन उभारले होते.

लोकमान्य टिळकांच्या अंत्ययात्रेला सुमारे दोन लाखांहून अधिक लोक गोळा झाले होते. पावसाची पर्वा न करता ती प्रचंड महायात्रा चालली होती. एका महनीय व्यक्तीने पुढे होऊन लोकमान्यांच्या ताटीला खांदा दिला. तेव्हा लोकमान्यांच्या शिष्याने त्यांना हटकले, ''तुम्ही ब्राह्मण नसल्यामुळे तुम्हाला खांदा देण्याचा अधिकार पोहोचत नाही.''

ती महनीय व्यक्ती म्हणजे मोहनदास करमचंद गांधी.

गांधीजींनी तिथल्या तिथे उत्तर दिले होते, ''मी लोकसेवक आहे;

लोकसेवकाला जात नसते.''

न. चिं. केळकरांसारख्या ज्येष्ठ पत्रकारांनी, देशसेवकांनी वृत्तान्त लिहिल्यामुळे लोकमान्यांच्या अखेरच्या दिवसांचे चित्रण चांगले झाले आहे. मात्र, जेव्हा रायगडावर शिवरायांचे महानिर्वाण झाले, तेव्हाचे प्रथमदर्शी पुरावे नाहीत. बखरकारांनी रेखाटलेल्या बखरी या खूप वर्षांच्या अंतरांनी लिहिलेल्या असल्यामुळे त्या ऐकीव गप्पांवर आधारित आणि बऱ्याचशा पूर्वग्रहदूषित अशाच आहेत. याउलट, डॉ. सुशीला नायरांसारख्या व्यक्तीमुळे महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी यांच्या अखेरच्या कालखंडावर चांगला प्रकाश पडतो.

गांधीजींच्या सोबत बासष्ट वर्षे संसार करणाऱ्या कस्तुरबांचाही अंतकाळ खूप करुण आहे. त्यांचे दु:खद निधन पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये कारावासात झाले, तेव्हा दुष्ट ब्रिटिश सरकारने त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी जास्तीत जास्त शंभर लोकांना हजर राहायची परवानगी दिली होती. कस्तुरबांच्या कृश देहाला बापूजींनीच स्नान करविले. स्वत: चरख्यावर कातलेली लाल काठाची साडी त्यांनी त्यांना नेसवल्याचे सुशीला नायर यांनी आपल्या डायरीत लिहिले आहे कोणा हरिलालला गांधीजींनी 'बाप' या नात्याने न्याय दिला नाही, असा गळा काढणारे आजकाल अनेक जण भेटतात. मात्र, त्यांनी हे विसरू नये की, न्यायमूर्ती खोसलांच्या अहवालानुसार भारत आणि पाकिस्तानदरम्यान झालेल्या भीषण दंगलीमध्ये सुमारे पाच लाख निरपराध जिवांना आपले प्राण गमवावे लागले होते. हिरोशिमा आणि नागासाकीमध्येसुद्धा मिळून दोन लाख लोक मृत्यू पावले होते. लाल किल्ल्यावरील १५ ऑगस्टच्या सोहळ्याला नवी कोरी वस्त्रप्रावरणे परिधान करून अनेक जण हजर होते. त्या खाशा समारंभात अनेकांची काव्यमय भाषणेही झाली; परंतु त्या क्षणी मोहनदास करमचंद गांधी नावाचा माणूस त्या उत्सवी समारंभाच्या आजूबाजूलाही फिरकला नाही. त्याच दरम्यान बंगालच्या नौखालीसारख्या भागात हिंदू-मुस्लिमांमध्ये दंगली उसळल्या होत्या. गांधीजी स्वत:चा जीव धोक्यात घालून आगीच्या वणव्यातून तेथे फिरत होते. जर गांधीजींनी जागोजाग दंगलग्रस्त भागांना भेटी देऊन लोकांची मने वळवली नसती, तर किमान पंचवीस लाख निरपराध जिवांना आपल्या प्राणांना मुकावे लागले असते.

काळच जणू थोरांच्या मृत्युपर्वाचे अनेकदा संकेत देत असतो. त्या दृष्टीने

गांधीजींच्या जीवनातील दिनांक २९ आणि ३० जानेवारी, हे दोन दिवस खूप महत्त्वाचे ठरतात. दिल्लीच्या तीन मूर्तीच्या लायब्ररीमधील पत्रव्यवहार, रोजनिश्या, ध्वनिमुद्रित संभाषणांचा धांडोळा घेतला की, अनेक गोष्टी बाहेर येतात. दिनांक २९ जानेवारीच्या दुपारी 'बिर्ला हाऊस'च्या हिरवळीवर गांधीजी उघड्याबंब अंगाने एका साध्या पंचानिशी उन्हाचा लाभ घेत होते. त्यांच्या डोक्यावर आसामी वळणाची टोपी होती. तेव्हा बापूंच्या भेटीसाठी इंदिरा गांधी, त्यांच्या कडेवर असलेला राजीव आणि नेहरूंची भाची व प्रसिद्ध लेखिका नयनतारा सेहगल तिथे पोहोचल्या. चाचा नेहरूंची कन्या आली, या कौतुकापोटी तेथे काम करणाऱ्या माळ्याने मोगऱ्याची ओंजळभर टपोरी फुले इंदिराजींना भेट दिली. गांधीजी आणि इंदिरा गांधींमध्ये संभाषण चालू असतानाच लहानग्या राजीवने मोगऱ्याचे एक-एक फूल बापूजींच्या पायांच्या लांब बोटांमध्ये खोवून टाकले. थोड्या उशिराच गांधीजींच्या लक्षात ही गोष्ट आली. त्यांनी राजीवला जवळ घेऊन चपापल्या सुरात सांगितले, ''बेटा, पायाच्या बोटांत अशा तऱ्हेने फुले फक्त मृत व्यक्तीसाठी खोवायची असतात; जिवंत मनुष्यासाठी नव्हे!'' अन् दुर्दैवाने अवघ्या पंचवीस-तीस तासांमध्येच त्याच ठिकाणी गांधीजींची दुर्दैवी हत्या घडून यावी, या गोष्टीला काय म्हणावे! दिनांक ३० जानेवारी, १९४८च्या दिवसाचे कोलारकर उत्तम वर्णन करतात. पहाटे पावणे-चार वाजताच गांधीजींनी प्रार्थना आटोपली. त्यांना त्या दिवशी खोकल्याचा खूप त्रास होत होता. त्यामुळे मनू लवंगांची पूड तयार करत म्हणाली, ''बापू, संध्याकाळच्या प्रार्थनेपूर्वी देईन मी तुम्हाला.'' त्यावर बापूजी नकळत उद्‌गारले, ''संध्याकाळच्या प्रार्थनेपर्यंत मी जिवंत राहीन किंवा नाही, हेच मला सांगता येणार नाही.'' मृत्यूच्या उंबरठ्यावर पोहोचल्यावरसुद्धा महापुरुष हे विद्यार्थीच राहतात. नित्य काही ना काही शिकतात, हे गांधीजींनी त्या अखेरच्या दिवशीही सिद्ध करून दाखवले. त्या पहाटे ते बंगाली भाषा शिकण्यासाठी आपले नित्याचे पाठ काही वेळ गिरवत राहिले होते. एकीकडे मोठमोठ्या जबाबदारीचे आणि दुसरीकडे एका दुभंगलेल्या खंडप्राय देशाचे ओझे गांधीजींच्या पाठीवर होते. त्यामुळेच ते अनेकांच्या शापाचेही धनी बनले होते. आदल्या दिवशी त्यांना शिखांचे नेते मास्टर तारसिंग यांनी राजकारण सोडून हिमालयात निघून जाण्याचा सल्ला दिला होता. एवढेच नव्हे, तर एका निर्वासितानेही आदल्या दिवशी त्यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न केला होता.

गुप्तचर खात्याने गांधीजींवर हल्ला होण्याची शक्यता असल्याचा अहवाल काही महिने आधी दिला होता. त्यामुळे 'बिर्ला हाऊस'च्या परिसरात साध्या वेषातील पोलीस ठेवण्यास गांधीजींनी मोठ्या मुश्किलीने परवानगी दिली होती. मात्र प्रार्थना सभेसाठी आपल्याकडे येणाऱ्या लोकांची झडती घेण्यास त्यांनी पोलिसांना मज्जाव केला होता. त्यामुळेच नथुराम गोडसे नावाचा माथेफिरू इसम पिस्तूल घेऊन सहजगत्या तेथे पोहोचू शकला. अमृतसरच्या सुवर्ण मंदिरामध्ये लपलेल्या दहशतवाद्यांवर इंदिरा गांधींनी कठोर कारवाई केली. त्यानंतर पंतप्रधान श्रीमती गांधी यांनी आपल्या संरक्षणासाठी नेमलेल्या फौजफाट्यामध्ये शीख पोलीस व अधिकारी यांना टाळावे, असाही गुप्त अहवाल गुप्तचरांनी सादर केला होता. तो श्रीमती गांधींनी जुमानला नाही. महात्मा गांधी असोत वा इंदिरा गांधी असोत; दोघांनीही आपल्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करून एक प्रकारे स्वतःहूनच मृत्यूला निमंत्रण दिले होते. नव्हे, स्वतःच्या प्राणांची, सुरक्षेची पर्वा न करता सर्वच जाती-धर्मांवर अन् मनुष्याच्या मांगल्यावर दोघांनीही अवाजवी श्रद्धा ठेवली होती.

जेव्हा कर्तृत्ववान पुरुषांचा वा ज्येष्ठांचा अंतकाळ जवळ येतो, तेव्हा फायद्या-तोट्याची गणिते गृहीत धरूनच अनेक गोष्टी लपवल्या जातात. कैकांच्या दुर्धर आजाराची बिंगे चोरून ठेवली जातात. एवढेच नव्हे, तर मृत्यूनंतरही मेल्या मुडद्याशी हे दुष्ट व्यवहारी जग खेळ खेळायला मागे-पुढे पाहत नाही. कागदोपत्री सह्या-अंगठे उठवण्यासाठी कृत्रिम श्वासोच्छ्वासाचा (व्हेंटिलेटर) पुरवठाही केला जातो.

श्रेष्ठ पुरुषांच्या महत्त्वाकांक्षेचा चावा हा काळसर्पापेक्षाही जहरी असतो. दादाभाई नवरोजी यांचे खासगी सचिव म्हणून काम केलेले आणि उभ्या देशाने अनेक वर्षे 'हिंदू-मुस्लीम ऐक्याचे दूत' या बिरुदावलीने गौरवलेले बॅरिस्टर जीना यांना महत्त्वाकांक्षेची इंगळी चावली. त्यामुळेच केवळ व्यक्तिगत स्वार्थापोटी हिंदूंचे वर्चस्व असलेल्या हिंदुस्थानात आणि गांधीजींचे श्रेष्ठत्व असलेल्या काँग्रेसमध्ये न राहण्याचे त्यांनी ठरविले. महत्त्वाकांक्षेच्या लालसेपायीच त्यांनी हिंदुस्तानसारखा देश तोडून इतिहासाचा प्रवाह बदलला आणि ते स्वतंत्र पाकिस्तानचे पहिले राष्ट्राध्यक्ष बनले. त्यांचा क्षयाचा रोग जुना होता. मात्र त्यांना फुफ्फुसाचा कॅन्सर झाल्याचे तेरा महिने आधी त्यांच्या निकटतम मंडळींच्या निदर्शनास आले होते. या

कॅन्सरची गुप्त वार्ता आधीच ठाऊक असती, तर कदाचित देशाची फाळणी टळली असती, असे काही भाबड्या मंडळींना वाटते. मात्र बॅरिस्टर जीना आणि त्यांच्या धर्मांध पाठीराख्यांनी केलेली द्वेषाची पेरणी इतकी जहरी आणि पराकोटीची होती की, एखाद्या दरडीवरून खाली कोसळणारी बलाढ्य शिळा जशी थांबत नाही; तशी देशाची फाळणी अटळ होती, हेच खरे.

आपले पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू वयाच्या सत्तावन्नाव्या वर्षी पंतप्रधान बनले. त्यांना सतरा वर्षांची प्रदीर्घ कारकीर्द लाभली. अलिप्त राष्ट्रसंघटनेची स्थापना करून ते 'शांतिदूत' ठरले. ते एक सच्चे, सालस, सहृदयी आणि विद्वान अभ्यासू नेते होते. 'लोकशाहीदिन' नावाचे फॅड खूप नंतर आले. मात्र, चाचा नेहरू रोज सकाळी आठ ते नऊ या वेळात जनतेच्या तक्रारी स्वत: ऐकत. देशाच्या कानाकोपऱ्यांतला कोणीही मनुष्य त्यांना भेटू शकत असे. आपणास आलेल्या प्रत्येक पत्राचे उत्तर गेलेच पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे अनेकदा पत्रांवर सह्या करण्यासाठी ते पहाटेपर्यंत जागत. स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसुद्धा आलेल्या सर्व पत्रांना न चुकता उत्तरे देत असत.

पंडितजी १९६०मध्ये भुवनेश्वरच्या दौऱ्यावर असताना त्यांना 'अर्धांग-वायूचा झटका' आला. त्यामुळे त्यांना विमानाने दिल्लीला आणण्यात आले. ज्या दिवशी इंदिरा गांधींची हत्या झाली, त्याच्या आदल्या दिवशी त्या नेमक्या भुवनेश्वरच्याच दौऱ्यावर होत्या. त्यामुळे नेहरू घराण्याचे भुवनेश्वरशी काय विचित्र नाते आहे, याचा बोध होत नाही. स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरूंनी चीन या शेजारी राष्ट्रावर खूप प्रेम केले. एक सच्चा सांस्कृतिक शेजारी समजून चीनला युनोमध्ये स्थान मिळावे म्हणून स्वत:चे वजन खर्चिले. मात्र त्याच चीनने १९६४मध्ये भारतावर आक्रमण केल्याने त्यांना अतीव दु:ख झाले. नेहरूंच्या जाण्यामुळे, नेहरू-युगाच्या अस्तामुळे अनेकांना धक्का बसला. पंडितजींच्या निधनानंतर तो धक्का सहन न झाल्याने काही तासांतच प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक मेहबूबखानसुद्धा पैगंबरवासी झाले.

महापुरुषांचे आयुष्यही अनेक श्रद्धा-अंधश्रद्धा आणि अतर्क्य घटनांनी भरलेले असते. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या अंतकाळाबद्दल भरभरून लिहिताना अभ्यासक पुपुल जयकर यांच्या पुस्तकाचा आधार घेतात. सुमारे सोळा वर्षांपूर्वी चंद्रशेखर प्रभू यांच्यासमवेत मी पुपुल जयकर यांच्या मलबार हिलवरील बंगल्यामध्ये अनेकदा गेलेलो आहे. त्या वेळी इंदिराजींच्या अंतिम

पर्वाबद्दल त्यांच्या तोंडून खूप गोष्टी ऐकायचा योगही जुळून आला होता. खरे तर २३ जून, १९८०च्या दिवशी संजय गांधी यांच्याबरोबर माधवराव शिंदेही विमानोड्डाण करण्यासाठी सफदरजंग विमानतळावर हजर होते. संजय त्यांना आपल्या सोबत नेणार होते; परंतु शेवटच्या क्षणी त्यांनी अन्य सहकाऱ्याला सोबत घेतले अन् पुढे काही वर्षांनी माधवरावांचाही मृत्यू हवाई अपघातातच व्हावा, या गोष्टीला काय म्हणावे!

संजय गांधी यांच्या अपघाती मृत्यूनंतर इंदिरा गांधी मनाने खूप हळव्या झाल्या होत्या. मानसिक दृष्ट्या खचल्या होत्या. जयकरांच्या भाषेत अंधश्रद्धेच्या पूर्ण आहारी गेल्या होत्या. संजय यांच्या निधनापूर्वी काही भविष्यकारांनी इंदिराजींना पत्रे पाठवली होती. त्यामध्ये संजय यांच्या निधनाची अचूक तारीख दर्शवली होती. अशा पत्रांकडे आपण दुर्लक्ष केल्याचा श्रीमती गांधी शोक व्यक्त करत. त्यांच्याकरवी पुढे अनेक वर्षे झाशीजवळच्या एका काली मंदिरात लक्षचंडीचा पाठ अखंडपणे चालू होता, असे म्हणतात. अनेक श्रद्धा आणि अंधश्रद्धांनी राजकारण आणि राजव्यवहार भरून गेलेला असतो. महाराष्ट्रात काही गावांत कार्यक्रमाला सहसा अधिकारपदावरील व्यक्ती जात नाहीत. महाराष्ट्रातील अनेक गावांतून असे अनेक आबा आणि अण्णा आहेत, ज्यांच्याकडून आपल्या आवडत्या मंत्र्याच्या गळ्यात हार पडला की, काही महिन्यांतच तो अधिकार पदावरून जातो, अशा समजुती असतात. त्यामुळे त्यांच्याकडून गळ्यात हार पडू नये, यासाठी त्या अण्णाला वा आबाला गर्दीत मागे लोटून द्यायची काळजी अनुयायी घेतात.

चीनकडून भारताच्या झालेल्या पराभवाचे शल्य जसे नेहरूंना होते, तसेच भारतीय लष्कराच्या चीनकडून जागोजाग झालेल्या पराभवाचे मोठे दु:ख स्वा. सावरकरांनाही झाले होते. त्यामुळे ते असहाय अवस्थेत रडल्याची नोंदही कोलारकर करतात. सन १९५७ मध्ये '१८५७च्या स्वातंत्र्यसमरा'ला १०० वर्षे पार पडली होती. त्या निमित्ताने भारतीय क्रांतिकारकांच्या सन्मानाप्रीत्यर्थ दिल्लीच्या रामलीला मैदानावर एक मोठा सोहळा आयोजित केला गेला होता. त्या ठिकाणी बॅरिस्टर सावरकर यांच्यासमवेत व्यासपीठावर येऊन बसायला नेहरूंनी नकार दिला. मात्र, दिव्य दृष्टीच्या आणि कवी हृदयाच्या तात्यासाहेब सावरकरांनी एक अपूर्व नियोजन केले. त्यांनी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे एक भव्य तैलचित्र

ठेवून दिले. विज्ञानशील दृष्टी असलेल्या सावरकरांनी आपल्या धर्मपत्नीच्या मृत्यूनंतरही कोणतेही धार्मिक विधी केले नाहीत वा श्राद्धही घातले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्योद्धारासाठी जीवनभर दिलेला लढा... माईसाहेबांचे त्यांच्या जीवनातले आगमन... नागपूरचा तो ऐतिहासिक दीक्षा समारंभ... आणि शेवटच्या १०-१२ वर्षांतला त्यांचा तो आजार... त्यामुळे आंबेडकरांचे अखेरचे पर्व कष्टप्रद, करुण असले तरी कमालीचे क्रियाशील होते.

कराल काळाचे नाट्य अनेकदा विस्मयजनक असेच असते. मनुष्याचा अटळ मृत्यू अनेकदा आपल्या अशुभ पावलांचे पूर्वसंकेत त्याच्या स्वप्नावस्थेत देऊन जात असतो. या निमित्ताने मला शेक्सपिअरच्या 'ज्युलिअस सीझर' या नाट्यकृतीची आठवण होते. ज्या दिवशी रोमच्या भर दरबारात त्याच्या सहकाऱ्यांकडून त्याची निर्घृण हत्या झाली, त्याच्या आदल्या रात्री सीझरच्या पत्नीच्या स्वप्नात त्याचा  तांबड्या रक्ताने माखून गेलेला पुतळा आला होता. त्यामुळे त्याने त्या दिवशी दरबारात येऊ नये, असा हट्ट तिने धरला होता. गुलामगिरीच्या पद्धतीविरुद्ध कठोर पावले उचलणारा आणि अमेरिकेच्या विविध राज्यांचे एकत्रीकरण घडवून आणणारा महान वक्ता आणि अमेरिकेचा अध्यक्ष अब्राहम लिंकन याच्या बाबतीत असेच काहीसे घडले होते. इथे नाटकातल्या सीझरच्या पत्नीसारखे अन्य कोणाला स्वप्न पडले नव्हते, तर खुद्द अध्यक्ष लिंकननेच काही दिवस आधी ते भीषण स्वप्न पाहिले होते. अमेरिकेच्या व्हाइट हाउसमध्ये पसरलेली ती स्मशानवत शांतता... प्रत्येक कानाकोपऱ्यांतून दाटून येणारा हुंदक्यांचा ध्वनी... स्वत: स्वप्नावस्थेत चाललेला लिंकन... तो तिथे  उभ्या असलेल्या रक्षकाला विचारतो, ''मुडदा कोणाचा?'' रक्षक सांगतो, ''अध्यक्षांचा!'' पुढे अनेक दिवस त्या स्वप्नानेच लिंकनला अस्वस्थ आणि चिंतातूर करून सोडले होते. अन् दुर्दैवाने १४ एप्रिल, १८६५ या दिवशी एका नाट्यगृहात कुटुंबीयांसमवेत नाटक पाहत बसलेल्या लिंकनची दुर्दैवी हत्या घडून आली. या कटामध्ये एका प्रसिद्ध नटाचा प्रत्यक्ष हात होता.

'महानायक' कादंबरीच्या लेखनावेळी मला एक संदर्भ मिळाला. मुंबईमध्ये १९३२च्या दरम्यान स्वर्गीय नाथालाल पारेख यांच्या घरी सुभाषचंद्र बोस मुक्कामाला होते. तेव्हा त्यांना उंच आभाळात झेपावलेले एक

विमान, नक्षत्रांच्या मंडपाला लागलेली भीषण आग अन् आगीच्या कल्लोळात सापडलेलो आपण स्वत: – असे एक विचित्र स्वप्न पडले होते. जणू लिंकन आणि नेताजींसारख्या महापुरुषांना काळाने त्यांच्यावर झडप घालण्यापूर्वीच त्याच्या रंगीत तालमी त्यांना आधी करून दाखवल्या होत्या.

कधी-कधी एखाद्या मनुष्याच्या हातून क्षुल्लकशी चूक घडते आणि अंती ती त्याला मृत्यूच्या खिडीकडे ओढून न्यायला कारणीभूत ठरते. भारताशी एक हजार वर्षे युद्ध करण्याची वल्गना करणारे अन् भारतद्वेषाच्या व अमोघ वक्तृत्वाच्या बळावर पाकिस्तानच्या अध्यक्षपदी पोहोचलेले झुल्फिकार अली भुट्टो! पाकिस्तानी जनतेने आयुबखानला बाजूला करून भुट्टोंना अध्यक्ष बनविले. त्या भुट्टोंनी लेफ्टनंट झिया-उल-हक नावाच्या एका ठेंगू, प्रभावहीन व सामान्य वकुबाच्या मनुष्याला पाकिस्तानचे सेनापती बनवले. झिया-उल-हक हा भुट्टोंचा केवळ प्रशंसक, केवळ मुंडी हलवणारा होयबा. एकूणच सोईचा निरुपद्रवी लष्करी अधिकारी म्हणून त्याला भुट्टोंनी जवळ केले होते. मात्र भुट्टो कधी-कधी त्याची 'माकड' म्हणून टर उडवायचे. पाहुण्यांसोबत खाना घेताना, 'अरे, माझा माकड सेनापती कुठे आहे? बोलवा रे त्याला –' असे अपमानकारक उद्‌गार काढायचे. पुढे अशा व्यक्तिगत अपमानामुळे झियासारखा एक सामान्य माणूस आतून पेटून उठला अन् त्याने आपल्या निर्माणकर्त्या भुट्टोंनाच कैदेत टाकले. त्यांच्यावर सगळे गुन्हे दाखल करून जगापुढे न्यायव्यवस्थेचा देखावा मांडून ४ एप्रिल, १९७९ला त्याने झुल्फिकार अली भुट्टोंसारख्या बुद्धिमान आणि ताकदवान नेत्याला फासावर लटकवले.

हुकूमशहा आणि खलपुरुषांच्या बाबतीत तर मृत्यूचा चेहरा अधिक काळवंडलेला असतो. मोठा मनुष्यसंहार घडवून आणणाऱ्या हिटलरचा मृत्यू एप्रिल, १९४५मध्ये एका बंकरमध्ये झाला. हिटलरची प्रेयसी इव्हा ब्राऊन हिची हिटलरची पत्नी म्हणून मरण्याची इच्छा होती. त्यामुळे त्या दोघांनी मृत्यूच्या दारातच आपले शुभमंगल पार पाडले. हुकूमशहांच्या व सैतानांच्या काळजाच्या कोपऱ्यातसुद्धा हिरव्या जागा असतात, हेच खरे. या निमित्ताने मला औरंगजेबाची आठवण होते. तो अगदी सतरा-अठरा वर्षांचा होता, तेव्हा बुऱ्हाणपूर येथे एका सुंदर तरुणीच्या प्रेमात आकंठ बुडाला होता. दुर्दैवाने कसल्याशा आजाराने तिचे खूप लवकर निधन झाले. या दु:खद प्रसंगामुळे तर त्याच्या निर्दयीपणामध्ये वाढ झाली नसावी ना?

औरंगजेब खुलताबादजवळ वयाच्या नव्वदाव्या वर्षी अतिशय निराश अवस्थेत मृत्यू पावला. अवघ्या पाच-सहा महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्राचे धिरडे भाजून काढू, अशा महत्त्वाकांक्षेने तो इकडे चालून आला होता. मात्र, त्याच्या विरोधात सतत आठ वर्षांहून अधिक काळ संभाजीराजांनी १०४ लढाया खेळून त्याच्या नाकात दम आणला. पुढे सोळा-सतरा वर्षं ताराबाई आणि येसूबाई या शिवाजीराजांच्या मर्द सुनांनी त्याच्याविरुद्ध जंग छेडले. हा औरंगजेब स्वत: पाहिलेली एखादी व्यक्ती आणि ऐकलेला शब्द कधीही विसरत नसे. त्याच्या अखेरच्या दिवसांचा लेखाजोखा मांडताना त्याचे मृत्युपत्रच मला महत्त्वाचे वाटते. स्वत: टोप्या शिवून प्राप्त झालेल्या चार रुपये, दोन आण्यांमधून आपल्या कफनावरचा खर्च पार पाडावा, असे तो लिहितो. त्याच वेळी 'सन्मार्ग सोडून इतरत्र भटकणाऱ्या माझ्यासारख्या (पापी) मनुष्याला बोडक्या डोक्याने दफन करावे', असे तो लिहितो. कारण 'पापी मनुष्याला बोडक्या डोक्याने अल्लासमोर नेल्यास अल्ला त्याला क्षमा करतो', अशी आपण पापी असल्याची स्पष्ट कबुली औरंगजेबाने आपल्या मृत्युपत्रात दिली आहे. आपल्या सेवकांकडून काही गुन्हे घडले असल्यास त्यांना उदार अंत:करणाने क्षमा करावी, असे तो लिहितो. याचाच दुसरा अर्थ असा की, जेव्हा मनुष्याला मृत्यूचा भयप्रद चेहरा दिसतो, तेव्हा औरंजेबासारख्या सैतानांनाही चळाचळा कापरे भरते. ज्या पद्धतीने त्याने दारासारख्या आपल्या अनेक भावांना सत्तेसाठी निष्ठुरपणे मारले, त्यांच्याच करुण किंकाळ्या त्याला ऐकू येत असाव्यात. त्यामुळे 'रेड्याने वेद बोलावा', तशी दुसऱ्यांना क्षमा करण्याची तो भाषा करतो.

आपल्या मृत्युपत्रात राजाने नेहमी जागरूक असावे. राजाकडून झालेली एखादी चूक वा बेसावधपणा त्याने वर्षानुवर्षे केलेल्या कार्याचा नाश घडवून आणतो, असे तो लिहितो. केवळ आपल्या निष्काळजी-पणामुळे शिवाजी आपल्या कैदेतून निसटला अन् पुढे आपली उभी जिंदगी मराठ्यांशी लढण्यात हकनाक वाया गेली, अशी रुखरुखही औरंगजेबाने आपल्या मृत्युपत्रात न चुकता नोंदवली आहे.

नोकरीच्या निमित्ताने मला अलीकडे एका सैतानाचा चेहरा जवळून पाहायला मिळाला. अतिरेक्यांनी २६/११च्या वेळी मुंबईवर जो दुर्दैवी हल्ला केला, त्यामध्ये सांताक्रूझजवळ एका टॅक्सीत बॉम्बस्फोट घडवून

आणण्यात आले. त्यासाठी जिल्हाधिकारी या नात्याने पाकिस्तानी एजंटाविरोधात मी खटला भरावयास परवानगी दिली होती. त्या निमित्ताने साक्षीदार म्हणून काही महिन्यांपूर्वी मला स्पेशल कोर्टाचे समन्स आले. त्यामुळेच मी ऑर्थररोड तुरुंगातील कोर्टात साक्षीदार म्हणून दाखल झालो होतो. तेव्हा समोर लाकडी पिंजऱ्यात अजमल कसाब हा विशी-बाविशीतला पोरगा पाय पसरून कठड्याला टेकून बसला होता. त्याचा चेहरा सात्त्विक अन् चेहऱ्यावरील भाव खूप निर्मळ वाटत होते. एखाद्या चाळीच्या बाल्कनीत एखाद्याचा भाचा बारीला टेकून बसावा; तसा तो सहज बसला होता, तेव्हा सरकारी वकील उज्ज्वल निकम त्याला गमतीने म्हणाले, ''अरे अजमल, ये हमारे पाटीलजी बहुत अच्छे उपन्यास लिखते है। चाहे तो तेरे जीवन पर भी वे अच्छा उपन्यास लिखेंगे।'' तेव्हा अजमल तोंड पसरून निर्मळ हसला.

करकरे, ओंबळे, शिंदे, कामटे, साळसकर अशा मुंबई पोलिसांतील बहाद्दर मोहऱ्यांचे २६/११ला दुर्दैवाने शिरकाण झाले. पैकी विजय साळसकर माझा जवळचा मित्र. २६/११च्या दोनच दिवस आधी दुपारी माझ्याकडे येऊन पिठलं-भाकरी खाऊन गेला होता. त्याला बांद्र्याच्या अमेय हॉटेलातले पिठलं-भाकरी खूप आवडायची. त्या निमित्ताने महिन्यातून दोन-तीन वेळा तरी तो न चुकता दुपारी माझ्या 'ॲन्टिचेंबर'मध्ये यायचा. गप्पा रंगायच्या. विजय अनेकदा सांगायचा, ''समाजासाठी, लोकांच्या भल्यासाठी अनेक गुंडांशी सामना केला. गोळीबारांच्या फैरी खेळलो. कोणी सांगावे, एक दिवस गोळागोळीचा रंग खेळतानाच आयुष्याची यात्रा संपून जायची!'' आज दु:ख याचेच वाटते. त्या दिवशी विजयकडे त्याची लाडकी एके-४७ असती, तर मरणापूर्वी हा मर्दमराठा पाच-पन्नासांच्या मुडद्यांचा सडा प्रथम पाडून मगच देवाघरी निघून गेला असता. पण काय करावे? आमच्या इतिहासाचा शिरस्ताच (उसूल) असा आहे की, मराठ्यांनी कधी धोरण ठरविण्यात सहभागी व्हायचे नसते! मरणाच्या दारात मात्र न चुकता आघाडीवर राहून लढून मरायचे असते! विजयचा तो गोबरा चेहरा, दाट काळ्या मिशा, बोलके-टपोरे डोळे माझ्या डोळ्यांपुढून हलता हलत नाहीत.

जीवनाचे कसले हे विचित्र नाट्य! मृत्यूच्या सावलीत गेल्यावर औरंगजेबासारखा क्रूरकर्मा एकीकडे पश्चात्तापाने पोळून जातो; लोकांनी क्षमाशील राहावे, असे धडे देतो अन् इकडे अजमल कसाबचा तो बाळसेदार,

फसवा, पोरकट चेहरा – ज्याला शेकडो निरपराध नागरिकांच्या हत्येचा जराही विधिनिषेश नाही; उलट, तो आमच्या न्यायव्यवस्थेसह सर्वांवर थुंकतो आहे. या कसाबचे नव्हे, तर त्याला घडविणाऱ्या पाकिस्तानातल्या त्या सैतानांच्या शाळेचे कौतुक (?) करावेसे वाटते!

एप्रिल, १६८०मध्ये रायगडावर शिवाजी-महाराजांचे झालेले महानिर्वाण हा एका अभूतपूर्व कर्तृत्वशाली युगाचा अस्त होता. राजांनी आग्ऱ्याहून स्वत:ची करून घेतलेली सुटका, त्या काळात निबिड अरण्यातून प्रथम काशीकडे आणि नंतर हैदराबादकडे दक्षिणेत शत्रूला चुकवत आपल्या राजधानीकडे घेतलेला वळसा, या मोहिमेत त्यांनी वेचलेले कष्ट, उपासमार याचा खोलवर परिणाम त्यांच्या प्रकृतीवर झाला होता. बालपणापासून सातत्याने कैक वर्षे त्यांनी घोडाफेक केली होती. मृत्यूपूर्वी काही वर्षं मात्र ते नेहमी पालखीतून प्रवास करायचे. रायगडावर सात दिवसांच्या ज्वराचे निमित्त होऊन त्यांचे दु:खद निधन झाले. मात्र, त्याआधी काही वर्षे ते अनेकदा आजारी पडायचे. दोन वर्षं आधी तर साताऱ्याला सलग दोन-तीन महिने ते अंथरुणावर पडून होते.

आपल्या महानिर्वाणापूर्वी संभाजी-राजांबाबत शिवाजीराजे पूर्ण समाधानी असल्याचे आज इतिहासात अनेक घसघशीत पुरावे आढळतात. मृत्यूपूर्वी तीन महिने आधी त्यांनी संभाजीराजांना फ्रेंचांशी वाटाघाटी करण्याचा अधिकार दिला होता. प्रभावळीचा म्हणजेच पन्हाळा, विशाळगडसह कोकणपट्टीच्या मोठ्या विभागाचे पूर्ण अधिकार त्यांनी आपल्या युवराजांच्या ताब्यात दिले होते. मात्र, संभाजीराजांच्या सावत्र मातोश्री सोयराबाई आणि मुख्यत: अण्णाजी दत्तोसारख्या हलकट, पाताळयंत्री कारभाऱ्यांनी रायगडावर संभाजीविरुद्ध कुभांडे रचली. परिणामी, पन्हाळ्याच्या मुक्कामी असलेल्या शंभूला त्यांच्या भावाच्या राजारामाच्या लग्नासाठी बोलावणे पाठवले गेले नाही. जेव्हा हनुमान जयंतीच्या दिवशी थोरल्या राजांचे निधन झाले, त्या निधनाची बातमीही रायगडावर कैक दिवस गुप्त ठेवण्यात आली. राजांच्या आकस्मिक निधनावेळी अण्णाजी दत्तो आणि मोरोपंतांसारखे कारभारीही गडावर मौजूद नव्हते.

अंत्यसंस्कारापूर्वी नाशिक परिसरात असणाऱ्या मोरोपंतांना तातडीने बोलावून घेण्यात आले. त्या काळातील नद्या, अरण्यांचा विचार करता नाशिकहून रायगडावर घोड्यावरून पोहोचायला मोरोपंतांना चार ते पाच

दिवस सहज लागले असतील. तेच पन्हाळ्यावरून मलकापूर, आंबाघाट मार्गे संभाजीराजे आपल्या पित्याच्या अंत्यदर्शनासाठी दीड दिवसांत सहज पोहोचू शकले असते. आजही मराठा समाजात एखाद्याचा ज्येष्ठ मुलगा ठार वेडा असला, तरी त्याच्याच हस्ते पित्याचे अग्निसंस्कार पार पाडले जातात. मात्र कारस्थानी कारभाऱ्यांनी रायगडावर इवल्या राजारामासोबत शिंगणापूरच्या साबाजी भोसले नावाच्या दूरच्या सोयऱ्याला अग्निसंस्कारासाठी उभे केले होते आणि संभाजीराजांचा जन्मसिद्ध हक्क नाकारला होता.

माझ्या 'संभाजी' कादंबरीमध्ये अनेक गोष्टी मी तपशीलवार नमूद केल्या आहेत. त्यामुळे या मुद्द्याचा विस्तार इथे अधिक न करता मी एवढेच म्हणेन, राष्ट्रबांधणीसाठी साफल्यपूर्ण जीवन कसे जगावे; हे शिवाजीराजांनी शिकविले, तर आपल्या मातृभूमीसाठी मरणाला कोणत्या बहादुरीने मिठी मारावी याची शिकवण संभाजीराजे देतात, हेच या थोर पिता-पुत्रांचे श्रेष्ठ योगदान आहे.

महापुरुषांचा मृत्युकाळ हा जणू तैलबुद्धीचा एक उत्तम शिक्षक असतो. तो समाजजीवनाला जागृतीचे अनेक धडे देतो, तर मृत्यूच्या आगमनाने खलपुरुष भयभीत होतात. या अटळ उंबरठ्यावर त्यांच्यातील दुष्टावा गळून पडतो अन् तेही क्षमाशील राहण्याची शिकवण देतात. लबाड नातेवाइकांसाठी थोरामोठ्यांचा मृत्यू म्हणजे त्यांची संपत्ती हडप करण्याची जणू महापर्वणीच. कर्तृत्ववान, ज्ञानी पुरुषाच्या ग्रंथसंपदेकडे त्याच्या पश्चात लक्ष द्यायची उसंत वाळवी सोडून अन्य कोणाकडे नसते. मात्र, त्याने बांधलेल्या प्रासादतुल्य बंगल्यांचा ताबा घेण्यासाठी त्याचे कलेवर घाटावर जाण्यापूर्वीच नातेवाइकांमध्ये उडालेल्या हातघाईच्या लढायाही अनेकदा पाहायला मिळतात. नातेवाइकांचे सोडाच, पण वयोवृद्ध मंडळींच्या फाजील लाडाकोडात वाढलेल्या, संस्कारांच्या वाऱ्यापासून दूर राहिलेल्या बाळांना बऱ्याचदा म्हातारा गचकतो कधी अन् त्याने उभारलेल्या संस्था ताब्यात घेतो कधी अन् उंची गाड्या उडवतो कधी अन् बाया नाचवतो कधी, याची घाई लागून राहिलेली असते. अशा मंडळींच्या अखेरच्या करुणपर्वाची कल्पनाच केलेली बरी.







## Stephen Gundle

**Stephen Gundle** is a historian with a specialist interest in modern Italy. His book include Bellissima : Feminine Beauty and the idea of Italy and Glamour : A History. Professer of Film and Television Studies at the University of Warwick, he has also lives in Italy, for many years and a contributor to History Today, Radio 4's Night Waves and the Italian press.

# BOOK REVIEW




## DEATH AND THE DOLCE VITA

### Stephen Gundle

**Price : 495/-**
**Postage : 30/-**

**Stephen Gundle**'s Death and the Dolce Vita opens on the 9th of April, 1953, when an attractive young woman goes missing. Thirty-six hours later her body is found washed up on a neglected beach at Tor Vaianica. How did Wilma die? Suicide is immediately (and conveniently) ruled out by an implausible explanation from her family – that she was accidently carried away by a strong current while bathing her feet - which is seemingly more concerned with preserving the family name and Wilma's reputation than learning what could have actually happened.

Considering that the backdrop of this tale is Rome in the 1950s, this is not as cold a reaction as it seems at first. In the aftermath of the World War II and the fall of Mussolini, Rome had become a melting pot for people looking at fame as an escape route from poverty. The Montesi family is lower middle class and annonymous and the explanation of an accidental death kept at bay aspirations on Wilma's virtue and the family's sense of respectability. However, the question

remains – had Wilma been lured into an illicit entanglement? Or worse still, prostitution? Post war Rome of 1950 did not take kindly to newly empowered women, who were often the victims of some crime or the other, working girls and prostitutes being the worst hit.

In life, Wilma is an empty canvass, an unexceptional 'Anygirl.' In death, she gives rise to an extraordinary scandal.

How did Wilma die?

Gradually the official explanation begins to unravel. There was no trace of foot irritation or eczema. The mystery of her death and the speed at which the police declared the case closed prompted questions. Cover-up stories began to circulate. The police had scarcely been reformed since the Fascist period and there were just too many loose ends to merit such a swift closure.

Gundle creates a mystery that takes anyone interested in solving it from the seediest backstreets to the highest office in the land. It exposes the contradictions that Rome presented even while it attracted the young and ambitious into its streets. Rome in the 1950s was a Rome where some dreams took flight and also where other dreams came to die. With the necessary means and connections, this was the Rome of the dolce vita – the high life – and at the same a Rome of debauchery and hedonism, though the two were not mutually exclusive. It was the Rome of romance, luxury and glamour – and also the Rome of carnal crimes, sex, drugs, corruption and endless cover-ups.

.Paparazzi wait outside courtrooms to snatch the comings and goings of important people. The entry of Piero Piccioni, a playboy and jazz musician son of Italy's foreign minister Attilo Piccioni, accusations and denials of his involvement in the case, a deeply polarized media, communist leaning papers writing of corruption and cover-up and right leaning papers

counter-splashing tales of degeneracy and amoral behavior all whip up a hysteria which formed the backdrop of this highly charged and publicized trial. As Gundle writes, "……tales of sex, drugs and corruption lifted the veil on a hidden world of debauchery that threatened to tarnish a hitherto untouchable elite."

While the story in itself is extremely interesting, the writing and language leaves much to be desired. In places, the writing is weak and unsatisfactory. For example, Stephen Gundle paints a beautiful and evocative picture of a cold spring afternoon in his opening paragraph; then he rushes over the central events of the book almost as if they are inconsequential. While a wall of text is unnecessary, not galloping through these essential parts would have given weight to the tragedy rather than making it read as a secondary event.


The prose is also littered with unacceptable grammatical errors, such as 'when she does not return by dinner time her family panic' and 'infrequently but regularly'. Such mistakes are annoying and avoidable and distract from the thrill and excitement of reading a true story which shook an entire nation.

As a murder mystery the story of 'Death and the Dolce Vita' is not very satisfying. The police work is riddled with political considerations and incompetence and there is no clear solution to the question of who killed Montesi. But as social history, it succeeds spectacularly. So much that the film by Fellini 'La Dolce Vita' was a stupendous success, giving great insights into the high life of Rome of the 1950's.

- Yasmin Dandekar




## भाजपचे नेते गोपीनाथ मुंडे यांचे अपघाती निधन



गोपीनाथ मुंडे यांचा जन्म बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथरा या गावी एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. वडील पांडुरंगराव आणि आई लिंबाबाई आणि इतर कुटुंबीय पंढरपूरच्या वारीत सहभागी होत. त्यांच्या प्रेरणेतूनच गोपीनाथ लहानपणापासूनच वारीमध्ये सहभागी होत असत. रोज १२ किलोमीटर चालत जाऊन त्यांनी शालेय शिक्षण पूर्ण केले. विद्यार्थी दशेतच त्यांचा सामाजिक कार्याकडे ओढा होता. मराठवाड्यात त्या वेळी श्री क्षेत्र भगवानगडचे महंत श्री संत भगवानबाबा गडकर महाराज यांच्या भक्तांची संख्या मोठी होती. गोपीनाथ आई-वडिलांबरोबर भगवानबाबांचे कीर्तन ऐकण्यासाठी जात. त्यातून त्यांच्यावर आध्यात्मिक संस्कारही झाले. त्यांची घरची परिस्थिती बेताची होती. वडिलांच्या अकाली निधनानंतर आई व थोरले बंधू पंडितअण्णा मुंडे यांनी गोपीनाथ यांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलली. भाऊ पंडितअण्णा यांनी स्वत:चे शिक्षण सोडून गोपीनाथ यांचे शिक्षण पूर्ण केले. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण अंबाजोगाई व पुण्यात झाले. गोपीनाथ यांचा विवाह २१ मे १९७८ रोजी त्यांचे मित्र व सहकारी प्रमोद महाजन यांच्या भगिनी प्रज्ञा यांच्याशी अंबाजोगाई येथे झाला. गोपीनाथ मुंडे यांना पंकजा पालवे-मुंडे, प्रीतम मते-मुंडे आणि यशश्री मुंडे या तीन मुली आहेत.

जनसंघाचे तेव्हाचे तरुण कार्यकर्ते प्रमोद महाजन यांच्याशी त्यांची ओळख झाली व दोघांच्या एकत्र प्रवासामुळे महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणात एक नवा प्रवाह निर्माण झाला व भाजपला बहुजन चेहराही मिळाला. वसंतराव भागवत यांच्या आशीर्वादाने मुंडे यांचे राजकीय नेतृत्व बहरू लागले. जिल्हा परिषद सदस्य, आमदार, विरोधी पक्षनेते, उपमुख्यमंत्री व देशाचे केंद्रीय मंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास बहरत गेला. या काळात त्यांनी विविध क्षेत्रातील असंख्य माणसे जोडली. गरिबांना मदतीचा ध्यास कायम ठेवला. संघटनेची शिस्त कायम ठेवत अधिकाधिक कार्यकर्ते संघटनेत आणण्याचे काम त्यांनी अव्याहतपणे केले.

मुंडे यांनी विधिमंडळही गाजवले. त्यांच्याकडे विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद चालून आले. त्यांनी या संधीचे सोने केले. त्यांची १९९३ ते डिसेंबर १९९४ पर्यंतची विधानसभेतील कारकीर्द वादळी ठरली. फर्डे वक्ते व गर्दी खेचणारे नेते अशी त्यांची ओळख निर्माण झाली. शरद पवारांसारखे खंदे नेतृत्व असलेल्या काँग्रेस पक्षावर त्यांची मुलूखमैदान तोफ या काळात धडधडत राहिली. १९९५ मध्ये राज्यात भाजप-शिवसेनेचे राज्य आले. मुंडे यांच्याकडे उपमुख्यमंत्रिपद व गृह आणि ऊर्जा ही महत्त्वाची खाती आली. टोळीयुद्धाचा बीमोड करण्यासाठी त्यांनी कणखर भूमिका घेतली. गोळीला गोळीनेच उत्तर देण्याचा त्यांचा आदेश वादग्रस्त ठरला. मात्र नंतरच्या काळात त्याचे फायदेही दिसून आले. राज्यात पोलिसांची जरब पुन्हा निर्माण झाली व कुख्यात गुंडांना देश सोडणे भाग पडले. ऊर्जा खात्यावर त्यांचा मोठा प्रभाव होता. कृष्णा खोरे विकास महामंडळ स्थापन करण्यात मुंडे यांचा सिंहाचा वाटा होता.

राज्यातील भाजपची सत्ता गेल्यानंतर मुंडे यांच्याकडे २००० मध्ये पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्षपद आले व त्यांना देशपातळीवर ओळख मिळाली. दरम्यान, मे २००६ मध्ये प्रमोद महाजन यांची हत्या झाली. मुंडे यांच्या राजकीय कारकीर्दीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले. मात्र पक्षातील तळागाळातील कार्यकर्त्यांशी असलेली नाळ तुटू न दिल्याने मुंडे यांचे पक्षातील स्थान राज्याबरोबर देशपातळीवरही उंचावले. मुंडे २००९ मध्ये बीड लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले. यंदाच्या लोकसभा निवडणुकीदरम्यान राज्यात भाजप व शिवसेनेसह इतर समविचारी पक्षांची मोट बांधत महायुती स्थापन करण्यात मुंडे यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका

बजावली. त्यांच्या या प्रयत्नातून पक्षाला घवघवीत यश मिळाले. केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांची वर्णी लागली. ग्रामविकास खात्यासारखे महत्त्वाचे खाते त्यांच्या वाट्याला आले. 'दिल्लीतून गल्लीचा विकास करणार,' असे सांगत त्यांनी कामाला सुरुवातही केली होती. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते.

## 'मौज'चे संपादक राम पटवर्धन यांचे निधन



'सत्यकथा'चे सौंदर्यवादी, रचनात्मक स्वरूप बदलून मराठी साहित्यातील नवीन प्रवाह दाखल करणारे आणि अनेक लेखकांना घडवणारे मौज प्रकाशन आणि सत्यकथा मासिकाचे माजी संपादक राम पटवर्धन यांचे २ जून रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते.

पटवर्धन गेल्या पाच-सहा वर्षांपासून आजारी होते. ठाण्यातील जवाहर बाग स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी ललिता, मुले श्रीरंग, अनिरुद्ध, सून रेणुका आणि नात ऋतुजा असा परिवार आहे. रुईया कॉलेजमध्ये असतानाच श्री. पु. भागवतांनी १९६२ साली त्यांच्यावर सत्यकथेची धुरा सोपविली. अनेक लेखक आणि कवी 'सत्यकथे'च्या माध्यमांतूनच प्रथम वाचकांसमोर आले. सत्यकथा आणि 'मौज'चे प्रयोगशील संपादक आणि नवोदितांमधले चांगले लेखन हेरणारे पटवर्धन मात्र स्वत: प्रसिद्धीपासून कायम दूर राहिले. सकस लेखनाबाबत ते आग्रही असत.

पटवर्धन अतिशय साक्षेपी संपादक होते. आलेल्या मजकुराविषयी ते एवढे सजग असत, त्यांनी केलेल्या सूचना एवढ्या मार्मिक असत, की त्यामुळे त्या साहित्यकृतीचे रंगरूपच पालटून जाई. साठी-सत्तरच्या दशकात मराठी साहित्यात ही नवसाहित्याची लाट आली, तिचे काहीएक श्रेय राम पटवर्धन यांना द्यायलाच हवे. श्री.पु. भागवत यांच्यासारख्या महाकाय झाडाच्या सावलीत राम पटवर्धन यांचे संपादक म्हणून असलेले कर्तृत्व काहीसे झाकोळले गेले. पण ते विशेष दखल घेण्याजोगे होते, एवढे निश्चित.

महत्त्वाचे म्हणजे त्यांना साहित्याबरोबरच समकालीन सांस्कृतिक अवकाशाचीही काळजी असायची. त्यामुळेच साहित्याबरोबरच वाचकांची सांस्कृतिक जाण वाढवणाऱ्या बातम्या आणि घडामोडी यांचाही समावेश त्यांनी 'सत्यकथा' नियतकालिकात केला होता. त्यासाठी 'परिक्रमा' असे सदर त्यांनी सुरू केले होते.

राम पटवर्धन यांच्याकडे केवळ संपादकीय कौशल्यच नव्हते, तर ते अनुवादक म्हणूनही श्रेष्ठ होते. मार्जोरी किनन रॉलिंग्जच्या 'द इयरलिंग' या कादंबरीचा 'पाडस' या नावाने त्यांनी केलेला अनुवाद प्रसिद्ध आहे. अनुवाद कसा असावा, याचे हे पुस्तक म्हणजे उत्तम उदाहरण आहे. परंतु त्यांनी फार लेखन केले नाही.

मौज प्रकाशनची स्वत:ची अशी संपादनकामाची एक पद्धत होती. ती पद्धत भरपूर वेळ घेणारी असल्यामुळे अनेक लेखकमंडळी मौजेवर नाराज असत आणि कळतनकळत हा राग बरेचदा पटवर्धन यांच्यावर काढत. पटवर्धन यांनी या नाराजीकडे कधी लक्ष दिले नाही. साहित्यसंपादनातली अशी निष्ठा आता फारशी दिसत नाही.

## ज्येष्ठ गायिका धोंडूताई कुलकर्णी



जयपूर-अत्रोली घराण्याच्या ज्येष्ठ गायिका धोंडूताई कुलकर्णी (८६) यांचे १ जून रोजी मुंबईत निधन झाले. त्यांच्या निधनाने शास्त्रीय संगीतातील एक पर्व संपले. कोल्हापुरात सन १९२७ मध्ये जन्मलेल्या धोंडूताईंना गोड गळ्याची निसर्गदत्त देणगी लाभली होती. वयाच्या आठव्या वर्षी त्या 'आकाशवाणी'वर पहिल्यांदा गायल्या होत्या, पण त्यांना शास्त्रीय संगीताचे वेड त्याहीआधी म्हणजे वयाच्या पाचव्या वर्षांपासूनच लागले होते. वयाच्या दहाव्या वर्षांपासून त्यांनी खऱ्या अर्थाने आपले संगीतशिक्षण सुरू केले. पुढे दहा वर्षे त्यांनी भुर्जी खाँसाहेब यांच्याकडे जयपूर अत्रोली घराण्याच्या शास्त्रशुद्ध गायकीचे धडे घेतले.

लक्ष्मीबाई जाधव आणि नंतर सुरश्री केसरबाई केरकर यांच्याकडे संगीत आराधना करून त्यांनी जयपूर घराण्याची शास्त्रशुद्ध गायकी आत्मसात केली. केसरबाईंचे शिष्यत्व स्वीकारलेल्या धोंडूताईंनी १९६२ ते ७१ या काळात त्यांच्याकडून संगीताचे धडे घेतले. संगीत आराधना हेच आपल्या जीवनाचे ध्येय असल्याची प्रतिज्ञा धोंडूताईंनी केली होती आणि त्यासाठी त्यांनी विवाह केला नाही. त्यांनी कधीही गाण्याचा बाजार मांडला नाही की ग्लॅमर आणि प्रसिद्धीचा मोह धरला नाही. आकाशवाणीसह त्यांनी देशाच्या अनेक शहरात संगीताच्या मैफिली केल्या. या वयातही त्या संगीताचा रियाज नियमितपणे करीत. ज्ञानाची प्रक्रिया अखंडपणे सुरूच असते, तिला कधी पूर्ण विराम देता येत नाही असे धोंडूताई सांगत.

राज्य सरकारचा जीवन गौरव पुरस्कार, संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार, यावर्षीचा चतुरंग संगीत सन्मान आदी अनेक मानाच्या पुरस्कारांवर धोंडूताईंनी आपले नाव कोरले होते. गायक आदित्य खापवे आणि ऋतुजा लाड आदी शिष्य त्यांची गायकीची परंपरा पुढे चालवत आहेत.

## चतुरस्त्र लेखिका माया अँजेलिऊ



कवयित्री, लेखिका, अभिनेत्री, गायिका अशा चतुरस्त्र गुणवत्तेने अमेरिकेवरच नव्हे तर जगावर गारुड करणाऱ्या माया अँजेलिऊ यांचे नुकतेच निधन झाले. गरिबी, वर्णभेद, बालपणीचे लैंगिक शोषण या सर्वांवर मात करणाऱ्या माया या सेलिब्रेटी झालेल्या पहिल्याच कृष्णवर्णीय महिला कलाकार होत्या.

धारदार व्यक्तिमत्त्व, सुंदर आवाजाची देणगी, चतुरस्त्र लेखणी असणाऱ्या माया यांच्या 'आय नो व्हाय दि केज्ड बर्ड सिंग्ज...' या आत्मचरित्राच्या लक्षावधी प्रती जगभर खपल्या. माल्कम एक्स, नेल्सन मंडेला ते मार्टिन ल्युथर किंग (ज्युनिअर) आदी कृष्णवर्णीय महान नेते यांच्या त्या अगदी निकटतम होत्या. अमेरिकी अध्यक्षपदाच्या उद्‌घाटन सोहळ्याची अनेक गीते त्यांनी लिहिली आणि तितक्याच सुंदर, स्फूर्तिदायी आवाजात गायलीही. त्यातील बिल क्लिंटन यांच्या १९९३ मधील अध्यक्षीय प्रारंभ

सोहळ्यात गायलेले 'ऑन दि पल्स ऑफ दि मॉर्निंग' हे तर अक्षरश: हिट ठरले होते. त्या अखेरपर्यंत क्लिंटन कुटुंबाच्या निकटवर्तीय होत्या.

पोटापाण्यासाठी तरुणपणी नाइट क्लबमध्ये नृत्य करणाऱ्या आणि नंतर 'सिंग मदर' म्हणून राहिलेल्या माया यांनी पन्नास आणि साठचे दशक आपल्या अभिनयाने आणि आवाजाने गाजविले. आता जगप्रसिद्ध झालेल्या मुलाखतकार ऑप्रा विनफ्रे यांच्या त्या गुरू. त्यांनी नियमित पुस्तकांबरोबरच कविता, मार्गदर्शन करणाऱ्या पुस्तिका, लहान मुलांच्या गोष्टींची पुस्तकेही लिहिली.

## ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक डॉ. शांती पटेल यांचे निधन



ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, गोदी कामगारांचे नेते, माजी महापौर आणि माजी खासदार डॉ. शांती पटेल (९३) यांचे शुक्रवारी पहाटे माहीम येथील घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा आणि दोन मुली असा परिवार आहे. डॉ. शांती पटेल यांनी मुंबईचे महापौर म्हणून काम केले. कामगार चळवळीसाठी सारे आयुष्य वेचणारे डॉ. पटेल हे गोदी कामगारांचे आधार होते. अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी कामगारांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलने केली.

## व्यंकाप्पा पत्की यांचे निधन

समाजवादी चळवळीतील ज्येष्ठ नेते, विधानपरिषदेचे माजी आमदार ॲड. व्यंकटेश नारायण पत्की यांचे १० जून रोजी मिरज येथील सिद्धिविनायक कॅन्सर हॉस्पिटलमध्ये निधन झाले. ते ६४ वर्षांचे होते. मागील काही महिने हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

समाजवादी चळवळीतील बंडखोर आणि अभ्यासू नेता, अशी त्यांची ओळख होती. 'युक्रांद'चे कार्यकर्ते म्हणून त्यांनी आपले समाजकार्य सुरू केले. प्रथम समाजवादी पक्षात, नंतर जनता पक्ष आणि जनता दलात त्यांनी बरीच वर्षे काम केले. एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, बापूसाहेब काळदाते,

भाई वैद्य अशा अनेक समाजवादी नेत्यांशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. आमदार संभाजी पवार यांचे अत्यंत जिवलग मित्र. त्यांच्याच पुढाकाराने १९९६ साली ते विधानपरिषदेवर निवडून आले. सहा वर्षांची त्यांची कारकीर्द उल्लेखनीय ठरली. त्यांना 'उत्कृष्ट संसदपटू' हा बहुमान मिळाला. ते सदैव वाचन व अभ्यासात गर्क असत. सांगलीचे  नगरसेवक म्हणूनही त्यांनी चोख कामगिरी बजावली होती.

## रवींद्र गोडबोले यांचे निधन

देशमुख प्रकाशन संस्थेचे संचालक रवींद्र गोडबोले यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दि. १४ जून रोजी निधन झाले. ते ६० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

पुण्यात शालेय शिक्षण झाल्यानंतर मुंबईच्या युडीसीटीमधून केमिकल इंजिनीअरिंग केले. अक्वेरियम टेक्नॉलॉजी या बांधकामाची यंत्रे बनविणाऱ्या कंपनीचेही ते संचालक होते. देशमुख आणि कंपनीचे संचालक रा.ज. देशमुख यांच्या पत्नी सुलोचना यांचा भाचा या नात्याने त्यांच्या पश्चात या प्रकाशन संस्थेची जबाबदारी गोडबोले यांनी स्वीकारली.

प्रकाशक म्हणून काम करतानाच अभ्यासू वृत्तीने 'महाभारत : संदर्भ आणि समन्वय', 'औरंगजेब : शक्यता आणि शोकांतिका' अशा पुस्तकांचेही लेखन केले.

## सुधाकर भालेराव यांचे निधन

शेकडो नाशिककरांना दुर्बिणीच्या सहाय्याने अवकाश दाखवणारे आणि खगोलशास्त्रात आपला ठसा उमटवणारे ज्येष्ठ खगोलतज्ज्ञ सुधाकर भालेराव यांचे (वय ८० वर्षे) २० जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून आणि नातू असा परिवार आहे.

३री आवृत्ती

# पाऊलवाटेवरले गाव


आशा बगे

**किंमत : १५०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




एखादीच रिकामी होडी किनाऱ्याला.
संथ पाण्यावरून पक्षी या तीरावरून त्या तीराकडे उडतात.
दुपार कलते. थोडी थंड हवा सुटते.
कदाचित पाऊस येईलही...
हे तिच्या मनात राहून गेलेलं गाव
तिलाही आता इतक्या काळानंतर जसंच्या तसं सापडणार नाही
हे तिला कळलं. आता हे पाणी संथ होतं. पण अशाही वेळा
असतातच ना! की जेव्हा हे बेभान होतं, आपले तट सोडून
सैरावैरा धावतं. त्या पाण्याला मग कुणीही कळत नाही.
त्यावेळी ते पाणी नसतंच...
प्रलयच असतो. तो प्रलय केवळ पाण्यातच शिरत नाही
तो मस्तकातच भिनत जातो.
या सगळ्यात माणसाच्या इच्छा अनिच्छेचा सन्मान कुठला!



# एल्मर आणि वारा

त्या दिवशी फारच सोसाट्याचा वारा सुटला होता. जंगलातल्या एका गुहेत आसऱ्यासाठी एल्मर थांबला होता. त्याचे इतर हत्ती दोस्त, काही पक्षी-मित्र आणि त्याचा चुलत भाऊ विल्बरही त्याच्याबरोबर होता. नेहमीप्रमाणे विल्बर वेगवेगळ्या आवाजांच्या करामती करत होता. गुहेच्या मागच्या बिळातून येणाऱ्या आवाजाची त्यानं नक्कल केली. तो हुबेहूब आवाज ऐकून सगळे जण मनमुराद हसले.

"केवढा हा वारा सुटलाय! आज उडण्यात धोका आहे." एक पक्षी म्हणाला. "हो ना. आपण एवढेसे लहान. हलके. या वाऱ्यात कुठेही भेलकांडत जाऊ!" दुसरा घाबरत म्हणाला. "हो. पण आमच्यासारख्या हत्तींना काही होणार नाही." एल्मरनं चिडवलं. "पण हत्तींना उडता कुठे येतं?" पक्ष्यानं टोला दिला. "शिवाय एल्मर, मी तर म्हणतो की, या सोसाट्याच्या वाऱ्यात बाहेर





पडायला तू घाबरतोयस. भित्री भागूबाई कुठली.'' दुसऱ्यानं आणखी चिडवलं. ''काय म्हणालास? मी – मी भित्रा आहे? बघच आता. विल्बर, चल. यांना दाखवूच आपण कोण आहोत ते.'' एल्मरनं बेट लावली.

''एल्मर, विल्बर – वाऱ्यात जायचा वेडेपणा करू नका. मागे फिरा.'' आजोबा हत्ती रागावले. पण त्यांचं बोलणं ऐकायला एल्मर-विल्बर तिथे होते कुठे? ते तर आधीच गुहेच्या बाहेर पडले होते.

दोघं झाडांच्या मागे उभे राहिले. आता ते त्या गुहेतल्या हत्तींच्या नजरेच्या टप्प्यात नव्हते. एल्मर पुढे झाला आणि दुसऱ्या गुहेच्या दिशेनं जायला लागला. ''ही आयडिया भन्नाट आहे हं एल्मर!'' विल्बर म्हणाला. ''मग! तुझाच भाऊ आहे मी! विल्बर, आता एक काम कर. तू असा काही आवाज काढून त्यांच्याशी बोल की, आपण अजूनही वाऱ्यात चालतोय, असं त्यांना वाटलं पाहिजे. आणि हो, अधून-मधून माझ्यासारखाही आवाज काढून बोल.'' एल्मरनं सांगितलं.

''वा! आलं लक्षात.'' असं म्हणून एल्मरसारखा आवाज काढून विल्बर बोलायला लागला. शिवाय आवाज असा काढला की, जणू खूप लांबून बोलतोय. ''या सोसाट्याच्या वाऱ्यात पाऊल पुढे टाकणंही मुश्किल आहे.'' मग स्वतःच्या आवाजात म्हणाला, ''एल्मर, सांभाळून चल.''

हे आवाज ऐकून सगळे हत्ती काळजीत पडले. एवढ्यात विल्बर ओरडला, ''एल्मरऽऽ कशाला तरी घट्ट पकड. ते बघ – ते बघ!''

''धावाऽधावाऽऽवाचवाऽ'' एल्मरचा आवाज आला. ''वाचवाऽऽ मी उडायला लागलोय... वाऱ्यानं उडतोय! वाचवाऽऽ''



''एल्मर खाली ये. बापरे! तू उडतोयस कसा? वाचवाऽ वाचवाऽऽ एल्मर – एल्मर...'' विल्बरचा ओरडा ऐकू आला.



"बापरे! म्हणजे एल्मर वाऱ्यानं उडून चाललाय वाटतं? चला, आपण त्याच्या मदतीला जायला हवं. एक हत्ती म्हणाला.

"अरे, पण हत्तीदादा, तू या गुहेतून बाहेर गेलास, तर तूही वाऱ्यानं उडून जाशील ना!" एक पक्षी म्हणाला.

"थांबा. एक युक्ती करू या. आपण सगळे जण साखळी करू या. मागच्या हत्तीनं पुढच्या हत्तीची शेपूट सोंडेनं पकडायची – काय?" दुसऱ्यानं युक्ती लढवली.

"हो – हो. चालेल. आपल्या एल्मरला मदत करायलाच हवी." असं म्हणून सगळ्या हत्तींनी सोंडेत शेपटी पकडून साखळी केली. सगळे बाहेर आले.

पुढच्या हत्तीची शेपूट मागच्याच्या सोंडेत पकडलेली पाहून एल्मरला हसायला आलं. "ए विल्बर, ते बघ. कसे दिसतायत सगळे!" तो म्हणाला.

"एल्मर, मागे हो – वाऱ्यानं उडशील!" विल्बरनं त्याला हाक मारली.

हत्तींना काही तरी बोलायचं होतं खरं; पण शेपट्या आणि सोंड एकमेकांत गुंतल्यामुळे त्यांना तोंडच उघडता येईना. त्यांच्या तोंडून फारच चमत्कारिक, गमतीशीर आवाज येत होते. "छ्या! या दोघांनी आपल्याला "मामा" बनवलं!" आपल्याला फसवलं. आपली चेष्टा उडवली!" ही सगळी एल्मर आणि विल्बरची ट्रिक आहे हो!" सगळे जण वैतागले. गुहेत परतले.

थोड्या वेळानं एल्मर आणि विल्बरही तिथे आले. सगळ्या हत्तींनी हा "जोक" "एन्जॉय" केला. "एल्मर, तुझं फारच चुकलं. वेड्यासारखा वागलास तू." एक पक्षी म्हणाला.



"खरं आहे मित्रा पण हत्ती काही



वाऱ्यानं उडून जात नाही. मी आता त्या झाडापर्यंत जाऊन परत येतो, म्हणजे तुम्हाला हे पटेल.'' एल्मर म्हणाला आणि तो बाहेर पडला.

''बघितलंत? ही याची आणखी एक ट्रिक.'' दुसरा हत्ती म्हणाला.

एल्मर झाडांच्या मागे दिसेनासा होईपर्यंत सगळे त्याच्याकडे बघत होते.

थोडा वेळ गेला आणि एकदम एल्मरचा आवाज आला. ''वाचवाऽ वाचवाऽऽ लवकर या – मला धरून ठेवा. मला जमिनीवर उभं राहता येत नाहीये!''

सगळे हत्ती हसले. ''विल्बर, पुन्हा गंमत करतोय!'' पुन्हा मदतीसाठी हाक आली. ''अरे, या – लवकर या... मी उडून चाललोय!'' आता तर हत्तींच्या हास्याचा धबधबाच सुरू झाला. ''अहो, हा आवाज मी काढत नाहीये.'' विल्बर म्हणाला.

''अरे, खरंच! हा विल्बर नाहीये.'' एक पक्षी म्हणाला. सगळ्यांनी त्या दिशेनं बघितलं, तर काय – एल्मर झाडावर होता. ''तू तिथे काय करतोयस?'' एका हत्तीनं दरडावून विचारलं. ''ह्यालाच तर उडणं म्हणतात.'' पक्षी म्हणाला. ''बिच्चारा एल्मर!'' हत्तीला त्याची दया आली.

'हे माझे सुपासारखे कान सारखे पंखांसारखे हलणारे. हे पंखांसारखे काम करतायत. ते हलवले की, मी उडतोय.' एल्मरच्या मनात आलं.

त्यानं खाली पाहिलं. विल्बर आणि इतर सगळे हत्ती त्याला इटुकले-मिटुकले दिसत होते.



क्षणभरानंतर त्याला वाटलं – 'खरंच, असं उडण्यात कित्ती मजा आहे! धम्माल!'

इतर सगळे प्राणी त्या



सोसाट्याच्या वाऱ्यापासून स्वत:ला वाचवण्यासाठी धडपड करताना त्याला दिसत होते आणि त्यांना एक हत्ती चक्क उडताना दिसत होता.

"अरे, हा तर एल्मर! हीसुद्धा त्याची बंडलबाजीची ट्रिक असेल." सिंह म्हणाला.

शेवटी सोसाट्याचा वारा थांबला आणि एल्मर खाली आला.

'छे बुवा! केवढं लांब चालत जायला लागणार आहे. बोअर जॉब! मला माझ्या मूर्खपणाची शिक्षा मिळाली' त्याच्या मनात आलं.

वारा-वादळ शांत झाल्यावर एल्मरला शोधायला पक्षी उडत-उडत निघाले. त्यांना एल्मरला घराची वाट दाखवायची होती. हत्तींना पक्ष्यांचा थवा उडताना दिसला. त्यावरून 'एल्मर इथे जवळपास असणार,' हे त्यांनी ओळखलं. एल्मरच्या साहसाबद्दल ऐकायची त्यांनाही खूप उत्सुकता होती. त्यामुळे तेही त्या दिशेने जायला लागले.

"एल्मर, तुझं म्हणणं चुकीचं ठरलं. हत्ती वाऱ्यानं ढकलला जाऊ शकतो." पक्षी म्हणाला.

"मित्रा, तुझंही म्हणणं चुकीचं ठरलं. आजचा दिवस उडण्यासाठी फारच सुंदर होता!" एल्मर हसत-हसत म्हणाला.




RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2012-2014/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 July. 2014 Posting Date : 11 July. 2014

"सत्तेमध्ये कधीही दोन केंद्रं नसतात, ही गोष्ट मी आता सर्वस्वी स्वीकारली आहे. आणि ही गोष्ट तुम्हीसुद्धा ध्यानात घ्या!"

– मनमोहन सिंग

मूळ लेखक : संजय बारु
अनुवाद : लीना सोहोनी




BOOK POST
Printed Matter

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.